# कृषीवल

रायगड, शुक्रवार, दि. २० मार्च २०२६

किंमत ४ ₹



सी साईट रिसॉर्ट (नागांव)

कुक, वेटर व हाऊसकिपींग स्टाफ पाहिजे

संपर्क : ९४२२८५६३३६ ७३८५९६५८८५




हिंदू नववर्षाच्या स्वागतासाठी गुरुवारी अलिबाग नगरी पारंपरिक गुढ्या उभारून सजली होती. मराठी अस्मितेची गुढी ऐतिहासिक ते आधुनिक रूपात शहरातील चौकाचौकांमध्ये पहावयास मिळाली. ढोलताशाचा गजर करणारी तरुणाई आणि हिंदवी स्वराज्याचा इतिहास असणाऱ्या झाशीच्या राणी लक्ष्मीबाई अन् इतिहास निर्माण करून आधुनिक काळात यश संपादन करणारी नारी यांनी घोड्यांना टाच मारलेली पाहावयास मिळाली. शोभा यात्रेमध्ये असणाऱ्या चित्ररथांनी नागरिकांचे लक्ष वेधले होते. शिवघोषणांनी अलिबाग नगरी दुमदुमली होती.



● हिंदू नववर्षाच्या स्वागतासाठी अलिबागनगरीत ढोलताशांच्या गजरात निघालेल्या संस्कृतीचे पारंपरिक दर्शन घडवून आणणाऱ्या शोभायात्रेने नागरिकांचे लक्ष वेधून घेतले होते. (सविस्तर वृत्त पान २ वर)

## वेधक

### ट्रान्सवर्ड फर्टीकेम कंपनीत आग

**धाटाव** : रोहा तालुक्यातील धाटाव औद्योगिक वसाहतीमध्ये खते उत्पादन क्षेत्रात अग्रेसर असलेली ट्रान्सपोर्ट फर्टीकेम कंपनीत बुधवारी सायंकाळी भीषण आग लागल्याची घटना घडली. इमारतीच्या टेरेसवर असलेल्या कूलिंग टॉवरला ही आग लागली असून या आगीमध्ये कूलिंग टॉवरचे आणि इमारतीवरील काही साहित्याचे प्रचंड नुकसान झाले. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवित आणि झालेली नाही.

मिळालेल्या माहितीनुसार बुधवारी ( दि.१८) सायंकाळी ५:३० वाजण्याच्या सुमारास कंपनीच्या उंच इमारतीवरील कूलिंग टॉवरला अचानक आग लागली. वाऱ्याचा वेग जास्त असल्याने काही वेळातच आगीने रौद्ररूप धारण केले. आगीमुळे परिसरात काळ्या रंगाचे प्रचंड लोट पसरले होते. या धुराचा त्रास धाटाव परिसरातील पान २ वर

# भारतावर महासंकट!

## २० टक्के गॅसची आयात ठप्प; देशावर वीज संकट, कारखानेही बंद पडण्याची भीती

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

मध्यपूर्वेतील युद्धाच्या ज्वाळा आता भारताच्या उंबरठ्यापर्यंत पोहोचल्या आहेत. इराणने कतारमधील रास लाफान या गॅस निर्मितीच्या मुख्य केंद्रावर क्षेपणास्त्र हल्ला केल्यामुळे भारताचा २० टक्के गॅस पुरवठा खंडित झाला आहे. या संकटामुळे देशातील वीज निर्मिती, खत कारखाने आणि औद्योगिक उत्पादनावर गंभीर परिणाम होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

तज्ज्ञांच्या मते, जर हा पुरवठा पुढील दोन आठवड्यात पूर्ववत झाला नाही, तर भारताला मोठ्या औद्योगिक मंदीचा आणि ऊर्जा संकटाचा सामना करावा लागू शकतो.

भारत आपल्या नैसर्गिक वायूच्या गरजेसाठी मोठ्या प्रमाणावर कतारवर अवलंबून आहे. रास लाफान प्रकल्पावर झालेल्या हल्ल्यामुळे भारताला मिळणारा पुरवठा प्रभावित झाला आहे. भारताच्या एकूण गॅस आयातीपैकी २० टक्के वाटा कतारचा आहे. म्हणजेच दररोज मिळणारा सुमारे ४७.४ दशलक्ष टन गॅस पुरवठा अचानक थांबला आहे. गॅसच्या किमती जागतिक बाजारपेठेत वधारल्यास भारताच्या आयात खर्चात मोठी वाढ होण्याची भीती आहे.

देशात एलपीजीचा तुटवडा जाणवत असताना, सरकारने आता संरक्षणात्मक पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. घरगुती ग्राहकांसाठीचा पीएनजी आणि वाहनांसाठीचा सीएनजी पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी सरकार रेशनिंगचे धोरण अवलंबण्याची शक्यता आहे. गॅसच्या कमतरतेचा सर्वाधिक फटका वीज निर्मिती केंद्रांना बसेल, ज्यामुळे अनेक राज्यांत वीज कपातीचे संकट ओढवू शकते. तसेच घरगुती पुरवठा कायम ठेवण्यासाठी औद्योगिक क्षेत्राचा गॅस पुरवठा कमी केला जाण्याचे संकेत मिळाले आहेत. यामुळे कारखान्यांचा उत्पादन खर्च वाढून महागाई वाढण्याची शक्यता आहे.

इराण आणि कतारमधील संघर्षामुळे हॉर्मुझची सामुद्रधुनी हे क्षेत्र युद्धाच्या छायेत आहे. हा मार्ग जागतिक तेल आणि पान २ वर

### पाकिस्तान अणुबॉम्ब घेऊन थेट युद्धात?



**नवी दिल्ली** : अमेरिका-इस्रायल आणि इराण यांच्यातील युद्धाचा भडका दिवसेंदिवस वाढतो आहे. हे युद्ध सध्यातरी थांबवण्याची शक्यता दिसत नाही. त्यामुळे भविष्यात भारतासह जगातील अनेक देशांमधील उर्जासंकट आणखी बिकट होण्याची शक्यता आहे. विशेष म्हणजे हे युद्ध थांबण्याऐवजी त्यात आणखी काही देश ओढले जाण्याची शक्यता आहे. इस्रायलच्या एका हल्ल्यानंतर आता इराणने आखाती देशांतील तेल प्रकल्पांना लक्ष्य करणे सुरू केले आहे. परिणामी आता इराणने सौदी अरेबिया, संयुक्त अरब अमिराती, कुवेत यासारख्या देशांवरील हल्ल्यामुळे हे युद्ध आणखी वाढू शकते, अशी शक्यता वर्तवली जात आहे. विशेष म्हणजे सौदी अरेबियावर हल्ले केल्याने आता पाकिस्तानदेखील या युद्धात उतरतो की काय आणि अणुबॉम्बच्या मदतीने हल्ले केले जातात की काय? असी भीती जगभरात व्यक्त केली जात आहे.इस्रायलकडून इराणच्या तेल प्रकल्पांना आता लक्ष्य केले जात आहे. याला प्रत्युत्तर म्हणून आता इराणन हा देश आता सौदी अरेबिया, कुवेत, यूएई या देशांवर हल्ले करत आहे. या देशातील तेल प्रकल्पांना इराण लक्ष्य करतो आहे.या हल्ल्यांबाबत बोलताना आम्ही क्षेपणास्त्र आणि ड्रोन हल्ले रोखल्याचे सांगितले आहे. तर यूएईनेही आम्ही एक तेल प्रकल्प संपूर्ण रिकामा केला आहे, पान २ वर

# आज चवदार तळ्यावर लाखो अनुयायी



- महाडमध्ये घुमणार सामाजिक समतेचा संदेश
- क्रांतीभूमीला अभिवादन करण्यासाठी कार्यकर्ते झाले सज्ज
- शतक महोत्सवी वर्षाची सुरुवात

**। महाड । प्रतिनिधी ।**

चवदार तळ्यावर पाण्यासाठी सत्याग्रह करून अस्पृश्यतेविरोधात ऐतिहासिक लढा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी ९९ वर्षापूर्वी पुकारला होता.महामानवाच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या या क्रांतीभूमीला अभिवादन करण्यासाठी लाखो भीम अनुयायी शुक्रवारी (दि.२०) महाडमध्ये दाखल होणार आहेत.

चवदार तळ्याचा परिसर भीमसृष्टीने आणि अनुयायींच्या जयघोषाने भक्तीमय होणार आहे. राजकीय, पान २ वर

### शुध्द पाण्यासाठी एक वर्षाची प्रतीक्षा

दरवर्षी महाड येथील चवदार तळे येथे २० मार्चला भीम अनुयायी दाखल होतात. चवदार तळ्यातील पाणी ओंजळीमध्ये घेऊन महामानवाच्या विचारांना अभिवादन करतात. मात्र या तलावातील पाणी अशुध्द असल्याचे चित्र आहे. यावर्षी देखील तलावाचे पाणी शुध्द करण्यास महाड नगरपालिका अपयशी ठरली आहे.चवदार तळे आणि परिसराच्या सुशोभीकरणासाठी सामाजिक न्याय विभागाकडून ५५ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असून, या कामांचे भूमिपूजनही मुख्यमंत्री व मान्यवरांच्या हस्ते होणार आहे. त्यामुळे चवदार तळ्यातील शुध्द पाण्यासाठी भीम अनुयायींना अजून एक वर्ष वाट पहावी लागणार आहे.

# उसर-पोयनाड-बैलखिंड मार्ग फास्टट्रॅकवर



**। रायगड । प्रतिनिधी ।**

उसर ते पोयनाड दरम्यान बैलखिंड मार्गे रस्ता गेली दोन दशकांहून अधिक काळ प्रस्तावित होता. उसर परिसरात उभारल्या जाणाऱ्या गेल कंपनीच्या आशिया खंडातील सर्वात मोठ्या पॉलीमर प्रकल्पामुळे या मार्गाच्या कामाला गती मिळण्याची चिन्ह दिसू लागली आहेत. यासाठी उसर ते पोयनाड हा मिसिंग लिंक प्रकल्प सार्वजनिक बांधकाम विभागाने हाती घेतला आहे. या रस्त्यामुळे पोयनाडला जाण्यासाठीचा ३० किमीचा प्रवास १२ किमीवर येणार आहे. त्याचबरोबर अवजड वाहतूक या मार्गाने होण्याची शक्यता असल्याने पोयनाड अलिबाग या रस्त्यावरील प्रवास अधिक सुलभ होणार आहे.

केंद्र सरकारचा उपक्रम असलेल्या गेल कंपनीकडून उसर येथे पॉलीमर प्रकल्पाच्या उभारणीचे काम सुरू झाले आहे. हा आशिया खंडातील सर्वात मोठा पॉलीमर प्रकल्प असणार आहे. ज्यातून १ हजार मे. टन पॉलीमरचे उत्पादन होणार आहे. आठ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक करून प्रकल्प उभारणीचे काम सध्या सुरू आहे. या शिवाय याच परिसरात शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाची उभारणी केली जात आहे. ५०० खाटांचे रुग्णालय सुरु होणार आहे. यामुळे या परिसरातील वाहनांची वर्दळ वाढणार आहे. ही बाब लक्षात घेऊन उसर ते पोयनाड दरम्यान प्रस्तावित असलेल्या आणि लालफीतीत अडकून पडलेल्या मिसिंग लिंक प्रकल्पाला गती देण्यासाठी हालचालींना वेग आला आहे.सार्वजनिक बांधकाम विभागाने पोयनाड पान २ वर

### वेळेची आणि इंधनाची बचत

सध्या उसर येथून अलिबाग, कार्लेखिंड, पेझारी आणि पोयनाड असा प्रवास करावा लागतो. ज्यासाठी जवळपास ३० किलोमीटरचे अंतर पार करावे लागते, पण उसर ते पोयनाड मिसिंग लिंक प्रकल्पामुळे हे अंतर अवघ्या १२ ते १५ किलोमीटर येणार आहे. वडखळवरून नागाव, चौलच्या दिशेने येणाऱ्या पर्यटकांनाही हा मार्ग उपयुक्त ठरु शकणार आहे. या मिसिंग लिंक प्रकल्पामुळे प्रवासाचा वेळ आणि इंधनाची बचत होण्याची शक्यता आहे. भविष्यातील वाहतूक कोंडीच्या पार्श्वभूमीवर हा रस्ता महत्त्वाचा ठरणार आहे.

# महाराष्ट्राला अवकाळीचा तडाखा

**। नागपूर । वृत्तसंस्था ।**

गुढीपाडवा म्हणजे मराठी नववर्षाची सुरुवात आहे. मात्र, यावर्षी ही मराठी नवीन वर्षाची सुरुवात अवकाळी पावसाच्या साथीने झाली आहे. राज्यातील जवळपास सर्वच जिल्ह्यांमध्ये हवामान खात्याने अवकाळी पावसाचा इशारा दिला आहे. काही जिल्ह्यांना येलो तर काही जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट दिला आहे

राज्यातील हवामानात गेल्या काही दिवसांपासून मोठे बदल होत आहेत. फेब्रुवारीच्या मध्यांनातच राज्यात उन्हाचे चटके जाणवायला लागले आणि कमाल तापमान ४० अंश सेल्सिअस जवळ पोहचले. मार्चच्या पूर्वार्धात हवामान खात्याने उष्णतेच्या लाटेचा इशाराही दिला. तर आता याच मार्च महिन्यात राज्य६ अवकाळी पाऊस बरसत असून पावसाचे येलो व ऑरेंज अलर्ट दिले जात आहेत.

हवामान खात्याने २० मार्चपर्यंत राज्यात अवकाळी पावसाचा इशारा दिला होता. आता गुरुवारी राज्यातील जवळपास सर्वच जिल्ह्यांमध्ये जोरदार पाऊस बरसणार असल्याचा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे. राज्यातील तब्बल २१ जिल्ह्यांना पावसाचा पान २ वर







# जिल्ह्यात शोभा यात्रांचा जल्लोष

## मिरवणुकांसह विविध कार्यक्रमांद्वारे उत्साह

**। रायगड। जिल्हा प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यामध्ये घरोघरी गुढीपाडवा साजरा करण्यात आला. या निमित्ताने रायगड जिल्ह्यात हिंदू नव वर्ष वेगवेगळ्या कार्यक्रमांतून साजरा करण्यात आला. यावेळीवेगवेगळ्या संस्था, संघटनाच्या वतीने अलिबागसह संपूर्ण जिल्ह्यात शोभा यात्रा, मिरवणुका काढण्यात आल्या. मराठमोळा पारंपरिक पेहराव करीत तरुणाई या यात्रेमध्ये सामील झाले होते. एक वेगळा उत्साह दिसून आला. ढोल ताशांच्या गजरात हा दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

रायगड जिल्ह्यामध्ये ग्रामीण व शहरी भागात घरोघरी गुढी उभारण्यात आली. त्यानंतर विधीवत पूजा करण्यात आली. एकमेकांना हिंदू नववर्षाच्या शुभेच्छा देत हा उत्सव जल्लोषात साजरा करण्यात आला. गुढीपाडव्याचे औचित्य साधत गुरुवारी (दि.१९) रायगड जिल्ह्यात ३० हून अधिक ठिकाणी शोभा यात्रा काढण्यात आल्या. ठिकठिकाणी मिरवणुका काढून पारंपरिक पध्दतीने ढोल ताशांच्या गजरात नृत्यांचे सादरीकरण करण्यात आले. गुढी पाडव्या निमित्ताने काढण्यात येणाऱ्या मिरवणुका व शोभा यात्रेच्यावेळी मर्दानी खेळांचे प्रदर्शन भरविले होते. लहान मुलांपासून तरुण वर्ग व ४० वयोगटापर्यंत अनेक मंडळी यामध्ये सहभागी झाले होते.

शोभा यात्रेसोबत वेग-वेगळे ऐतिहासिक क्षणचित्रे, ढोल ताशांचा गजर, लेझीम, लाठीकाठीचे प्रदर्शन भरविण्यात आले. एक वेगळा उत्साह प्रत्येकाच्या चेहऱ्यावर दिसून येत होता. शहरी भागासह ग्रामीण भागातील अनेक तरुणांनी सकाळी एकत्र येत नववर्षाचे स्वागत जल्लोषात केले. काहींनी दुचाकीवर प्रभात फेरी काढली. या प्रभात फेरीला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. जिल्ह्यात शोभा यात्रांसह संध्याकाळी दहाहून अधिक ठिकाणी सांस्कृतिक, सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमांमध्ये हजारोच्या संख्येने नागरिकांनी सहभागी होऊन मराठी व महाराष्ट्रातील संस्कृतीचे दर्शन घडवून आणले.

# अल्पवयीन मतीमंद मुलीवर बलात्कार

## आरोपीस १० वर्षे सश्रम कारावास

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पीडित मुलगी पाताळगंगा नदीवरून कपडे धुवुन घरी परत येत असतांना आरोपी लिंगाप्पा मल्लया पुजारी याने मुलीला त्याच्या ताब्यातील दुचाकीवर जबरदस्तीने बसवुन आयओसी कंपनीच्या मागे असलेल्या झाडी झुडपात नेवुन तिच्यावर जबरदस्तीने शारीरिक संबंध केले.

सदर प्रकरणी आरोपी लिंगाप्पा मल्या पुजारी याला पनवेल येथील मे. विशेष न्यायाधीश (पोक्सो) यांनी दोषी ठरवून पाच वर्षे सक्तमजुरीची शिक्षा आणि रक्कम २५,००० दंड, दंड न भरल्यास सहा महिने सक्तमजुरीची शिक्षा, पाच वर्षे सक्तमजुरीची शिक्षा आणि रक्कम रु. २५,००० दंड, दंड न भरल्यास सहा महिने सक्तमजुरीची शिक्षा सहा वर्षे सक्तमजुरीची शिक्षा आणि रक्कम रु. ५०,००० दंड, दंड न भरल्यास एक वर्ष सक्तमजुरीची शिक्षा अशी शिक्षा ठोठावली तसेच सदर दंडाची सर्व रक्कम यातील अल्पवयीन पीडित मुलीस नुकसान भरपाई देण्याचे आदेश करण्यात आला आहे.

पीडितेस नुकसान भरपाई मंजूर करणेबाबत जिल्हा विधी सेवा प्राधिकरणास प्रस्ताव पाठविण्यात आलेला आहे.

न्यायालयात फिर्यादी व पीडिता यांचे जबाब नोंदविण्यात आले तसेच सदर घटनेवेळी हजर असणाऱ्या महिलांचेदेखील लेखी जबाब नोदविण्यात आले. त्यामुळे आरोपीविरुद्ध खोपोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. त्यानंतर तपासाअंती सदर गुन्हयाचे कामी दोषारोपपत्र मे. न्यायालयात सादर करण्यात आले आणि पनवेल येथिल विशेष पोक्सो न्यायालयात सदर सटल्याची सुनावणी पूर्ण झाली. याकामी सरकारपक्षातर्फे विशेष सरकारी वकील, प्रतिक्षा बडे वारंगे यांनी काम पाहिले. सरकारपक्षातर्फे १० साक्षीदार तपासण्यात आले. त्यामध्ये पिडीता, पिडीतेची आई. शेजारील महिला यांची साक्ष तसेच तपासिक अधिकारी ए.पी. आय. कल्याणी पाडोळे यांची साक्ष महत्वाची ठरली. तसेच कोर्ट पैरवी म.पो.शि. वंदना राठोड आणि पो. शि. ९९९ स्वप्निल पानसरे यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

सदर खटल्याचेकामी विशेष सरकारी वकील, प्रतिक्षा वडे वारंगे यांनी न्यायालयासमोर केलेला युक्तिवाद ग्राह्य धरून न्यायालयाने आरोपी लिंगप्पा मल्लया पुजारी, याला वर नमुद केल्यानुसार भारतीत दंड संहितेनुसार १० वर्षे सक्तमजुरीची शिक्षा व एकूण रक्कम रु. १,००,००० दंड अशी शिक्षा ठोठावली आहे. सदर खटल्याच्या निकालाकडे पनवेल आणि खोपोली परिसरातील लोकांचे लक्ष लागून राहिलेले होते.

# वृद्ध महिला बेपत्ता

**पनवेल** : वृद्ध महिला राहत्या घरातून कुठेतरी निघून गेल्याने ती हरविल्याची तक्रार उलवा पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. विजया दिनकर वानखडे वय ७८ वर्ष, उंची ५ फुट २ इंच, रंग-सावळा, बांधा सडपातळ, चेहरा गोल, नाक-नकटे अंगात नेसणीस पिवळया रंगाची साडी त्यावर लाल रंगाचे टिपके, सफेद रंगाचा ब्लाउज, व जांभळ्या रंगाची पर्स, सोबत मोबाईल फोन आहे . या महिलेबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी उलवा पोलीस ठाणे किंवा सपोनि कृष्णा पाटील मो.नं.७०२१२०२०७५ येथे संपर्क साधावा.

# कामोठे-बदलापूर नवीन रेल्वे मार्गाचा प्रस्ताव गतीत

## कासगाव स्थानक उभारणीची हालचाल

**। पनवेल ग्रामीण । प्रतिनिधी ।**

हार्बरमार्गांवरील कामोठे ( मानसरोवर ) ते बदलापूर दरम्यान नवीन रेल्वे मार्ग उभारण्याच्या प्रस्तावाला गती मिळाली असून या प्रकल्पासाठी सविस्तर अहवाल तयार करण्याचे निर्देश केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिले आहेत. या मार्गामुळे भविष्यात कामोठे ते बदलापूर असा थेट लोकल प्रवास शक्य होणार आहे.

याचबरोबर बदलापूर आणि वांगणी दरम्यान कासगाव येथे नवीन रेल्वे स्थानक उभारण्याच्या हालचाली सुरू झाल्या असून त्यासाठी प्रस्ताव मागविण्यात आला आहे.

सध्या बदलापूर परिसरात वाढत्या लोकसंख्येमुळे रेल्वे प्रवाशांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे.

गर्दीच्या वेळी लोकल प्रवास अत्यंत कठीण होत असून प्रवाशांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर हा नवीन मार्ग आणि कासगाव स्थानक प्रवाशांसाठी दिलासादायक ठरणार आहे.

दरम्यान, बदलापूर स्थानकाला ‘टर्मिनस’चा दर्जा देण्याचा प्रस्तावही पुढे आला असून त्यालाही सकारात्मक प्रतिसाद मिळाला आहे. तसेच तिसरी-चौथी मार्गिका पूर्ण झाल्यानंतर अतिरिक्त फलाट उपलब्ध होणार आहेत.

यामुळे भविष्यात बदलापूरपुणे दरम्यान वंदे भारत एक्सप्रेस सुरू करण्याबाबतही शक्यता व्यक्त केली जात आहे.

एकूणच, कामोठे- बदलापूर रेल्वे मार्गामुळे नवी मुंबई आणि बदलापूर दरम्यानची कनेक्टिव्हिटी सुधारून प्रवास अधिक जलद व सोयीस्कर होणार आहे.

# मोफत वाचनालयाचा होणार विद्यार्थांना फायदा

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

अंजनी माता शैक्षणिक व सामाजिक संस्थेचे अध्यक्ष तसेच भिनार गावचे पोलीस पाटील हरेश कुलकर्णी यांच्या संकल्पनेतून कै.विश्वनाथ तांबोली यांच्या स्मरणार्थ कामोठ्याचा विघ्नहर्ता मंडळ वाचनालय सह्याद्री विद्यालय टेंभुर्ली येथे मोफत वाचालय सुरू करण्यात आले.



ही संस्थेची सहावी शाखा आहे.१०० वाचनालय सुरू करण्याचा संस्थेचा मानस आहे. टेंभुर्ली येथील शिक्षक, पालक आणि मांजरे पोलीस पाटील भरत चौधरी यांचा आग्रह होता की त्यांच्याकडे वाचनालय व्हावा.त्यासाठी त्यांनी संस्थेकडे पाठपुरावा केला. म्हणून संस्थेने त्यांच्याकडे वाचनालय सुरू केले. वाचनालयाचे उद्घाटन उद्योजक सचिन तांबोळी यांच्या शुभहस्ते करण्यात आले.त्यांनी सदर वाचनालय साठी मोठी आर्थिक मदत केली. संस्थेचे प्रास्ताविक सचिव जगदिश भोईर पोलीस पाटील साकुर्ली यांनी सादर केले. तर उपाध्यक्ष स्वागत विशे यांनी वाचनाचे महत्त्व काय आहे, हे सांगितले.

ग्रामविकास अधिकारी दीपिका परटोले, किरण जाधव,योगेश बांगर, दिपक देशमुख, प्रमोद पोंढेकर यांनी सुद्धा आपल्या भाषणातून प्रबोधन केले. प्रमुख वक्ते नवनीत जी यशवंतराव यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. सदर कार्यक्रमासाठी जयवंत आरज, शाहू भोसले,सुमित पानसांडे, अजय पाटील, संजय पुर, अक्षय सुळे, काशिनाथ चौधरी, हरिश्चंद्र विशे, भरत डोहले, वसंत चौधरी, सुरेश चौधरी, वैभव विशे हे मान्यवर उपस्थित होते. सदर कार्यक्रमासाठी संस्थेचे प्रसिद्धीप्रमुख संदिप आरज, सतीश कुलकर्णी, आदिनाथ देशमुख, शाळेचे मुख्याध्यापक देशमुख व सर्व शिक्षक वृंद यांनी विशेष मेहनत घेतली. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेचे शिक्षक पांडुरंग भेरे यांनी केले तर आभार प्रदर्शन संस्थेचे सचिव जगदिश भोईर यांनी केले.

# अन्न व औषध प्रशासन तर्फे प्रशिक्षण




**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेल, कळंबोली, नवीन पनवेल, खांदा वसाहत परिसरातील सर्व अन्न व्यावसायिकांना अन्न व औषध प्रशासन तर्फे प्रशिक्षण व मार्गदर्शन करण्यात आले .

अन्न सुरक्षा व मानदे कायदा, २००६ व विनियमन २०११ फोस्टॅक ट्रेनिगबाबत पनवेल शहरातील हॉटेल सुरुची बॅन्केट हॉल येथे प्रशिक्षण व मार्गदर्शन करण्यात आले . यावेळी पदनिर्देशित अधिकारी तथा कार्यालय प्रमुख अन्न व औषध प्रशासन नि.डी.मोहिते व अन्नसुरक्षा अधिकारी निकम यांनी उपस्थितीत ७० व्यावसायिकांना मार्गदर्शन केले.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून नगरसेवक राजू सोनी यांची उपस्थिती महत्वाची होती. तसेच हॉटेल सुरुची बॅन्केट हॉलचे अनिल शेणॉय हे सुद्धा व्यासपीठावर उपस्थित होते.

यावेळी केंद्रीय अन्न सुरक्षा मानदे प्राधिकरणाच्या ईट राईट या उपक्रमांतर्गत अन्नपदार्थाचे सुरक्षित उत्पादन व हाताळणी याबाबत अन्नपदार्थ हाताळणाऱ्या व्यक्तींसाठी ट्रेनिंग घेणे आवश्यक आहे. सदर बाबत संपूर्ण माहिती संकेतस्थळावर उपलब्ध आहे. सदर प्रशिक्षण अन्न व औषध प्रशासनामार्फत केंद्र शासनाचे मान्यता प्राप्त थर्ड पार्टी ऑडिटर कडून देण्यात येणार आहे.

# ‘कोमसाप उरणचे कविसंमेलन प्रेरणादायी’

**। तळा । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यातील कोमसाप उरण शाखेचे कवि संमेलन अन्य कवि व साहित्यिकांना प्रेरणादायी ठरेल, असे महत्व पूर्ण विचार कोमसाप कार्याध्यक्ष डॉ.प्रदीप ढवळ यांनी व्यक्त केले.




ते मधुबन कट्टा कोमसाप शाखा उरण यांच्या १२५ व्या साहित्य सोहळ्याच्या उद्घाटक प्रसंगी बोलत होते. कोमसापचे विश्वस्त तथा मार्गदर्शक रायगड भूषण साहित्य रत्न एल बी पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली उरण शाखेचे कार्य कौतुकास्पद आहे. पद्मश्री मधुभाईंनी ज्या भावनेने लावलेले कोमसापचे रोप उरण शाखेकडूनही बहरताना दिसत आहे. संपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन प्रेरणादायी ठरणारे आहे.

विश्वस्त साहित्यरत्न एल.बी. पाटील, जिल्हाध्यक्ष संजय गुंजाळ जिल्ह्यातील शाखांकडून साहित्यसेवा करून घेत आहेत. दहा वर्षे पाच महिने १२५ अखंडपणे दरमहा घेण्याचे वाखाणण्याजोगी कामगिरी झाली आहे.यावेळी संमेलनाध्यक्ष साहित्यरत्न रायगडभूषण प्रा.एल.बी पाटील, कोमसाप का.स.जयू भाटकर, रायगड अध्यक्ष संजय गुंजाळ, कोषाध्यक्ष गौपाळ शेळके, रायाप्पा माशाळे, सुभाष कुडके, लवेंद्र मोकळ, गझलकारा ज्योत्स्ना राजपूत, डॉ.सुभाष कटकदौड, चंद्रकांत मुकादम आदी उपस्थित होते.

प्रास्ताविक शाखाध्यक्ष मच्छिंद्र म्हात्रे यांनी केले. कप्तान योगेश म्हात्रे, दिग्दर्शक वसंत चिरलेकर, आदर्श शिक्षक स.ज.पाटील, ए.डी.पाटील, कृष्णा पाटील, वैशाली भिडे, आदी जिल्ह्यातील २५ सामाजिक सेवकांचा आणि साहित्य क्षेत्रातील २५ साहित्यिकांचा सत्कार हे कार्यक्रमाचे वैशिष्ट्य ठरले.

कवी रामचंद्र म्हात्रे गंध मातीचा, कवी न.ग.पाटील यांच्या आनंदाचे दोहे, मोगऱ्याचा गंध या पुस्तकाचे प्रकाशन मान्यवरांच्या शुभहस्ते करण्यात आले.

सूत्रसंचालिका रंजना केणी, संपदा ठाकूर यांच्या सुरेख संचालनात ज्योत्स्ना राजपूत सिध्देश लखमदे, जनार्दन सताणे, वैशाली भिडे, अजय शिवकर, संजना जुवाटकर, अनिल भोईर, शिवप्रताप पंडित रमण पंडित, अनंत पाटील, दिप्ती कुलकर्णी दौलत पाटील, निलेश म्हात्रे, संजय पवार, सुभाष कुडके, रायाप्पा माशाळे संजीव पाटील, हेमंत पाटील आदी २५ कवींच्या कवितांचा प्रेक्षकांना आनंद मिळाला. मधुबन कट्टा अध्यक्ष रामचंद्र म्हात्रे, शाखाध्यक्ष मच्छिंद्र म्हात्रे आणि शाखेने सुव्यवस्थेत कार्यक्रम संपन्न केला.

# नागोठण्याजवळील रुची हॉटेलसमोर तिहेरी अपघात

**। नागोठणे । प्रतिनिधी ।**

मुंबई गोवा महामार्गावर नागोठणे हद्दीत महामार्ग रुंदीकरणाचे काम मोठ्या प्रमाणात प्रगतीपथावर आहे. महामार्गावर चौपदरीकरणाची कामे सुरू असतानाच जाणार येणाऱ्या लेनचे डायवर्जन लक्षात न आल्याने अपघात घडत आहेत. असाच एक अपघात एसटी बस, डंपर व कार मध्ये घडला आहे.

या अपघातात एसटी चालक केशव सोनवणे, सध्या रा. ओझरवाडी, पो. ता. चिपळूण, जिल्हा रत्नागिरी (मूळ रा. सोनवणेवाडी, ता. अहमदपूर, जि. लातूर हे किरकोळ जखमी झाले. त्यांच्यावर नागोठणे प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचार करण्यात आले. तरी अपघातात एसटी बस, डंपर तसेच होंडा बी आर व्ही कार या तीन वाहनांचे नुकसान झाले आहे.

**अपघातात एस टी चालक जखमी**

**डंपर चालकाने दारूच्या नशेत केला अपघात**

एस टी बस चिपळूण ते बोरिवली अशी जात असताना मुंबई बाजूकडून भरधाव वेगाने आलेल्या आयवा डंपर चालकाने दारूच्या नशेत एसटी बसला समोरासमोर धडक दिल्याने हा अपघात घडला. एसटी चालक केशव सोनवणे यांच्या फिर्यादीनुसार डंपर चालक पंकजकुमार ब्रीज पाल, सध्या रा. वडखळ, ता. पेण, जि. रायगड (मूळ रा. महमूद नगर, ता. जि. मुजफ्फानगर उत्तर प्रदेश) याच्या विरोधात नागोठणे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**पान १ वरून**

## आज चवदार तळ्यावर लाखो अनुयायी

सामाजिक अशा विविध संघटनांच्या प्रबोधन सभा, शिबिरांचा समारोप आणि सांस्कृतिक कार्यक्रमांमुळे महाडमध्ये सामाजिक समतेचा संदेश पुन्हा एकदा घुमणार आहे. या ऐतिहासिक लढ्याच्या शतक महोत्सवी वर्षाची सुरुवात करण्यात येणार आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी २० मार्च १९२७ रोजी महाड येथील चवदार तळ्याच्या पाण्याला स्पर्श करून सामाजिक समतेसाठी ऐतिहासिक लढा उभारला. या क्रांतिकारी घटनेच्या स्मरणार्थ उद्या २० मार्च रोजी चवदार तळे सत्याग्रहाचा ९९ वा वर्धापन दिन महाडमध्ये मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार आहे.

या निमित्ताने देशभरातून लाखो आंबेडकरी अनुयायी महाडमध्ये दाखल होणार आहेत. त्यांच्या सोयीसाठी जिल्हा प्रशासन आणि महाड नगरपालिका प्रशासनाकडून तयारी पूर्ण केली आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार, केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले, सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाठ, रोजगार हमी मंत्री भरत गोगावले, महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे, उद्योग मंत्री उदय सामंत यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत. तसेच खासदार सुनील तटकरे, वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर, आदी आंबेडकरी नेतेही यावेळी उपस्थित राहणार आहेत.२० मार्च रोजी सकाळी साडेआठ ते साडेनऊ या वेळेत समता सैनिक दलाचे संचलन होणार आहे. त्यानंतर विविध संघटनांच्या अभिवादन सभा आणि जाहीर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी दहा वाजण्याच्या सुमारास चवदार तळे येथे रायगड पोलीस दलाकडून डॉ. आंबेडकरांना मानवंदना दिली जाणार आहे.

महाड येथील चवदार तळे येथे जाण्यासाठी कार्यकर्ते सज्ज झाले आहेत. मुंबई गोवा महामार्गावरील कोलाडपासून महाड पर्यंत ठिकठिकाणी नास्त्यासह पिण्याच्या पाण्याची मोफत व्यवस्था वेगवेगळ्या सामाजिक संस्थाच्या मार्फत करण्यात आली आहे. महाडमध्ये दाखल होणाऱ्या भीम अनुयायींच्या वाहनांसाठी पार्कींगची व्यवस्था करण्यात आली आहे. विविध संघटनांच्या प्रबोधन सभा, शिबिरांचा समारोप आणि सांस्कृतिक कार्यक्रमांमुळे महाडमध्ये सामाजिक समतेचा संदेश पुन्हा एकदा घुमणार आहे.दरम्यान भीम ज्योतही महाडमध्ये काही संघटनाच्या वतीने काढण्या येणार आहे. सफेद वस्त्र परिधान करून लाखो अनुयायी या क्रांती भूमीमध्ये दाखल होणार आहे. या कालावधीत कोणताही गैरप्रकार, तसेच कायदा व सुव्यवस्था बिघडू नये यासाठी रायगड पोलिसांनी कंबर कसली आहे. कोलाडपासून ठिकठिकाणी वाहतूक पोलीस, महाड शहरात प्रवेश करताच ठिकठिकाणी पोलिसांचा बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. ५०० हून अधिक पोलिस अधिकारी व कर्मचारी या ठिकाणी तैनात असणार आहेत.चवदार तळे सत्याग्रहाच्या ९९ व्या वर्धापन दिनानिमित्त कडक पोलीस बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे.

## भारतावर महासंकट!

गॅस वाहतुकीसाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. सध्या या मार्गावरील जहाज वाहतूक धोक्यात आल्याने विमा कंपन्यांनी प्रीमियम वाढवला असून, जहाजांच्या वाहतुकीवर कडक निर्बंध लादण्यात आले आहेत.परिस्थितीचे गांभीर्य ओळखून केंद्र सरकार आणि सरकारी तेल कंपन्यांनी पर्यायी मार्ग शोधण्यास सुरुवात केली आहे. रशिया, संयुक्त अरब अमिराती आणि अमेरिका यांसारख्या देशांकडून तातडीने गॅस उपलब्ध करून घेण्यासाठी राजनैतिक पातळीवर प्रयत्न सुरू झाले आहेत.

## पाकिस्तान अणुबॉम्ब घेऊन थेट युद्धात?

असे सांगितले आहे. इराणकडून आणखी मोठे हल्ले होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे इतर आखाती देशांच्या तेल प्रकल्पांना इराणने लक्ष्य केलं तर हे आखाती देश इराणला जोरदार प्रत्युत्तर देण्याची शक्यता आहे. यामध्ये सौदी अरेबियाचाही समावेश आहे.

इराण आणि सौदी अरेबिया यांच्यात एक संरक्षण सहकार्य करार झालेला आहे. या करारानुसार एका देशावर झालेला हल्ला हा दुसऱ्या देशावर झालेला हल्ला मानला जातो. त्यामुळेच इराणने सौदी अरेबियावर हल्ला केला तर या करारानुसार पाकिस्तान हादेखील या युद्धात उतरू शकतो. पाकिस्तान हा अणुबॉम्ब असलेला देश आहे. त्यामुळे सौदी अरेबियावर झालेल्या हल्ल्यानंतर पाकिस्तानदेखील या युद्धात ओढला जाऊ शकतो. करारानुसार पाकिस्तानला युद्धात उडी घ्यावीच लागणार आहे. त्यामुळे आता भविष्यात नेमके काय होणार? पाकिस्तानने युद्धात उडी घेतलीच तर भविष्यात अणुबॉम्ब हल्ले केले जाणार का? असे प्रश्न उपस्थित झाल्याने जगाची चिंता वाढली आहे.

## ट्रान्सवर्ड फर्टीकेम कंपनीत आग

गावांना व स्थानिक नागरिकांना मोठ्या प्रमाणावर सहन करावा लागला. घटनेची माहिती मिळतात धाटाव अग्निशमन दलाने तातडीने धाव घेतली आणि आग नियंत्रणात आणली.

दरम्यान, लागलेल्या आगीत कंपनीचा पुढील टॉवर पूर्णपणे जळून खाक झाला असून इमारतीवरील तांत्रिक साहित्याचे मोठे नुकसान झाले आहे. आगीचे नेमके कारण स्पष्ट झालेली नाही मात्र यामध्ये जीवितहानी झाली नसून मोठी आर्थिक हानी झाली असल्याचे समोर आले आहे. विशेष म्हणजे औद्योगिक वसाहतीमध्ये नुकताच सुरक्षा सप्ताह साजरा करण्यात आला. या घटनेच्या माध्यमातून कारखान्याम धील सुरक्षेबाबत जनजागृती करण्यात आली होती. मात्र त्यानंतर लगेच घडलेल्या आगीच्या घटनेमुळे धाटाव औद्योगिक वसाहतीमध्ये खरोखरच कारखाने आणि कामगार सुरक्षित आहेत का असा गंभीर प्रश्न स्थानिक रहिवाशांकडून उपस्थित केला जात आहे. औद्योगिक वसाहतीमधील आगेच्या वाढत्या घटनांमुळे लगतच्या गावामध्ये भीतीचे वातावरण आहे. प्रशासनाने या कंपन्यांच्या ऑडिटकडे गांभीर्याने लक्ष देणे गरजेचे आहे, असेही बोलले जात आहे.

## उसर-पोयनाड बैलखिंड मार्गे रस्ता फास्टट्रॅकवर

ते उसर दरम्यान बैलखिंड मार्गे प्रस्तावित रस्त्याच्या कामासाठी हालचाली सुरू केल्या आहेत. भूसंपादन आणि वनविभागाच्या परवानगीसाठी साडे सात कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. वनविभागाच्या मान्यततेनंतर लागलीच या मार्गाच्या कामाचे काम सुरू होणार आहे अशी माहिती सार्वजनिक बांधकाम विभाग अलिबागचे कनिष्ठ अभियंता साईश कांबळे यांनी दिली. या मार्गामुळे उसर ते पोयनाड हे पाऊण तासाचे अंतर अवघ्या दहा ते पंधरा मिनिटांवर येणार आहे. गेल कंपनी प्रशासनानेही या मार्गासाठी शासनस्तरावर पाठपुरावा सुरु केला असल्याचे विश्वसनिय वृत्त हाती आले आहे.

## महाराष्ट्राला अवकाळीचा तडाखा

यलो अलर्ट तर ७ जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे.गुरुवारी उत्तर कोकणातील जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी विजांच्या कडकडाटासह वादळ, हलका ते मध्यम पाऊस आणि ४० ते ५० किलोमीटर प्रति तास वेगाने वारे वाहण्याची दाट शक्यता आहे. दक्षिण कोकण आणि गोवा भागातील जिल्ह्यांमध्ये तुरळक ठिकाणी गारपीट, विजांच्या कडकडाटासह वादळ, हलका ते मध्यम पाऊस आणि ४० ते ५० किलोमीटर प्रति तास वेगाने वारे वाहण्याची दाट शक्यता आहे.

**या जिल्ह्यांना येलो अलर्ट**

हवामान खात्याच्या अंदाजानुसार, राज्यातील रत्नागिरी, धुळे, नंदुरबार, नाशिक घाट परिसर, पुणे, पुणे घाट परिसर, कोल्हापूर घाट परिसर, कोल्हापूर, सातारा, सातारा घाट परिसर, सांगली, सोलापूर, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव, अकोला, अमरावती, भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, नागपूर, वर्धा, यवतमाळ या जिल्ह्यांना पावसाचा यलो अलर्ट देण्यात आला आहे.

**या जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट**

हवामान विभागाने राज्यातील ज्या जिल्ह्यांना पावसाचा ऑरेंज अलर्ट दिला आहे त्यामध्ये जळगाव, नाशिक, अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, बीड या जिल्ह्यांचा समावेश आहे कोकणात, मध्य महाराष्ट्रात आणि मराठवाडा तसेच विदर्भात सुद्धा तुरळक ठिकाणी ढगांच्या गडगडाटासह विजांचा कडकडाटसह अवकाळी पावसाचा शक्यता वर्तविण्यात आली आहे. तसेच यावेळी सोसाट्याचा वारा वाहण्याची शक्यता देखील वर्तविण्यात आली आहे. मुंबई शहर आणि उपनगरांमध्ये आकाश प्रामुख्याने निरभ्र असेल. कमाल आणि किमान तापमान अनुक्रमे ३२ अंश सेल्सिअस आणि २२ अंश सेल्सिअस राहण्याची शक्यता आहे.

# किल्ले रायगड येथे शिवपुण्यतिथी अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन

**। रायगड । प्रतिनिधी ।**

प्रतिवर्षीप्रमाणे छत्रपती शिवाजी महाराजांची ३४६ वी पुण्यतिथी, चैत्र पौर्णिमा १९४८, गुरुवारी (दि.०२) किल्ले रायगड येथे साजरी करण्यात येत असून छत्रपतींना आदरांजली वाहण्याकरिता श्री शिवपुण्यतिथी अभिवादन कार्यक्रमास उपस्थित रहावे, असे आवाहन श्री शिवाजी रायगड स्मारक मंडळ, स्थानिक उत्सव समितीचे अध्यक्ष त्रिंबक पुरोहित यांनी केले आहे.

रायगडावर जे जे येतील त्यांनी त्यांनी चढत आणि उतरत असता प्रातः स्मरणीय छत्रपती शिवरायांना आठवावे, जीवित तृणवत मानावे. आपण या महान देशाच्या महान परंपरेतले एक सैनिक आहोत हे ध्यानी घ्यावे. रायगडावरील प्रत्येक पाषाणखण्ड शिवचरित्राची स्त्रोत्र गात आहे. येथील प्रत्येक वृक्ष आणि लता स्वातंत्र्यवीरांची जयगीते गात आहेत. या अवघ्या वीरांचा ते मुकुटमणी छत्रपती शिवरायांनी तर अंतीम शयन इथेच केले आहे. त्यांचे अंतीम श्वास याच वातावरणाशी, मातीशी एकजीव झाला आहे. छत्रपतींच्या पदस्पर्शाने पवित्र झालेली गडावरची माती कपाळी लावावी आणि भारतमाता, हिंदूधर्म रक्षणाकरिता व उन्नती करिता संकल्प करावा हेच मागणे.

किल्ले रायगडावरील श्री शिवपुण्यतिथी अभिवादन कार्यक्रमात अनेक थोर व्यक्तींनी हजर राहून मानवंदना दिली आहे. यात भालजी पेंढारकर, ले जन. शंकररावजी थोरात, एकनाथ रानडे, प्रा. शिवाजीराव भोसले, राजमाता विजयाराजे शिंदे, शरद पवार, सरसंघचालक बाळासाहेब देवरस, जगजीवनराम, मोहन धारिया, बाबासाहेब पुरंदरे, गो. नि. दांडेकर, दत्तोपंत ठेंगडी, मोरोपंत पिंगळे, इंदिरा गांधी, ग्यानी झैलसिंग, जयंतराव टिळक, सरसंघचालक रज्जूभैया, सरसंघचालक सुदर्शन, शंकरराव चव्हाण, महावीर चक्र विजेते सु. मेजर कृष्णा सोनावणे, अशोक सिंघल, आचार्य धर्मेंद्र, अटलबिहारी वाजपेयी, लालकृष्ण अडवाणी, मनोहर पर्रिकर, देवेंद्र फडणवीस, सरसंघचालक मोहन भागवत, स्वामी नरेंद्रमहाराज, ज्योतिरादित्य शिंदे, अमित शहा यांचा समावेश आहे.

**श्री शिवपुण्यतिथी अभिवादन कार्यक्रम**

चैत्र शुध्द १४, बुधवार दि.०१ एप्रिल २०२६ रोजी सायं. ७.०० वा.,राजदरबारात सांस्कृतिक कार्यक्रम, मान्यवरांच्या मुलाखती व शाहिरी कार्यक्रमही रात्र शाहिरांची तसेच रात्रौ १० वाजता श्री जगदिश्वर मंदिरात महरिजागरफ चैत्र पौर्णिमा १५, गुरुवार दि.०२ एप्रिल २०२६ पहाटे ५.०० वा. श्री जगदिश्वर पुजा सकाळी ६.०० वा. महनुमान जयंतीफ सकाळी ८.०० वा. श्री छत्रपती शिवाजी महाराजांच्या समाधीची पूजा, सकाळी ९.०० वा. राजदरबार येथे श्री शिव प्रतिमा पूजन, छत्रपती शिवरायांना आदरांजली, ११.०० वा. छत्रपतींच्या प्रतिमेची पालखीतून मिरवणूक राजदरबार ते श्री शिवसमाधी, दुपारी १२:३० वा. छत्रपतींना मानवंदना त्यानंतर शिवभक्तांना महाप्रसादाचे वितरण.

# बाईक रॅलीला उत्स्फुर्त प्रतिसाद



| आगरदांडा | प्रतिनिधी |

मुरुडमध्ये गुढीपाडवा सण सांस्कृतिक व धार्मिक उपक्रमांनी मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. या वर्षीही कुणाल सतविडकर यांच्या मार्गदर्शनाखाली गुढीपाडव्यानिमित्त हिंदू नववर्षाच्या स्वागतासाठी तरुणांनी डोक्यावर भगवा फेटा, हातात झेंडे व पारंपरिक पोशाख परिधान केले होते. यावेळी त्यांनी 'कोटेश्वरी माते की जय', 'जय भवानी जय शिवाजी'च्या घोषणांनी नववर्षाचे स्वागत केले आणि प्रत्येकाला शुभेच्छा दिल्या. यादरम्यान, मुरूड शहरामध्ये मोटार सायकलवरून रॅली काढण्यात आली होती. ही रॅली मुरुड कोटेश्वरी मंदिरापासून ते शहरातील विविध ठिकाणी काढण्यात आली होती. यावेळी कुणाल सतविडकर, रूपेश जामकर, प्रमोद भायदे, आदेश दांडेकर, आशिलकुमार ठाकुर, राहुल कासार, योगेश सुर्वे, महेंद्र मोहिते, आकाश खोत, सिद्धेश खेडेकर, सतेज विरुकुड, प्रशांत कासेकर, अमित गोंजी आदिंसह तरुण वर्ग नागरिक सहभागी झाले होते. रॅली दरम्यान मुरुडचे पोलीस निरीक्षक परशुराम कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.



● गुढीपाडव्यानिमित्त लहान मुलांनी नवीन कपडे घालून गुढीची पूजन केले. (छायाचित्र : सुधीर नाझरे)

# नवं वर्षाचे जल्लोषात स्वागत

गुढीपाडवा म्हणजे साडेतीन मुहूर्तांपैकी एक मुहूर्त. हा सण संपूर्ण महाराष्ट्रामध्ये उत्साही वातावरणात साजरा केला जातो. तसेच, पाडव्यापासून नवीन वर्षाला सुरुवात होते. भारतीय परंपरेनुसार या दिवसाला ऐतिहासिक आणि पौराणिक असे महत्त्व आहे. रायगड जिल्ह्यातील विविध ठिकाणी गुरूवारी (दि.१९) प्रत्येकाने आपआपल्या घरासमोर रांगोळी काढून परिसर सजवला. त्यानंतर घरासमोर गुढी उभारून तिची विधीवत पूजा केली. त्यानंतर सर्वांना नववर्षाच्या शुभेच्छा देत नवं वर्षाचे जल्लोषात स्वागत करण्यात आले. काही ठिकाणी शोभा यात्रा व बाईक रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.



● गुढीपाडव्यानिमित्त पारंपरिक पद्धतीने गुढी उभारून पूजन करताना कुटुंबीय.

● अलिबागमध्ये नववर्षाच्या स्वागतासाठी ब्राम्हण उत्कर्ष मंडळ आणि अलिबागकरांच्यावतीने शोभायात्रा काढण्यात आली होती. यावेळी पारंपारिक वेशभूषेत, ढोल ताशाच्या गजरात, गुढी नाचवल्या जात होत्या. त्यात काही महिला नववारी साड्या परिधान करून मोटर सायकलवरुन सहभागी झाल्या होत्या.
(छायाचित्र: समीर मालोदे, नितिन शेडगे)











# खांदा वसाहतीत मराठी संस्कृतीचे दर्शन





(छायाचित्र: राजेश डांगळे)





● खांदा वसाहतीत गुढी पाडवानिमित्ताने मराठी नववर्षाचे जल्लोषात स्वागत करण्यात आले. नववर्ष शोभायात्रा समितीच्यावतीने भव्य-दिव्य शोभायात्रा काढण्यात आली होती. या शोभायात्रेत मराठी संस्कृतीचे आकर्षक दर्शन घडले. यावेळी मर्दानी खेळ व महिला सहभागाने कार्यक्रमाला विशेष रंगत आली. तसेचव, विविध सामाजिक संदेश देत नागरिकांचे लक्ष वेधण्यात आले. यादरम्यान संपूर्ण परिसरात उत्साह, आनंद आणि पारंपरिक वातावरण अनुभवायला मिळाले.





# तळा शहरात नववर्ष शोभायात्रेचे आयोजन

| तळा | प्रतिनिधी |

तळा शहरात गुढीपाडवा निमित्त वेदक महाविद्यालय ते श्री चंडिका मंदिर अशी नववर्ष शोभा यात्रा काढण्यात आली. जगद्गुरु रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी महाराज स्थापित रामानंद संप्रदायाच्या दक्षिण रायगड जिल्ह्याच्यावतीने या नववर्ष शोभा यात्रेचे आयोजन करण्यात आले होते. या शोभायात्रेत हजारो अनुयायी सहभागी होत हिंदू नववर्षाच्या शुभेच्छा देत विविध सामाजिक विषयांवर प्रभावी संदेश देत जनजागृती केली. रायगडसह महाराष्ट्र, गुजरात, तेलंगणा व कर्नाटक या राज्यांतील विविध जिल्ह्यांमध्येही अशाच शोभायात्रांचे आयोजन करण्यात आले होते. शोभायात्रेत सहभागी सर्व भाविकांनी पारंपरिक वेशभूषा परिधान करून उत्सवाला विशेष रंगत आणली. महिला भगिनी मोठ्या संख्येने नटून थटून सहभागी झाल्या होत्या. कलशधारी महिला, भगवे ध्वजधारी, विविध सांस्कृतिक नृत्यप्रकार तसेच सामाजिक विषयांवरील देखावे हे या शोभायात्रेचे प्रमुख आकर्षण ठरले. या शोभायात्रेत सर्व वयोगटांतील तरुण, युवती, पुरुष व महिला भाविकांचा उत्स्फूर्त सहभाग पाहायला मिळाला. सहभागी भाविकांच्या सुरक्षिततेची व सोयी-सुविधांची योग्य ती काळजी आयोजकांकडून घेण्यात आली होती.



# युईएस प्री-स्कूलमध्ये गुढीपाडवा उत्साहात





| उरण | प्रतिनिधी |

भारतीय परंपरेनुसार मराठी नववर्षाची सुरुवात गुढीपाडवा या शुभदिवसापासून होते. हिच परंपरा जपताना, गुरुवारी (दि.१९) उरणमधील यु.ई.एस. लिटिल सिड्स इंटरनॅशनल प्री-स्कूलमध्ये गुढी उभारण्यात आली. संस्थेचे अध्यक्ष चंद्रकांत ठक्कर यांनी दीपप्रज्वलन करुन कार्यक्रमाची सुरुवात केली. त्यानंतर सरस्वती मंडपाच्या प्रवेशद्वाराजवळ उभारलेल्या गुढीची विधीवत पुजा करण्यात आली. यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष मिलिंद पाडगांवकर, खजिनदार ॲड. अपूर्वा ठाकूर, सिनिअर कॉलेजच्या प्रभारी प्राचार्या डॉ. मिनाक्षी गुप्ता, स्कूल व ज्युनिअर कॉलेजच्या प्राचार्या सिमरन दहिया, समन्वयक, सिनिअर कॉलेजच्या विभाग प्रमुख, माध्यमिक, प्राथमिक व पूर्व प्राथमिक विभागातील पर्यवेक्षिका, पीटीएचे उपाध्यक्ष तसेच शिक्षक गण, पालक आणि विद्यार्थी उपस्थित होते. दरवर्षीप्रमाणे यंदाही नव्याने प्रवेश घेतलेल्या पूर्व प्राथमिक विभागातील विद्यार्थ्यांकडून पाटीवर सरस्वीतचे चित्र काढायला लावून पाटीपूजन करायला सांगण्यात आले. रांगोळी, सजावट व सर्व उपस्थितांचे स्वागत, कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन पूर्व प्राथमिक विभागातील शिक्षकांनी केले.

# माथेरानमध्ये पाडवा उत्साहात साजरा

| माथेरान | प्रतिनिधी |

गुढीपाडवा हा सण माथेरानमध्ये गुरूवारी (दि.१९) मोठ्या आनंदाने आणि उत्साहाने साजरा करण्यात आला. या निमित्ताने माथेरान मधील श्रीराम मंदिरात भक्तीपूर्ण वातावरणात पूजाअर्चा करण्यात आली. तसेच, सुश्राव्य भजनांचे कार्यक्रम ठेवण्यात आले, ते हनुमान जयंतीपर्यंत सात दिवस सुरूच असतात. त्याचबरोबर माथेरानमध्ये गुढीपाडवानिमित्त ठेवण्यात आलेले कुस्त्यांचे जंगी सामने हे खास आकर्षण ठरले. या कुस्त्यांच्या स्पर्धेत राज्यातील विविध भागांतील पैलवानांनी आवर्जून हजेरी लावून प्रेक्षकांना आकर्षित केले. त्याचबरोबर माथेरानमधील महिला वर्गाने आपआपल्या दारात रांगोळी काढून, गुढी उभारून नववर्ष सुखासमाधानाने जावो, अशी प्रार्थना केली.



परिवर्तनाची दिमाखदार चळवळ | सर्व जाती धर्मिय स्त्रियांचा सहभाग

# पेणमध्ये स्त्री अस्मितेची गुढी

| पेण | प्रतिनिधी |

स्त्री अस्मिता आणि सन्मान यांचा जागर पेण शहरात एका भव्य आणि प्रेरणादायी रॅलीच्या माध्यमातून अनुभवायला मिळाला. अंकुर ट्रस्ट व महिला अत्याचार विरोधी मंच यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या उपक्रमाने सामाजिक परिवर्तनाच्या दिशेने एक ठोस पाऊल टाकले.

कृषी उत्पन्न बाजार समितीच्या प्रांगणातून सुरू झालेली ही रॅली महात्मा गांधी वाचनालयापर्यंत रंगांनी नटलेली होती. यावेळी पारंपरिक वेशभूषा, लोकनृत्य आणि भुगा घालत महिलांनी आपली सांस्कृतिक ओळख जपत स्त्रीशक्तीचा जागर केला. या रॅलीचे नेतृत्व ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या डॉ. वैशाली पाटील यांनी केले. या यात्रेत सर्व जाती, धर्म आणि विविध सामाजिक स्तरांतील महिलांचा उत्स्फुर्त सहभाग पाहायला मिळाला. एकल महिला, मतिमंद आणि अनाथ मुलींनाही सन्मानाने सहभागी करून घेण्यात आले. त्यामुळे ही रॅली केवळ एक कार्यक्रम न राहता समावेशकतेचा आणि समानतेचा संदेश देणारी चळवळ ठरली. आई डे केअर, चाईल्ड हेवन, अंकुर ट्रस्ट तसेच बाल संस्कार वर्ग समर कॅम्पमधील मुलेही सहभागी झाली होती. तसेच, शासकीय आदिवासी मुलींच्या वसतिगृहातील मुलींचाही सहभाग उल्लेखनीय ठरला. त्याचबरोबर बालसंस्कार समर कॅम्प, चाईल्ड हेवन आणि अंकुर ट्रस्टच्या विद्यार्थ्यांनी स्वच्छतेवर आधारित नाटिका सादर करून नवीन वर्षाचे स्वागत सादर केले. तसेच, सामाजिक एकोप्याचा संदेश देणारे नृत्य सादर करून उपस्थितांची मने जिंकली. या रॅलीची सांगता महात्मा गांधी वाचनालयात करण्यात आली. यावेळी आपल्या प्रास्ताविकात डॉ. वैशाली पाटील यांनी, मराठी नवीन वर्षाच्या शुभेच्छा देत वंचित आणि दुर्लक्षित घटकांमध्ये एकजूट निर्माण होणे, तसेच सर्व धर्मांमध्ये एकोपा आणि समरसता प्रस्थापित होणे ही परिवर्तनवादी चळवळीची गरज असल्याचे प्रतिपादन केले.





## ट्रम्पचा माज उतरला

आखाती युध्दाला तीन आठवडे पूर्ण होत आहेत. आपण इराणवर हल्ला करून एका दिवसात युध्द संपवून टाकू असा डोनाल्ड ट्रम्प यांचा माज होता. ते आता जमिनीवर आले आहेत. सगळ्या जगात इराणला एकटे पाडायला निघालेले ट्रम्प आणि त्यांची अमेरिका हीच आता एकटी पडली आहे. इराणी लोक खूप स्मार्ट आहेत, त्यांचा आय़क्यू खूप अधिक आहे अशी त्यांची तारीफ ट्रम्प करू लागले आहेत. हा बुध्दिबळाचा डाव चालू असून इराणी लोकही जबरदस्त चाली खेळत आहेत व आपल्याला सहजासहजी विजय मिळणार नाही हे ट्रम्प यांनी मान्य केले आहे. ट्रम्प यांचा उन्मत्तपणा पाहता ही कबुली म्हणजे अमेरिकेने पराभवच मान्य केल्यासारखे आहे. युध्दाची सुरुवात केली इस्रायलने. किंबहुना त्यानेच भरीला पाडून अमेरिकेला युध्दात ओढले. पहिल्याच दिवशी खामेनी मारले गेल्यामुळे डाव आपण जिंकलाच अशा समजात हे दोघे होते. पण इराणचे सरकार, पोलिस, प्रशासन आणि लष्कर या सर्वांच्या व्यवस्थांची मुळे खूप खोलवर गेलेली असल्याचे गेल्या १८ दिवसात स्पष्ट झाले आहे. या काळात इराणचे अनेक वरिष्ठ अधिकारी ठार झाले. अगदी कालच इराणचे सर्वोच्च सुरक्षा अधिकारी अली लारिजानी आणि इस्लामी रेव्होल्यूशनरी गार्डच्या बासिजचे प्रमुख जनरल गुलाम रेझा सुलेमानी यांना आपण हवाई हल्ल्यात ठार केले असा दावा इस्रायलने केला. हेच लारिजानी गेल्या आठवड्यात तेहरानच्या रस्त्यांवर खुलेपणाने फिरून इस्रायलला आव्हान देत होते. त्यांचे तसे फोटोही प्रसिद्ध झाले होते. लारिजानी हे संरक्षण दलाशी संबंधित असले तरी ते अत्यंत विद्वान होते. इमॅन्युएल कांट याच्या तत्वज्ञानावर त्यांनी पीएचडी केली होती. मुत्सदेगिरीमध्ये ते अव्वल मानले जात. इराणशी चर्चा करायची झालीच तर लारिजानी हेच दरवाजे उघडू शकतील असे बोलले जात होते. पण खामेनी यांच्या हत्येनंतर सर्व इराण एक झाला व त्याने एकदिलाने आता माघार नाही अशी भूमिका घेतली. त्यात लारिजानींची भूमिकाही कठोर झाली होती. पण त्यांना मारून इस्रायलने काय मिळवले हे कळण्याच्या पलिकडचे आहे. यापूर्वी इराणमधली धर्मांध राजवट आपल्याला बदलायची आहे असे ट्रम्प सांगत होते. पण आता त्यांना व इस्रायलला तो देश नष्टच करायचा आहे असे दिसते.

### न्याय-अन्यायाची बाजू उलटली

युध्दाच्या आरंभी ट्रम्प यांनी ही लढाई जुलुमशाहीविरुध्दची असल्याचे भासवले होते. अमेरिका ही जणू काही देवदूत बनून न्याय करणार असल्याचा आव त्यांनी आणला होता. इराणचे सरकार, लष्कर जे जे काही आहे ते दुष्ट आणि नाश करण्याच्या लायकीचे आहे असा सर्व जगाचे मत व्हावे असा ट्रम्प यांचा प्रयत्न होता. इराणमध्ये अराजक माजले असते तर ट्रम्प यांचे म्हणणे बरोबर होते असे आपोआप सिध्द झाले असते. निदान तसा प्रचार त्यांन करता आला असता. पण इराणने ज्या एकदिलाने व ठामपणे अमेरिकी व इस्रायली हल्ल्यांचा मुकाबला केला त्यामुळे आता ट्रम्प यांच्यावर बाजू उलटली आहे. ट्रम्प हेच जुलूम करणारे सैतान आहेत आणि गरीब बिचारा इराण त्याचा प्रतिकार करीत आहे असे चित्र तयार झाले आहे. त्यामुळे आता अमेरिकेची माघार म्हणजेच इराणचा किंवा न्यायाचा जय असे सर्व जण मानत आहेत. ते जेव्हा होईल तेव्हा सर्व जण इराणची बहुदा तारीफ करतील. त्यातच इराणने लष्करी प्रतिकारही अत्यंत धूर्तपणे केला. इस्रायलवर त्यांनी अगदी कमी किमतीच्या ड्रोनचा भरमसाठ मारा केला. त्यांना थोपवण्यासाठी इस्रायलची अत्यंत किमती क्षेपणास्त्र् नष्ट होत गेली. त्यांचे उत्पादन एकाएकी वाढवणे सोपे नाही. दुसरीकडे आपण इराणमध्ये जमिनीवर सैन्य उतरवू किंवा होर्मूझच्या आखातात नौसेना घुसवू असे ट्रम्प यांना जे वाटत होते ते फोल ठरले आहे. होर्मूझच्या आखातावर इराणी लष्कराचे कमालीचे नियंत्रण असून तेथून तेल किंवा अन्य कोणतीही वाहतूक करणारा एकही टँकर इराणच्या परवानगीशिवाय पुढे सरकणे अशक्य झाले आहे. इराणला तिथे धडा शिकवण्यासाठी अमेरिकेच्या जोडीने नाटो देशांनीही यावे असे आवाहन ट्रम्प यांनी दोन दिवसांपूर्वी केले. पण इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी, इटली यांनी ते साफ धुडकावून लावले. आता ट्रम्प त्यांना शिव्या देत आहेत.

### नाक दाबले की तोंड उघडते

आजवरच्या या घडामोडींवरून भारताने काही शिकण्यासारखे आहे. इराण हा खरे तर भारताचा जुना मित्र. शिवाय खामेनी यांना ठार करणे हे आंतरराष्ट्रीय कायदा व न्यायाच्या दृष्टीने पूर्णपणे अयोग्य होते. किंबहुना तो अमेरिकेने केलेला खून होता. त्याचा आणि इस्रायलचा निषेध करणे आवश्यक होते. नंतर इराणची युद्धनौका श्रीलंकेच्या समुद्रात बुडवून टाकण्यात आली तरीही आपण गप्प राहिलो. आता देशात गॅसची टंचाई जाणवू लागल्यानंतर मात्र आपल्याला जाग आली व इराणशी आपण चर्चा सुरू केली. अर्थात, यातून इराणने घ्यायचा तो संदेश घेतला आहे व आपल्यालाही सध्या तशीच वागणूक देणे चालू केले आहे. त्यामुळेच आज होर्मूझच्या आखातातून येणाऱ्या एकेका बोटीसाठी इराणी अधिकाऱ्यांच्या परवानगीसाठी आपल्याला अजिजी करावी लागत आहे. इराणने आपल्याला सरसकट सर्व जहाजांना संमती दिल्याचे काही माध्यमांमध्ये चालवले जाणारे वृत्त म्हणजे मोदी सरकारचा बनावट प्रचार आहे. मोदींच्या भाजपला देशामध्ये मुस्लिमांचा द्वेष करायचा आहे, जगात इस्रायल मुस्लिम देशांवर हल्ले करते आहे म्हणून त्याच्याशी मैत्री करायची आहे आणि दुसरीकडे अरब देशांकडून तेल व गॅस येत असल्याने त्यांच्याशी आपले कसे जुने नाते आहे हेही सांगत फिरायचे आहे. पण या संघर्षात भारताने इराणला दुखावले आहे. आजवर भारताने इस्रायल, अरब व इराण या त्रिकोणी टक्करीमध्ये तटस्थ भूमिका जपली होती. पण आता ती धारातीर्थी पडली आहे. आता आपली बाजू सावरून घेणे व प्रतिमेची दुरुस्ती करणे हे सोपे नाही. इराणवर हल्ले करून तो देश नष्ट केला की सर्व आखातावर आपला कबजा होईल असे स्वप्न अमेरिका पाहत होती. पण होर्मूझवरील नियंत्रण हा इराणच्या हातातला हुकुमी एक्का आहे. आता अमेरिकेसारखा बलाढ्य देशही तिथे एकटा जायला घाबरत आहे असा संदेश जगभर गेला आहे. त्यामुळे इराणचे शेजारी, पण इराणला शत्रू मानणारे कतार, संयुक्त अरब अमिराती व सौदी अरेबियासारखे अरब देशही हादरले आहेत. कारण त्यांच्याकडून जाणारे बहुतांश तेल व गॅस याच सामुद्रधुनीतून जाते. तेच जर बंद पडले तर यांच्या आर्थिक नाड्याच आवळल्या जातील. इराणने आरंभी या देशांवर हल्ले करून त्यांना पुरेसा इशारा दिला होता. आपापल्या देशातून अमेरिकेचे राजदूत बाहेर घालवून द्या इतकीच इराणची सध्याची मागणी आहे. पण तसे केले तर अमेरिका नाराज होईल व भविष्यात आपण संरक्षणदृष्ट्या उघडे पडू असे या देशांना वाटत असावे. पण या देशांचे नाक दाबून इराणने ट्रम्प यांचे तोंड उघडण्यास भाग पाडले आहे.

---

**विचार**

# जागतिक अस्थिरतेचे मूलभूत कारण काय?

***सध्या जगभरात सामरिक अस्थिरतेचे वातावरण तयार झाले आहे. या अस्थिर वातावरणामुळे जगात अणुयुद्ध सुरू होते, की काय अशी साधार भीती व्यक्त केली जात आहे. सामरिक विषयाचा गंध नसलेली मंडळी या सर्व घटनांचे खापर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या डोक्यावर फोडताना दिसतात, मात्र या जागतिक अशांततेचे मूळ अमेरिकेच्या आर्थिक पेचप्रसंगात आणि युद्धामुळे मिळणाऱ्या नफ्यात शोधावे लागेल.***



**कर्नल (नि) अनिल आठल्ये**

मराठीमध्ये एक म्हण आहे, की 'नदीचे मूळ आणि ऋषीचे कूळ शोधू नये'. त्यामागचा विचार असा, की या दोन्ही प्रश्नांची उत्तरे फार वेगळी निघतात आणि त्यामुळे प्रचलित प्रवादांना धक्का लागतोआज जगभरात सामरिक अस्थिरतेचे वातावरण तयार झाले आहे. युरोपमध्ये रशिया आणि युक्रेन यांच्यातले युद्ध गेली चार वर्षे सुरू आहे. मध्यपूर्वेत गाझा पट्टीवर इस्त्राईलचे हल्ले, लेबनॉनवर हल्ले, सिरियामध्ये अंतर्गत संघर्ष पहायला मिळत आहे. त्यात भरीस भर म्हणून इराणवर हल्ला करण्यासाठी अमेरिकेने पूर्ण तयारी केली आहे. केवळ मध्यपूर्वच नव्हे, तर आपल्या अगदी जवळ भारतीय उपखंडातही अशांततेचे वातावरण आहे. गेल्या वर्षी मे महिन्यात भारत आणि पाकिस्तानदरम्यान हवाई युद्ध झाले. त्यात सध्या फक्त युद्धविराम झाला आहे. भारताच्या संरक्षणमंत्र्यांच्या म्हणण्याप्रमाणे 'ऑपरेशन सिंदूर' अजूनही संपलेले नाही. याशिवाय पाकिस्तान आणि अफगाणिस्तानमध्ये लहान-मोठ्या कुरबुरी सुरूच असतात. नुकतीच पाकिस्तानने अफगाणिस्तानच्या सीमेवर कारवाई करून काही अतिरेक्यांना कंठस्नान घातल्याचे जाहीर केले. या सर्व जागतिक घटनांमुळे आज जगात अणुयुद्ध सुरू होते, की काय अशी साधार भीती व्यक्त केली जात आहे.

दरम्यान प्रसारमाध्यमांवर नजर टाकल्यास सामरिक विषयाचा गंध नसलेली मंडळी या सर्व घटनांचे खापर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या डोक्यावर फोडताना दिसतात. सर्वसामान्य जनतेच्या जीवनावर या सर्व जागतिक घटनांचे पडसाद उमटतात. उदाहरणार्थ मध्यपूर्वेतील पेचप्रसंगामुळे कच्च्या तेलांच्या किमतीत वाढ होऊ शकते. त्यामुळे पेट्रोलच्या किमती वाढून सामान्य नागरिकाच्या जीवनावर थेट परिणाम होऊ शकतो. त्यामुळे 'मला काय त्याचे' ही वृत्ती सोडण्याची गरज आहे. या सर्व पेचप्रसंगांची मुळे गेल्या काही वर्षांमध्ये घडलेल्या जागतिक घटनांमध्ये आहेत.

१९४५ मध्ये दुसरे महायुद्ध संपले, परंतु त्यानंतर सुमारे ४५ ते ५० वर्षे जगात शीतयुद्ध सुरू होते. समाजवादाचा पुरस्कार करणारा सोव्हिएत रशिया आणि त्याचे मित्रदेश एका बाजूला तर व्यक्तिगत स्वातंत्र्य आणि भांडवलशाही अर्थव्यवस्थेचा पुरस्कार करणारा अमेरिका आणि त्याचे मित्रदेश दुसऱ्या बाजूला, अशी विभागणी झाली होती. त्यावेळी आणखी एक वेगळा गटही अस्तित्वात आला होता. भारत, इजिप्त आणि इंडोनेशियासारख्या त्या काळी नुकत्याच स्वतंत्र झालेल्या देशांनी एकत्र येऊन अलिप्त राष्ट्रांचा एक तिसरा गट निर्माण केला होता. अशा प्रकारे १९९० च्या दशकापर्यंत जग या तीन मुख्य गटांमध्ये विभागलेले होते. भांडवलशाही देश आणि समाजवादाचे पुरस्कर्ते देश यांच्यात एक प्रकारे सत्तासंतुलन होते. सामरिक क्षेत्राचाच विचार करायचा झाला, तर अखंडित सोव्हिएत संघ लष्करीदृष्ट्या निदान युरोप खंडामध्ये तरी अमेरिकेचा तुल्यबळ होता. अर्थातच प्रबळ नौसेनेमुळे अमेरिका सागरी सत्तेच्या क्षेत्रात सोव्हिएत संघाच्या खूप पुढे होता.

अमेरिकेचे नाविक सामर्थ्य इतके प्रचंड होते आणि आहे, की जगाच्या कुठल्याही कोपऱ्यात आपले लष्करी बळ वापरण्याची क्षमता अमेरिकेमध्ये आहे. सोव्हिएत संघाकडे किंवा चीनकडे हे सामर्थ्य तेव्हाही नव्हते आणि आजही नाही. त्यामुळे नाविक सामर्थ्याची आणि युद्धनौकेवरून संहारक क्षेपणास्त्रे प्रक्षेपित करण्याची मोठी क्षमता असलेल्या अमेरिकेची या क्षेत्रात जणू एकाधिकारशाही आहे.

नाविक सामर्थ्यात सोव्हिएत संघ अमेरिकेच्या मानाने कमी सामर्थ्यवान असला तरी सामरिक दृष्टीने महत्त्वाच्या युरोप खंडामध्ये सोव्हिएत सैन्य अमेरिका आणि पाश्चिमात्य जगाला वरचढ होते. त्यात भरीस भर म्हणजे अण्वस्त्रांच्या क्षेत्रात साव्हिएत संघ अमेरिकेच्या तोडीस तोड होता. सामरिक सामर्थ्याच्या आणि एकूण प्रगतीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या अंतराळ संशोधन क्षेत्रातही अमेरिका आणि सोव्हिएत संघ यांच्यात स्पर्धा सुरु झाली होती. त्यात १९५७ मध्ये पहिला कृत्रिम उपग्रह प्रक्षेपित करून रशियाने अंतरिक्ष क्षेत्रात आघाडी मिळवली होती. त्याचबरोबर विविध क्षेपणास्त्रे विकसित करून सोव्हिएत संघाने अमेरिकेला आपल्या अण्वस्त्रांच्या टप्प्यात आणले होते. अशा प्रकारे १९९० च्या दशकापर्यंत जागतिक स्तरावर या दोन्ही महाशक्तींमध्ये शक्तीसंतुलन होते. त्याचा परिणाम म्हणजे जगाच्या कोणत्याही भागात छोट्या देशांमधल्या युद्धात अमेरिका एका बाजूने उतरला तर सोव्हिएत संघ दुसऱ्या बाजूने उतरत असे. त्यामुळे जगात कोणताही संघर्ष फार मोठ्या प्रमाणावर चिघळण्यावर अंकुश होता. बांगलादेश निर्मितीच्या वेळी झालेल्या भारत-पाकिस्तान युद्धाच्या वेळी आपण हे अनुभवले आहे.

त्यानंतर म्हणजे १९९०-९२ या कालावधीत सोव्हिएत संघाचे विघटन झाले. त्यातून जन्माला आलेला रशिया अमेरिकेपुढे दुबळा देश ठरला आणि तोपर्यंत जगात असलेले सत्तासंतुलन बिघडले. या परिस्थितीचा फायदा घेत अमेरिकेने जगभर आपल्या हितानुसार जागतिक स्तरावर छोट्या छोट्या देशांवर आपले वर्चस्व प्रस्थापित केले. शीतयुद्ध संपल्यानंतरच्या काळात मध्यपूर्वेमध्ये इराकवर हल्ला करून अमेरिकेने त्या देशाची तेलसंपदा आपल्या कह्यात केली. या हल्ल्यापूर्वी अमेरिकेने इराकचे त्या वेळचे सर्वेसर्वा सद्दाम हुसेन यांनी मोठ्या प्रमाणावर संहार करू शकतील अशा शस्त्रास्त्रांचा (वेपन्स ऑफ मास डिस्ट्रक्शन) साठा करून ठेवल्याची आवई उठवली. जगाच्या भल्यासाठी ती नष्ट करण्याची नैतिक (?) जबाबदारी घेऊन सद्दाम हुसेन यांची सत्ता उलटवून टाकली आणि नंतर त्यांना फाशी देण्यात आले. शेवटपर्यंत ही शस्त्रास्त्रे सापडली नाहीत, ही बाब वेगळी. कमजोर झालेला रशिया मध्यपूर्वेतल्या अमेरिकन अश्वमेधाला थांबवू शकला नाही. चार वर्षांपूर्वी युक्रेनमधल्या अमेरिकेच्या घुसखेरीला थांबण्यासाठी रशियाने युक्रेनवर हल्ला केला. आज चार वर्षे चाललेल्या युद्धानंतरही रशिया हे युद्ध जिंकू शकलेला नाही, हे रशियाच्या लष्करी कमजोरीचे दिर्शक आहे. त्यामुळेच आज अमेरिकेची जगभर निरंकुश लष्करी सत्ता आहे आणि त्याचा सामना करण्यासाठी दुसरी कोणती शक्ती नाही.

लष्करी आणि सामरिकदृष्ट्या हा महत्त्वाचा बदल होत असताना शीतयुद्धाच्या काळात अमेरिका आणि चीनमध्ये मैत्री निर्माण झाली. सोव्हिएत संघाला नेस्तनाबूत करण्यासाठी अमेरिकेने चीनचा वापर केला. चीन आणि अमेरिकेच्या मैत्रीच्या कालखंडात अमेरिकन तंत्रज्ञान आणि भांडवलाचा ओघ चीनकडे वळला होता. परिणामस्वरूप, २१ व्या शतकाच्या सुरूवातीला चीन आर्थिक महाशक्ती म्हणून उदयास आला. आज परिस्थिती अशी आहे, की आर्थिक क्षेत्रात चीन अमेरिकेच्या खूप पुढे निघून गेला आहे.

कालांतराने या आर्थिक शक्तीचे रुपांतर लष्करी सामर्थ्याच्या स्वरुपात होऊ शकेल, याची चिंता अमेरिकेला आहे. एके काळी लष्करी आणि आर्थिक महासत्ता असलेला अमेरिका आज आर्थिकदृष्ट्या जगातला सर्वात मोठा कर्जबाजारी देश बनला आहे. केवळ डॉलर हे आंतरराष्ट्रीय चलन असल्यामुळे आज अमेरिकेच्या नागरिकांचे उच्च राहणीमान शाबूत आहे. आज चीनच्या आर्थिक शक्तीमुळे अमेरिकेच्या सुबत्तेला धोका निर्माण झाला आहे. आर्थिकदृष्ट्या अमेरिका आज सावकारी राष्ट्र बनले आहे. सध्याच्या आर्थिक पेचप्रसंगातून वाट काढण्यासाठी अमेरिका लष्करी बळाचा आणि जगभरातल्या युद्धांचा फायदा करून घेत आहे. अगदी युक्रेनच्या युद्धातूनही अमेरिकेच्या शस्त्रव्यापाराला अफाट नफा कमवता येत आहे. म्हणजेच आजच्या जागतिक अशांततेचे मूळ अमेरिकेच्या आर्थिक पेचप्रसंगात आणि युद्धामुळे मिळणाऱ्या नफ्यात शोधावे लागेल.

---

# आरोप, अमंलबजावणी अन् लोकशाही

**सुयोग आंग्रे**

लोकशाही साम्राज्याचा आदर्श संपूर्ण जगासमोर मांडणारी भारतीय व्यवस्था आणि त्यासाठी केले जाणारे राजकारण अल्लाउद्दिनाच्या जादूच्या दिव्याप्रमाणे आहे. राजकीय अस्तित्व टिकवण्यासाठी कधी कोणता घोटाळा बाहेर येईल आणि कधी कोणावर कोणते आरोप केले जातील हे ज्योतिषांना देखील सांगणे कठीण होऊन बसले आहे. लोकशाही बळकटीसाठी प्रयत्न सुरु आहेत. परंतु त्यासाठी नवीन विचार समोर येणे हे दुरापास्त झाले आहे. केवळ जयजयकाराने स्वातंत्र्य मिळाले असते तर संघर्ष शब्द कधी शब्दकोशात आलाच नसता.देशाच्या राजकीय इतिहासाचा मागोवा घेतला तर आपले अस्तित्व सिद्ध करण्यासाठी केलेला राजकीय संघर्ष भारतवासीयांच्या मनात घर करून आहे. यामुळे एखाद्यावर लावण्यात आलेले राजकीय डाग त्यासाठी आखलेले धोरण आणि त्यातून लोकशाही बळकटीसाठी झालेला फायदा कधीच उघडपणे मांडता आला नाही. उलट त्यामुळे राजकीय नुकसान झाले. काही अपवाद वगळता त्याची भरपाई करण्याचा यशस्वी प्रयत्नदेखील झालेला दिसत नाही.

राजकारणात आरोप हे दगड नसतात, तरंग असतात. ते उठले की ते दूरवर पसरतात. नेते अनेकदा म्हणतात की निर्णय जनमताच्या न्यायालयात घेतला जाईल.पण सत्य हे आहे की लोकशाहीत एक नव्हे तर तीन व्यासपीठे सक्रिय असतात न्यायालय, माध्यमे आणि जनमानस. न्यायालय पुरावे पाहते, प्रसारमाध्यमे मथळे बनवतात आणि लोकांची धारणा निर्माण होते. कायदेशीर वैधता, मीडिया कथन आणि सार्वजनिक धारणा यांचा हा त्रिकोण हेच आजच्या राजकारणाचे खरे गणित आहे. एखाद्या नेत्यावर आरोप होताच त्याचे राजकीय भांडवल म्हणजेच विश्वास, विश्वासार्हता आणि विश्वासार्हता यांचा समतोल ढळू लागतो. अटकेची छायाचित्रे, एजन्सींकडून होणारी चौकशी, प्राइम टाइममधील वादविवाद आणि सोशल मीडियाचा महापूर मिळून एक कथा लिहितात. नंतर पुराव्याअभावी न्यायालयाने दिलासा दिला तरी तोपर्यंत त्या कथेने लोकांच्या मनात स्थान निर्माण केले आहे.न्यायालयाची क्लीन चिट ही राजकीय पुनर्जन्माची हमी आहे का, असा प्रश्न इथून उपस्थित होतो. अरविंद केजरीवाल आणि मनीष सिसोदिया यांच्या घटनेने हा प्रश्न ऐरणीवर आला आहे. अण्णांच्या आंदोलनाच्या तापातून निर्माण झालेल्या राजकारणाने यूपीए सरकारला भ्रष्टाचाराच्या मुद्द्यावर घेरले आणि त्याच लाटेतून आम आदमी पक्षाची स्थापना झाली. दिल्लीत सलग तीनवेळा सत्ता काबीज केली. पण नंतर मागे घ्यावे लागलेल्या नवीन दारू धोरणाचे राजकीय पेचप्रसंगात रुपांतर झाले. केजरीवाल, सिसोदिया, सत्येंद्र जैन, संजय सिंग इत्यादींना दीर्घकाळ तुरुंगवास भोगावा लागला. इतिहासही हेच सांगतो. राजीव गांधींवर आरोप झाले, मीडियात रोज नवनवीन खुलासे झाले आणि १९८९ मध्ये सत्ता गेली.कोर्टात आरोप सिद्ध झाले नाहीत, पण राजकीय नुकसान कधीच भरून निघू शकले नाही. वर्षानुवर्षे आरोपांची छाया राहिली. यावरून हे स्पष्ट झाले की समज राजकारण काहीवेळा न्यायिक प्रक्रियेपेक्षा अधिक शक्तिशाली असते. जैन हवाला घोटाळ्यात लालकृष्ण अडवाणी, मदनलाल खुराणा आणि शरद यादव यांची नावे पुढे आली होती. लोकसभेचा राजीनामा देऊन अडवाणींनी नैतिक आधार निवडला आणि निर्दोष सिद्ध झाल्याशिवाय निवडणूक लढवणार नसल्याचे सांगितले. नंतर त्यांना कोर्टातून दिलासा मिळाला आणि ते परतले. हा एक अपवाद होता, जिथे नैतिक स्थितीमुळे प्रतिमा पुनर्प्राप्त करण्यात मदत झाली. पण खुराणा आणि शरद यादव यांच्या प्रकरणात क्लीन चिट मिळूनही जुना प्रभाव पूर्णपणे परत येऊ शकला नाही. कायदेशीर मदत आणि राजकीय पुनर्वसन या एकाच गोष्टी नाहीत हे यावरून स्पष्ट होते. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत दिल्लीतील सातही जागा भाजपच्या खात्यात गेल्या. सत्तेत गेले, निवडणुका हरल्या, मथळे बदलले. आता न्यायालयाकडून दिलासा मिळाला असला तरी खरी कसोटी निवडणुकीच्या रिंगणात असणार आहे. न्यायालयाने कायदेशीर निर्णय दिला आहे, जनता राजकीय निर्णय देईल. आज दळणवळण क्रांतीने हा फरक अधिक तीव्र केला आहे. २४७ बातम्यांचे चक्र, डिजिटल प्लॅटफॉर्म आणि सोशल मीडियाचे रिअल-टाइम ॲम्प्लिफिकेशन आरोपांना कायमचे बनवतात. अटकेची बातमी ब्रेकिंग होते. निर्दोष सुटल्याची बातमी अनेकदा छोट्या रकान्यांपुरतीच मर्यादित असते. एकदा तयार केलेली कथा पुन्हा पुन्हा पुनरावृत्ती होते आणि हळूहळू आकलनाचा कायमचा भाग बनते. त्यामुळे राजकीय नुकसान कसे भरून काढायचे? केवळ कोर्टातूनच नाही. त्यासाठी पुन्हा विश्वास संपादन करावा लागेल. पारदर्शकता, सातत्यपूर्ण संवाद आणि ठोस काम हे तीन स्तंभ आहेत ज्यांच्यावर राजकीय पुनर्रचना उभी राहू शकते. नेत्याने आरोप-प्रत्यारोप होत असतानाही जनतेमध्ये सक्रिय राहिल्यास, स्पष्ट भूमिका घेतली आणि कामातून विश्वास निर्माण केला, तर काळानुसार चित्र बदलू शकते. पण जर संवाद बिघडला आणि कामगिरी खराब झाली तर दोषाची सावली लांबते.

सरतेशेवटी साधी गोष्ट म्हणजे न्यायालय दोषी की निर्दोष ठरवते, ते विश्वसनीय की अविश्वसनीय हे जनता ठरवते. न्यायालय पेपर वाचते, जनता पात्र ठरवते. कोर्ट ट्रायल कायद्याचा निकाल देते, मीडिया ट्रायल समजते. आणि राजकारण हे शेवटी धारणा आणि विश्वासाच्या आधारावर उभे असते. त्यामुळे राजकारणात निर्दोष सिद्ध होणे पुरेसे नाही, तर विश्वासार्ह सिद्ध होणेही आवश्यक आहे. कारण लोकशाहीचे अंतिम न्यायालय हे लोकांचे असते, जिथे निर्णय कायद्यातील तरतुदींनी नव्हे तर विश्वासाच्या हृदयाच्या ठोक्यांवर लिहिला जातो. याचा प्रत्यय जनतेने राजकारण्यांना अनेकदा आणून दिला आहे. देश व्यवस्था टिकविण्यासाठी असणाऱ्या स्तंभांचा विचार केला तर लोकांनी लोकांसाठी लोकांच्या करीत चालविलेल्या भारतीय लोकशाहीला उभारी मिळावी, यासाठी जनतेने उठाव केल्याचे सर्वश्रुत आहे.

---

**लोकसंसद**

### सण-उत्सवांवर पाश्चात्यांचा प्रभाव !

काळ जसा पुढे सरकत आहे तसे विज्ञानाच्या प्रगतीमुळे जग अधिकाधिक जवळ येत चालले आहे. आजमितीला प्रत्येकाच्या हातात मोबाईल आहे आणि त्यामध्ये मुबलक इंटरनेट डाटा उपलब्ध आहे. जगातील चालू घडामोडी एक क्लिकवर आपल्याला पाहता येत आहेत. इंटरनेटने जग जवळ आले; मात्र आपण आपल्या संस्कृतीपासून आणि येथील परंपरांपासून हळूहळू दूर जाऊ लागलो. आपल्या मातीतील चांगल्या परंपरांना त्यागून पाश्चात्यांच्या अनिष्ट प्रथांना जवळ करू लागलो. आपली संस्कृती, आपली वेशभूषा यांचे दर्शन आज केवळ सण-उत्सवांपुरते मर्यादित राहिले आहे. नुकताच गुढीपाडवा सरला. त्यानिमित्ताने अनेक ठिकाणी हिंदू नववर्ष स्वागतयात्रा काढण्यात आल्या. यांमध्ये नागरिक पारंपरिक वेशभूषेत मोठ्या प्रमाणात सहभागी झालेले पाहायला मिळाले. हे पाहिल्यावर 'आपल्या संस्कृतीचे जतन आपण वर्षभर का करू शकत नाही' हा प्रश्न स्वाभाविकपणे पडला. दरवर्षी ३१ डिसेंबरला ख्रिस्ती नववर्षाच्या स्वागतासाठी जसे फटाके वाजवले जातात तसे शनिवारी मध्यरात्री १२ वाजता मुंबईत सर्वत्र मोठ्या प्रमाणात फटाके फोडले गेले. पाश्च्यात्यांची नववर्ष स्वागताची प्रथा आता हिंदू नववर्ष साजरा करताना पडू लागली आहे हे खरे तर दुर्दैवच म्हणावे लागेल. हिंदू धर्मशास्त्रानुसार दिवसाची सुरुवात ही मध्यरात्री १२ वाजता होत नसून पहाटेच्या सूर्योदयाने होते. त्यामुळे शुभदिनाच्या शुभेच्छा सूर्योदयानंतरच दिल्या जाव्यात. दुसरी खटकणारी बाब म्हणजे सामाजिक माध्यमांतून शुभेच्छा देताना अनेकांनी 'हॅप्पी गुढीपाडवा' आणि 'हॅप्पी न्यू इअर' अशा प्रकारचे संदेश दिले यामध्ये अनेक सेलिब्रिटीही होते. होळी, गणपती, दसरा, दिवाळी या हिंदू सणांच्या बाबतीतही दरवर्षी तेच घडते. इंग्रज भारतातून निघून जाऊन आज ७८ वर्षाहून अधिक कालावधी लोटला तरीही इंग्रजीचे भूत आपल्या डोक्यावरून गेलेले नाही.

**जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**

---

**दिनविशेष**

# चवदार तळ्याचा सत्याग्रह

२० मार्च हा दिवस भारताच्या सामाजिक इतिहासाला कलाटणी देणारा दिवस आहे. कारण याच दिवशी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी रायगड जिल्ह्यातील महाड येथील चवदार तळ्यावर अस्पृश्यांना पाणी घेता यावे म्हणून सत्याग्रह केला. हा महाडचा सत्याग्रह, चवदार तळ्याचा सत्याग्रह किंवा मानव मुक्तीचा सत्याग्रह म्हणून ओळखला जातो. म्हणूनच २० मार्च हा दिवस भारतात सामाजिक सबलीकरण दिन म्हणून साजरा केला जातो. हा सत्याग्रह फक्त महाराष्ट्रालाच नाही तर जगाला प्रेरणा देणारा ठरला. पाणी ही नैसर्गिक संपत्ती आहे. तिच्यावर सर्वांचा समान हक्क असताना त्या काळच्या जातीय व्यवस्थेने मुख्य स्रोतातून पाणी घेण्यास व रस्त्यावरुन जाण्यासही अस्पृश्यांना बंदी घातली. ४ ऑगस्ट १९२३ साली ब्राह्मणेतर पक्षाचे नेते सी के बोले यांनी मुंबई कायदे मंडळात एक कायदा पास करुन घेतला. त्यानुसार सरकारी खर्चाने बांधलेल्या व सुस्थितीत असलेल्या मालमत्तेवर म्हणजे पाणवठे, धर्मशाळा, बगीचे यावर सर्वांचाच म्हणजे अस्पृश्यांचा देखील अधिकार असेल. जानेवारी १९२४ साली महाडच्या नगरपालिकेने या कायद्याची अंमलबजावणी करण्याचा ठराव केला. या ठरावानुसार नगरपालिकेने महाडचे चवदार तळे अस्पृश्यांसाठी खुले केल्याचे जाहीर केले. परंतु स्पृश्यांनी अस्पृश्यांना या तळ्यातून पाणी भरू दिले नाही. त्यामुळे अस्पृश्यांमध्ये धाडस आणि आत्मविश्वास निर्माण करू देण्यासाठी व त्यांचा हक्क त्यांना मिळवून देण्यासाठी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी चवदार तळ्यातील पाण्यासाठी सत्याग्रह करण्याचे ठरवले. बाबासाहेबांनी १९ आणि २० मार्च या दिवशी महाडमधील कुलाबा येथे परिषद भरवली. या परिषदेचे अध्यक्ष स्वतः बाबासाहेब हे होते. या परिषदेस सुरेंद्र चिटणीस, संभाजी गायकवाड, अनंत चित्रे, रामचंद्र मोरे, गंगाधर पंत सहस्त्रबुद्धे हे दलितेतर व ब्राह्मण नेते उपस्थित होते. या परिषदेत अस्पृश्यतेचा धिक्कार करुन काही ठराव करण्यात आले ते असे

१) स्पृश्यांनी अस्पृश्यांना आपल्या नोकरीत ठेवावे. २)स्पृश्य लोकांनी अस्पृश्य लोकांचे नागरिकत्वाचे अधिकार मान्य करावेत.

३) मृत जनावरे ज्याची त्याने ओढवित

४) स्पृश्यांनी अस्पृश्य विद्यार्थ्यांना वार लावून जेवण द्यावे. याच परिषदेत असेही ठरले की सर्वांनी दुसऱ्या दिवशी म्हणजे २० मार्च रोजी महाडच्या चवदार तळ्यातील पाणी प्यावे. त्यानुसार दुसऱ्या दिवशी परिषदेस उपस्थित असणारे सर्व नेते व परिषदेस आलेले सर्व जण चवदार तळ्यावर गेले. डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी सर्वप्रथम या तळ्यातील पाणी ओंजळीने प्यायले. त्यावेळी स्त्री पुरुष ५००० लोक या परिषदेस व त्यानंतर चवदार तळ्यावर पाणी पिण्यासाठी आले. त्यातील पुरुष हे हातात काठी घेऊन आले होते. हातात काठी म्हणजे महार जातीच्या पुरुषाचे चिन्ह होते. चवदार तळ्याचे पाणी पिऊन डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी अस्पृश्यांना मुक्तीचा मार्ग दाखवला. पण, ही मानवतावादी घटना रूढीवादी स्पृश्य हिंदूंना सहन झाली नाही. डॉ बाबासाहेब आंबेडकर सरकारी बंगल्यात परत गेल्यावर जातीयवादी, सनातनी विचारांच्या लोकांनी गावात अफवा उठवली की, चवदार तळे बाटवल्यानंतर डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखालील जमाव विश्वेश्वराच्या मंदिरात जाऊन मंदिरही बाटवणार आहेत. धर्म धोक्यात आल्याचे उच्चवर्णीय, सनातनी हिंदूंनी गावभर पसरवले त्यातून जातीयवादी उच्च हिंदूंचा एक घोळका हत्यारे, लाठ्याकाठ्या घेऊन सभास्थानी आला. त्यांनी सभेनंतर गावाकडे जाण्यापूर्वी जेवण करीत असणाऱ्या अस्पृश्यांना मारहाण केली. त्यांच्या जेवणात माती मिसळली. विश्वेश्वराच्या मंदिरात प्रवेश करण्याचा कट रचला आहे अशी अफवा उठवल्यामुळे गावातील सनातनी हिंदूंनी सत्याग्रहासाठी आलेल्या लोकांवर हिंसा केली. परंतु , अहिंसा हे तत्व मानणाऱ्या आंबेडकरांनी अस्पृश्य सत्याग्रहींना सनानती हिंदूंविरुद्ध हिंसा करु नका असा आदेश दिला होता, त्यामुळे एव्हढी हिंसा होऊनही आणि प्रत्यक्षात स्थानिकांपेक्षा संख्येने जास्त असूनही काठीधारी अस्पृश्यांनी संयम बाळगला. अस्पृश्यांनी तळे बाटवले म्हणून सनातनी, जातीयवादी हिंदूंनी गोमूत्र टाकून ब्राह्मणांकडून तळ्याचे शुद्धीकरण करुन घेतले. पुढे महाडच्या नगरपालिकेने स्थानिकांच्या दबावाला बळी पडून अस्पृश्यांना चवदार तळे खुले करण्याचा ठरावही रद्द केला.

**श्याम बसप्पा ठाणेदार**

**अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**

२० मार्च

१) श्री.नंदकुमार जगन्नाथ म्हात्रे
चेंढरे-अलिबाग
दि.२०-३-१९४४

२)श्री.गोरखनाथ कृष्णा गोवा
चेंढरे-अलिबाग
दि.२०-३-१९५४

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

**आजचे अन्नदाते**



**कै. आनंदीबाई व कै. पंढरीनाथ गोवर पाटील, ५ वी पुण्यतिथी, खारबाव भिवंडी**

# मच्छिमारांवर दुहेरी संकट

**गॅस सिलेंडर नाही, स्टोव्हही मिळेनासे झाले**

## ● मोरा बंदरात शंभरहून अधिक मासेमारी बोटींनी नांगर टाकला

**| चिरनेर | प्रतिनिधी |**

आखाती युद्धामुळे खोल समुद्रात मासेमारी करणाऱ्या मच्छीमारांना आता व्यावसायिक गॅस सिलेंडरची झळ बसली आहे. गॅस सिलेंडरच्या तुटवड्यामुळे मच्छिमार स्टोव्हच्या शोधात फिरु लागले आहेत. मात्र स्टोव्ह आहे, तर बर्नल नाही. वाढत्या मागणीमुळे बाजारात तर दोन्ही मिळत नसल्याने पेचात सापडलेल्या मच्छीमारांवर मासेमारीसाठी जाणे अवघड होऊन बसले आहे. जेवण शिजवायलाच पर्याय उपलब्ध नसल्याने खोल समुद्रात मासेमारी जाणेही अवघड होऊन बसल्याने शंभरहून अधिक मच्छिमार बोटींनी बंदरात नांगर टाकला आहे. या अवघड परिस्थितीमुळे मात्र मच्छीमारांवर चिंतेचे सावट पसरले आहे.

शिमग्याचा सण साजरा करण्यासाठी आपापल्या गावी गेलेले हजारो मच्छिमार करंजा बंदरात माघारी परतले आहेत.



शिमग्याची मजा लुटून माघारी परतलेल्या मच्छिमारांना मासेमारीचे वेध लागले आहेत. याआधी एका ट्रिपसाठी एकाच बोटीवरील १७ खलाशांचे जेवण बनविण्यासाठी १९ किलोचा एक गॅस सिलेंडर पुरेसा होता. आता मात्र युद्धामुळे मच्छिमारांना स्वयंपाक करण्यासाठी व्यावसायिक गॅस सिलेंडर मिळेनासे झाले आहेत.

खोल समुद्रातील मासेमारी करणाऱ्या मच्छीमारांसाठी चुलीवर स्वयंपाक शक्य नसल्याने फक्त स्टोव्हचा एकमेव पर्याय मच्छिमारांकडे शिल्लक आहे. त्यामुळे उरण परिसरातील शेकडो मच्छिमार स्टोव्हच्या शोधात फिरताना दिसत आहेत. मात्र वाढत्या मागणीमुळे बाजारात स्टोव्हही मिळेनासे झाले आहेत. काही दुकानात स्टोव्ह आहे तर बर्नर नाही, अशी अडचणीची स्थिती निर्माण झाली आहे. तीन दिवसांपासून उरणपासून तुर्भ्यांपर्यतची बाजारपेठ पालथी घातली. काही दुकानात स्टोव्ह मिळाला, मात्र बर्नर मिळाला नाही, अशी व्यथा मच्छिमार दिलिप नाखवा यांनी मांडली.

> **याआधी व्यावसायिक १९ किलोचा गॅस सिलेंडर १८०० रुपयांमध्ये मिळत होता. आता मात्र तुटवड्यामुळे सिलेंडरसाठी चार हजारांवर किंमत मोजावी लागते आहे. तरीही सिलेंडर मिळत नसल्यामुळे अडचण निर्माण झाली आहे.**
>
> **– संजय पाटील, मच्छिमार व्यावसायिक**

> **ज्यांची व्यावसायिक सिलेंडर, स्टोव्हची व्यवस्था झाली, अशा मच्छीमार बोटी खोल समुद्रात मासेमारीसाठी रवाना झालेल्या आहेत. मात्र ज्यांच्याकडे सिलेंडर, स्टोव्हची व्यवस्था झाली नसल्याने करंजा, मोरा बंदरात सुमारे शंभरेक मच्छिमार बोटी मासेमारीसाठी रवाना होऊ शकलेल्या नाहीत. युध्दामुळे हीच परिस्थिती पुढेही कायम राहिल्यास मासेमारी करुन परतणाऱ्या बोटींनाही स्वयंपाकासाठी इंधनाची उणीव भासणार आहे. त्यामुळे पुन्हा मासेमारी करण्यासाठी खोल समुद्रात रवाना होतील, याची शाश्वती नाही.**
>
> **– रमेश नाखवा, व्यावसायिक**

## सुनील बैकर आयडॉल शिक्षक

**तळा :** तळा तालुक्यातील राजिप शाळेचे शिक्षक सुनील बैकर यांची आयडॉल शिक्षक म्हणून निवड करण्यात आली आहे. शिक्षण विभाग महाराष्ट्र शासनातर्फे दर्जेदार व गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याचे कार्य करणाऱ्या उत्तम दर्जाच्या शिक्षकांची बँक तयार करण्यासाठी राज्यामध्ये आयडॉल शिक्षक शोध प्रक्रिया राबविण्यात आली होती. त्यानुसार राज्यस्तरासाठी जिल्हयातील १० सर्वोत्तम शिक्षकांची यादी गुणांकनासह राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेला पाठविण्यात आली आहे. यामध्ये सुनिल बैकर यांची आयडॉल शिक्षक म्हणून निवड झाली आहे.

## नववर्ष स्वागतयात्रेमध्ये स्वदेशीचा जागर

**| मुंबई | प्रतिनिधी |**

प्रतिवर्षी अभिनव संकल्पना राबवून मुंबईकरांचे लक्ष वेधून घेणाऱ्या हिंदू नववर्ष स्वागतयात्रा समिती, कुर्ला पश्चिमच्या नववर्ष स्वागतयात्रेमध्ये यंदा स्वदेशीचा जागर करण्यात आला.

टाळ-मृदूंग, लेझिम पथक आणि ढोल ताशांच्या गजरात निघलेल्या या नववर्ष स्वागतयात्रेत कुर्लेकर पारंपरिक वेशभूषेत सहभागी झाले. इंग्रज भारतातून जाऊन ७८ वर्षांहून अधिक काळ उलटला तरी भारतीयांवरील पाश्चिमात्य संस्कृतीचा प्रभाव काही कमी झालेला नाही. हल्लीचे चित्रपट, वेब सिरीज, दूरचित्रवाहिन्यांवरील मालिका तसेच आजच्या पालकांचा आपल्या पाल्यांना कॉन्व्हेंट आणि इंग्रजी माध्यमांच्या शाळेत घालण्याकडे वाढलेला कल यांमुळे तो अधिक दृढ झाला आहे. भारतीय संस्कृतीने आज जगाला भुरळ घातली आहे, त्यामुळे ती जवळून पाहण्यासाठी आणि अनुभवण्यासाठी दरवर्षी लाखो पर्यटक भारतात येतात. आपण भारतीय मात्र दिवसागणिक आपल्याच संस्कृतीपासून दूर चाललो आहोत. स्वदेशी जीवनप्रणालीचे महत्व आजच्या पिढीला उमजावे आणि त्यांच्या विचारांत आणि आचारात स्वदेशी संस्कृती भिनावी यासाठी समितीच्या वतीने यंदाच्या स्वागतयात्रेत चित्ररथ, जिवंत देखावे, फलक इत्यादी माध्यमांतून स्वदेशी जीवनशैलीचे महत्व सांगण्यात आले.

विदेशी उत्पादनांचा वापर कमी करून स्वदेशी कंपन्यांची उत्पादने वापरण्याचे आवाहन स्वागतयात्रेच्या माध्यमातून करण्यात आले. इंग्रजीचा अतिवापर टाळून मातृभाषेला प्राधान्य देण्याचे महत्व सांगण्यात आले. तर भारतीय वातावरणाला अनुसरून पारंपारिक वेशभूषेचे महत्व यातून पटवून देण्यात आले. भारतीय कला आणि दैनंदिन आचारधर्म जपण्याचे आवाहन स्वागतयात्रेतून करण्यात आले. पर्यटनासाठी विदेशी स्थळांना भेटी देण्याऐवजी भारतातील धार्मिक स्थळांना तसेच पुरातन संस्कृतीची आणि पराक्रमी इतिहासाची ओळख करून देणाऱ्या ठिकाणांना भेट देण्याचे आवाहनही स्वागतयात्रेच्या माध्यमातून नागरिकांना करण्यात आले.

## शांताराम मालुसरे यांचे निधन

खांब : रोहा तालुक्यातील मालसई गावचे रहिवासी शांताराम शिवराम मालुसरे यांचे गुरूवारी (दि.१३) अल्पशा आजाराने निधन झाले. निधनासमयी ते ६५ वर्षांचे होते. त्यांच्या निधनामुळे सर्वत्र हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.



त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, सुना, जावई व नातवंडे असा परिवार आहे. त्यांचे दशक्रियाविधी शनिवार दि.२१ मार्च रोजी तर अंतिम धार्मिक विधी मंगळवार दि.२४ मार्च रोजी राहत्या निवासस्थानी होणार आहेत.

## वीजचोरीप्रकरणी गुन्हा दाखल

**| ठाणे | प्रतिनिधी |**

डोंबिवलीतील एका वीजग्राहकावर वीज चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. डोंबिवली पश्चिमेतील मोठागाव येथील तानाजी काळूराम काठे याच्या घरी स्मार्ट मीटर लावण्यात आले. फेब्रुवारी-२०२६ अखेरीसची ५६ हजार ४६० रूपयांची थकबाकी न भरल्याने मुख्य कार्यालयाकडून या ग्राहकाचा वीजपुरवठा बंद करण्यात आला. त्यानंतर या ग्राहकाने देयकाचे पैसे न भरता मीटर बायपास करून चोरीची वीज वापरण्यास सुरुवात केली. ही बाब महावितरणच्या तपासणी पथकाला आढळून आली. यानंतर या ग्राहकाचा वीज पुरवठा थेट वीज खांबावरून बंद करण्यात आला. याप्रकरणी महावितरणकडून काठे याच्याविरोधात महात्मा फुले पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## ‘बेटर केअर फॉर अ बेटर वर्ल्ड’ मोहीम

**| चिरनेर | प्रतिनिधी |**

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून किम्बर्ली-क्लार्क इंडिया आणि युनिसेफ इंडिया यांनी भारतातील महिला व मुलींच्या आरोग्य सक्षमीकरणासाठी एका धोरणात्मक भागीदारीची घोषणा केली आहे. बेटर केअर फॉर अ बेटर वर्ल्ड या संकल्पनेवर आधारित ही मोहीम महाराष्ट्र, उत्तर प्रदेश, बिहार, मध्य प्रदेश आणि गुजरातसह देशातील एकूण नऊ प्रमुख राज्यांमध्ये राबवली जाणार आहे.

या महत्त्वाकांक्षी उपक्रमाद्वारे सुमारे २.८८ दशलक्ष किशोरवयीन मुली, महिला आणि अर्भकांच्या आरोग्यात सुधारणा करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. केवळ उपचारच नव्हे, तर मासिक पाळीदरम्यानची स्वच्छता, प्रसूतीपूर्व व नंतरची काळजी आणि बालसंगोपन या विषयांवर २.८७ दशलक्ष समाजघटकांचे प्रबोधन केले जाणार आहे. ही युती केवळ आरोग्य सेवा पुरवण्यापुरती मर्यादित नसून, ती ग्रामीण आणि शहरी भागातील आरोग्य यंत्रणा अधिक बळकट करण्यावर भर देणार आहे.

किम्बर्ली-क्लार्क इंडियाचे व्यवस्थापकीय संचालक राहुल अस्थाना यांनी याप्रसंगी बोलताना सांगितले की, आरोग्य आणि सन्मान हा कोणा एकाचा विशेषाधिकार नसून तो सर्वांचा हक्क आहे. युनिसेफसोबतची आमची ही भागीदारी महिलांच्या जीवनात दीर्घकालीन आणि सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी कटिबद्ध आहे.

युनिसेफ इंडियाच्या प्रतिनिधी सिंथिया मॅकक्रॅफ्रे यांनी विकसित भारत या संकल्पनेचा उल्लेख करत स्पष्ट केले की, मुलींचे आरोग्य, मातांचे कल्याण आणि बालकांचा विकास हे एकमेकांशी घट्ट जोडलेले आहेत. या उपक्रमामुळे मुलींना स्वतःच्या आरोग्याविषयी माहितीपूर्ण निर्णय घेण्यास मदत होईल. ज्यामुळे देशाच्या लैंगिक समानता आणि सार्वजनिक आरोग्य ध्येयांना गती मिळेल.




## सदाशिव पाटील पुरस्काराने सन्मानित

**| चिरनेर | प्रतिनिधी |**

उरण तालुक्यातील पाणदिवे येथील सेवानिवृत्त मुख्याध्यापक सदाशिव जगन्नाथ पाटील यांना कोकण मराठी साहित्य परिषदेच्या वतीने जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. रायगड जिल्हा परिषदेच्या शाळेत अध्यापनाचे काम करत असताना, त्यांना १९९८ साली आदर्श शिक्षक पुरस्कार व शिवभूमी शिक्षक हा किताब मिळाला आहे. स्कॉलरशिपच्या परीक्षेत उरण म्हसळे तालुक्यातील अनेक विद्यार्थ्यांना स्कॉलरशिप मिळवून दिली. विज्ञान प्रदर्शनात देखील राज्यस्तरावर विद्यार्थ्यांना बक्षीसे मिळवून दिली आहेत. उत्कृष्ट क्रीडा शिक्षक म्हणून देखील विद्यार्थ्यांना विभागीय स्तरावर त्यांनी बक्षिसे मिळवून दिली. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे कार्य देखील त्यांनी केले आहे. एकांकिका व नाटकांचे लेखन व दिग्दर्शनही त्यांनी केले आहे.

## श्रीराम, मारुती जन्मोत्सव सोहळ्याचे आयोजन

**रसायनी :** गुळसुंदे येथे प्रति वर्षाप्रमाणे चैत्रशुद्ध प्रतिपदा म्हणजेच दि. १९ मार्च ते चैत्र वैद्य द्वितीय दि.४ एप्रिलपर्यंत श्रीराम, मारुती जन्मोत्सव सोहळा साजरा होणार आहे. या कालावधीत कीर्तने, पालखी सोहळा, यज्ञ, प्रसाद, हळदीकुंकू समारंभ व ललिता प्रित्यर्थ नाट्यप्रयोग इत्यादी कार्यक्रम होणार आहेत. श्रीरामाची पूजा दि.१९ मार्च रोजी होणार असून मंदार भावे (रोहा) यांचे कीर्तन होणार आहे. दि.२६ गुरुवार रोजी श्रीरामाची कीर्तन व रात्री रामाची पालखी सोहळा होईल. दि.३० पासून हनुमान जन्मोत्सव यानिमित्त वेदमूर्ती शैलेश करंदीकर हे याग करणार आहेत. तसेच ३० मार्च ते १ एएप्रिल रोजी रोज सायंकाळी पाच ते सात या दरम्यान हभप सदानंद गोखले (कल्याण) यांची कीर्तन असे विविध कार्यक्रम होणार असून दि. २ एप्रिल रोजी हनुमान जन्माचे किर्तन व श्रीची पालखी होणार आहे. ३ एप्रिल रोजी गंमत जंमत या नाटकाचा प्रयोग होणार आहे.

## इंडियन टॅलेंट ऑलिम्पियाड परीक्षेत शिपुरकर शाळेचे यश

**| माणगाव | प्रतिनिधी |**

सुधाकर नारायण शिपूरकर प्री-प्रायमरी अँड प्रायमरी इंग्लिश मीडियम स्कूलच्या विद्यार्थ्यांनी माणगावच्या शैक्षणिक क्षेत्रात अभिमानाची नोंद करावी, अशी उल्लेखनीय कामगिरी केली आहे. या विद्यार्थ्यांनी इंडियन टॅलेंट ऑलिम्पियाड परीक्षा २०२५-२६ परीक्षेत उज्वल यश संपादन केले आहे. विद्यार्थ्यांच्या अथक परिश्रमाला आणि शिक्षकांच्या मार्गदर्शनाला मिळालेला हा सन्मान संपूर्ण माणगावसाठी गौरवाची बाब ठरली आहे.



इंग्रजी ऑलिम्पियाड परीक्षेत युक्ती धनंजय जगताप इयत्ता ४थी, राज्यात अव्वल स्थान पटकावला असून तिला एक हजाराची शिष्यवृत्ती प्राप्त झाली आहे. तर निरव हेमंत काळे, इयत्ता १ली, पिंक उत्कृष्ट कामगिरीबद्दल एक्सेलंस मेडल अवॉर्ड प्राप्त झाले. इरा अतुल फडतरे इ.२ री, उल्लेखनीय यशाबद्दल एक्सेलंस मेडल अवॉर्ड प्राप्त, गणित ऑलिम्पियाड परीक्षेत सुधागर शांतिरस्करण गावडा इ.५वी, उत्कृष्ट कामगिरीबद्दल एक्सेलंस मेडल अवॉर्ड पटकावला. हिंदी ऑलिम्पियाड परीक्षेत अजिंक्य अर्जुन पवार, इ.२री, राज्यात अव्वल ठरत महाराष्ट्रात अव्वल किताब मिळवला असून त्याला सातशे रुपयांची शिष्यवृत्ती मिळवली आहे. सामान्य ज्ञान ऑलिम्पियाड परीक्षा श्रावणी सुनील चव्हाण इ.४थी, उत्कृष्ट कामगिरीबद्दल एक्सेलंस मेडल अवॉर्ड प्राप्त केले आहे. या सर्व विद्यार्थ्यांनी आपल्या जिद्दीने, आत्मविश्वासाने आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांनी हे यश संपादन करत शाळेचे नाव उंचावले आहे.

**मोफत दिव्यांग शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद | १०३ लाभार्थ्यांनी घेतला लाभ**

# कृत्रिम अवयवांमुळे मिळाली स्वावलंबनाची शक्ती

**| माणगाव | प्रतिनिधी |**

रायगड जिल्ह्यातील माणगाव येथे भारत विकास परिषद संचलित दिव्यांग पुनर्वसन केंद्र, पुणे ट्रस्ट नव भारत विकास फाउंडेशन यांच्या वतीने मोफत दिव्यांग शिबीर आयोजित करण्यात येते. या शिबिराला महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यातून उत्स्फूर्त प्रतिसादात मिळत आहे. माणगाव येथे नुकत्याच पार पडलेल्या या शिबिरात कृत्रिम मॉड्युलर पाय, हात तसेच, कॅलिपर बसविण्यासाठी दिव्यांग बांधवांची वैद्यकीय तपासणी करून अचूक मोजमाप घेण्यात आले. या शिबिराचा एकूण १०३ दिव्यांग लाभार्थ्यांनी लाभ घेतला असून, पुढील टप्प्यात पात्र लाभार्थ्यांना आधुनिक कृत्रिम पाय व हात मोफत बसविण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांकडून देण्यात आली.




या सामाजिक उपक्रमाचे आयोजन रोटरी क्लब ऑफ पुणे, भारत विकास परिषद तसेच माणगाव तालुक्यातील स्थानिक स्वयंसेवी संस्थांच्या संयुक्त सहकार्याने करण्यात आले होते. या प्रकल्पासाठी रोटरी क्लब ऑफ पुणेचे प्रोजेक्ट कोऑर्डिनेटर आर्या पवार यांनी मार्गदर्शन केले. शिबिराच्या उद्घाटनाप्रसंगी दिव्यांग व वृद्धत्व केंद्राचे प्रमुख विनय खुटवळकर (पुणे) यांनी उपस्थित दिव्यांग बांधवांना आधुनिक कृत्रिम अवयवांच्या तंत्रज्ञानाबाबत सविस्तर माहिती दिली. या अत्याधुनिक साधनांमुळे दिव्यांग व्यक्तींना चालणे-फिरणे, दैनंदिन कामे करणे आणि स्वावलंबी जीवन जगणे अधिक सुलभ होत असल्याचे त्यांनी सांगितले. या उपक्रमामुळे माणगाव तालुक्यासह रायगड जिल्ह्यातील तसेच जिल्ह्याबाहेरून आलेल्या सुमारे १०३ दिव्यांग बांधवांच्या जीवनात नवी उमेद निर्माण झाली असून त्यांना हक्काची गती आणि शक्ती मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

### नवजीवनाची संधी

महाराष्ट्रात हात-पाय गमावलेल्या दिव्यांगांची संख्या एक लाखांहून अधिक असण्याची शक्यता लक्षात घेऊन राज्यातील प्रत्येक जिल्हा व तालुक्यात अशा प्रकारची शिबिरे आयोजित करण्याचा संकल्प संस्थेने केला आहे. पुढील पाच वर्षांत ‘दिव्यांगमुक्त महाराष्ट्र’ घडविण्याचे उद्दिष्ट संस्थेने ठेवले असून त्या दिशेने सातत्याने प्रयत्न सुरू आहेत. माणगाव येथे आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमामुळे दिव्यांग बांधवांना नवजीवनाची संधी मिळाली असून समाजात सकारात्मक परिवर्तन घडविणाऱ्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# निवडक

## राहुल सोनवाळे यांना पुरस्कार



**पाली :** रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे रायगड जिल्हा संपर्क प्रमुख तथा सुधागड तालुक्यातील कुंभारशेत गावचे सुपुत्र राहुल सोनवाळे यांना प्रतिष्ठित समजल्या जाणाऱ्या समाजरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. हा सन्मान कोकण रिपब्लिकन सामाजिक संस्था, महाराष्ट्र यांच्या वतीने आयोजित करण्यात आला आहे. महाड चवदार तळे सत्याग्रह क्रांती दिनाच्या ९९ व्या शताब्दी प्रारंभ सोहळ्याप्रसंगी शुक्रवार, दि.२० मार्च रोजी महाड येथील बुटाला सभागृहात दुपारी प्रदान केला जाणार आहे. या भव्य सोहळ्यास अनेक मान्यवरांची उपस्थिती लाभणार आहे. महाड येथील ऐतिहासिक चवदार तळे सत्याग्रहाच्या स्मृतींना उजाळा देत सामाजिक सक्षमीकरणाच्या कार्यात मोलाचे योगदान देणाऱ्या व्यक्तींना गौरविण्याच्या उद्देशाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. राहुल सोनवाळे यांच्या या सन्मानामुळे सुधागड तालुका तसेच कुंभारशेत गावाच्या नावात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

## कृषी अधिकाऱ्यांकडून शेतकऱ्यांना मार्गदर्शन



**पाताळगंगा :** शेतीमध्ये अमुलाग्र बदल घडवून, अधिक उत्पन्न कसे घेता येईल, या उद्देशाने कृषी खाते सातत्याने शेतकऱ्यांच्या संपर्कात असून त्यांना वेळोवेळी मार्गदर्शन करीत आहे. तालुक्यात औद्योगिक करणाचे जाळे पसरले असले तरीसुद्धा शेतकरी शेतीमध्ये विविध प्रकारचे पालेभाज्या व फलभाज्या पिकवत आहे. अधिक उत्पन्न मिळविण्यासाठी त्यांना प्रशिक्षणाची गरज आहे, हे समीकरण ओळखून कांबे येथे प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया योजनेअंतर्गत हे प्रशिक्षण शिबीर घेण्यात आले. यावेळी उप कृषी अधिकारी चौक नितीन महाडिक यांनी प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया योजना अंतर्गत, शेती संलग्न उद्योग, गट शेती, कृषि विभागाचे नाविन्यपूर्ण उपक्रम इत्यादीविषयी मार्गदर्शन केले. यावेळी AI registration ॲपवर शेतकऱ्यांना योग्य ती माहिती उपलब्ध होणार असल्याचे सांगितले. हा उपक्रम तालुका कृषी अधिकारी सुनील निंबाळकर यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आला. शेतकऱ्यांच्या समस्या सोडविण्यासाठी कृषी खाते सातत्याने सक्रिय असून प्रत्येक शेतकरी वर्गास या योजना किंवा काही समस्या निर्माण झाल्यास कृषी खाते रामेती येथे संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले. तसेच, सीआरपी अध्यक्ष राधिका कुरंगळे उपस्थित बचत गटाविषयी मार्गदर्शन केले.



## सुश्राव्य कीर्तनातून समाजप्रबोधन

**पाली /बेणसे :** श्री क्षेत्र बेणसे येथे इंद्रे-पाटील परिवारातर्फे श्री कुलदैवत चलप्राणप्रतिष्ठा व महाभिषेक सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यानिमित्त विलास रमाकांत इन्द्रे यांच्या निवासस्थानी सलग दोन दिवस विविध धार्मिक विधी, सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी कृष्णाई महिला मंडळ हेटवणे यांचा हरिपाठ कार्यक्रम, तर मरीआई भजन मंडळ अटीवली व लक्ष्मीनारायण भजन मंडळ मुंढाणी यांचा भजनाचा कार्यक्रम पार पडला. समारोप कार्यक्रमात पाटनोली पनवेल येथील भागवताचार्य समाजप्रबोधनकार हभप महेश महाराज साळुंके यांचे सुश्राव्य कीर्तन व प्रभावी प्रबोधन कार्यक्रमाने उपस्थितांची मने जिंकली. या कार्यक्रमात विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या मान्यवरांचा सन्मानदेखील करण्यात आला. या कार्यक्रमास पंचक्रोशीतील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## द्रोणागिरी गडावर नवी कचराकुंडी



**उरण :** उरण येथील ऐतिहासिक द्रोणागिरी गड परिसरात स्वच्छतेच्यादृष्टीने महत्त्वपूर्ण उपक्रम राबविण्यात आला आहे. गडावरील जुनी कचराकुंडी खराब झाल्यामुळे परिसरात कचरा विखुरलेला दिसत होता. यामुळे गडाचे सौंदर्य बाधित होत होते. या पार्श्वभूमीवर द्रोणागिरी ट्रेकर्सच्या पुढाकारातून नव्याने जाळीयुक्त कचराकुंडी बसविण्यात आली. हा उपक्रम ट्रेकर्स राजा गोवारी यांच्या प्रयत्नातून पूर्णत्वास गेला. बुधवारी (दि.१८) सकाळी गडावर ही कचराकुंडी बसविण्यात आली. यावेळी नरेश रहालकर, दिनेश पाटील, रमेश म्हात्रे, राजा गोवारी, बाळू, सतीश गवई, आतिष पाटील, अभिजित ठाकूर, बाबू बंडा, जितेंद्र पाटील आदी ट्रेकर्स उपस्थित होते. बसविण्यात आलेली कचराकुंडी जाळीयुक्त असून ती भरल्यानंतर फिरविल्यास कचरा बाहेर पडेल, अशी सोय करण्यात आली आहे. गडावर येणाऱ्या पर्यटकांनी कचरा इतरत्र न टाकता कचराकुंडीत टाकावा, असे आवाहन द्रोणागिरी ट्रेकर्सतर्फे करण्यात आले आहे.




## विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन शिबीर

**मुरुड जंजिरा :** अंजुमन इस्लाम जंजिरा डिग्री कॉलेज ऑफ सायन्स, मुरुडजंजिरा येथे अंतिम वर्ष पदवीच्या विद्यार्थ्यांसाठी रोजगार व शासकीय योजनांबाबत मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराच्या आयोजनामध्ये महाविद्यालयाच्या इन्क्युबेशन समिती, आजीवन शिक्षण आणि विस्तार विभाग व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष व तहसील कार्यालय, मुरुड यांचे मोलाचे योगदान लाभले. या शिबिरासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून माननीय तहसीलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी आदेश डफळ उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना पदवी पूर्ण झाल्यानंतर उपलब्ध असलेल्या विविध करिअर संधींबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. आपल्या मार्गदर्शनात त्यांनी विद्यार्थ्यांना सर्वप्रथम स्वतःची आवड व क्षमता ओळखून करिअर निवडण्याचे महत्त्व पटवून दिले. पुढे त्यांनी एमसीए, एमबीए, संशोधन, अध्यापन, क्रीडा क्षेत्र तसेच एमपीएससी, यूपीएससी, बँकिंग परीक्षा आदी विविध क्षेत्रांतील संधींबाबत तसेच, उद्योजकतेस चालना देणाऱ्या विविध शासकीय योजनांची माहिती दिली.

# करंजाडेकरांचा रिक्षा प्रवास कठीण

## ।। स्थानिक प्रवाशांच्या अडचणीत भर ।। ऑनलाईन बंदीचा दुहेरी फटका

**। पनवेल ग्रामीण । प्रतिनिधी।**

करंजाडे वसाहतीत ऑनलाईन रिक्षा बंद असा फलक लावल्यानंतर स्थानिक प्रवाशांच्या अडचणीत आणखी भर पडली आहे. आधीच सार्वजनिक प्रवासी सुविधा अपुऱ्या असताना या निर्णयामुळे चाकरमान्यांचा रोजचा प्रवास अधिकच कठीण झाला आहे.



करंजाडे परिसरात मोठ्या प्रमाणावर नोकरदार वर्ग वास्तव्यास आहे. सकाळच्या गर्दीच्या वेळी रिक्षांची संख्या अत्यल्प असल्याने रिक्षा थांब्यांवर लांबच लांब रांगा लागतात. अनेकांना बराच वेळ प्रतीक्षा करूनही रिक्षा मिळत नाही. परिणामी, कामावर वेळेत पोहोचण्यासाठी नागरिकांची धावपळ आणि मानसिक त्रास वाढला आहे.

यातच वाहतूक कोंडीमुळे परिस्थिती अधिकच बिकट होत आहे. पनवेल रेल्वे स्टेशन गाठताना प्रवाशांची अक्षरशः दमछाक होते. विशेषतः महिलांना सकाळी लवकर आणि रात्री उशिरा रिक्षा उपलब्ध नसल्याने मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. सुरक्षिततेचा प्रश्नही यामुळे निर्माण झाला आहे. ऑनलाईन रिक्षांवरील बंदीमुळे नागरिकांकडे असलेला एक महत्त्वाचा पर्यायही बंद झाला आहे. त्यामुळे करंजाडेकरांचा प्रवास दिवसेंदिवस अधिक कठीण बनत असून नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण आहे. प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून रिक्षांची संख्या वाढवावी, सार्वजनिक वाहतूक सुधारावी आणि ऑनलाईन रिक्षा बंदीचा निर्णय पुनर्विचार करावा, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून होत आहे.

> **आधीच बस सेवा कमी आहे, त्यात ऑनलाईन रिक्षांवर बंदी घालणे म्हणजे आमच्यावर अन्याय आहे. प्रशासनाने प्रवाशांच्या अडचणी समजून घेऊन या वर योग्य कार्यवाही करणे आवश्यक आहे.**
> **– सीमा कुलकर्णी. प्रवासी.**

> **एनएमएमटी बस सेवा अपुरी असून, वेळेवर बस उपलब्ध नसतात. त्यामुळे अनेक प्रवासी ऑनलाईन रिक्षांचा पर्याय निवडतात. मात्र या सेवेलाच बंदी घातल्याने नागरिकांना अधिक वेळ थांबावे लागत असून, खासगी वाहन किंवा महागड्या पर्यायांकडे वळावे लागत आहे.**
> **– कुणाल वर्तक. नागरिक.**

### प्रवाशांचा रोजचा संघर्ष

करंजाडे परिसरात मोठ्या प्रमाणावर चाकरमानी वास्तव्यास असले तरी रिक्षांची संख्या अत्यल्प आहे. त्यामुळे सकाळच्या वेळी रिक्षा थांब्यांवर लांबच लांब रांगा लागतात आणि अनेकांना वेळेत रिक्षा मिळत नाही. वाहतूक कोंडी आणि काही स्थानिक रिक्षा चालकांची दादागिरी यामुळे परिस्थिती अधिकच गंभीर बनते. पनवेल स्टेशनपर्यंत पोहोचताना प्रवाशांची दमछाक होते. विशेषतः महिलांना सकाळी व रात्री रिक्षा न मिळाल्याने मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. ऑनलाईन रिक्षा बंदीमुळे उपलब्ध असलेला पर्यायही बंद झाल्याने करंजाडेकरांचा प्रवास अधिकच कठीण बनला आहे.

# आदिवासी वाडीत फुलणार फणसबाग

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

कोकणात फणसाच्या झाडांचे महत्व अधोरेखित आहे. फणसा पासून विविध प्रकारचे पदार्थ बनविता येतात. या पदार्थांना बाजारातही चांगली मागणी आहे. ही बाब लक्षात घेऊन (दि.१६) मार्च रोजी सेवा इंटरनॅशनल व युसेन लॉजिस्टिक कंपनीमार्फत भादाव आदिवासी वाडीतील सर्व सदस्य व बालगोपालासमवेत नियोजनपूर्वक फणसाची लागवड करण्यात आली आहे.



साईराज नर्सरी, पाणोसेकडून २ वर्षे वयाची फणसाची रोपे घेऊन काळुराम कोळी यांनी १०० पेक्षा जास्त लागवड करण्याचे उदिष्ठ ठेवत युसेन लॉजिस्टिकच्या कर्मचाऱ्यांसोबत शुभारंभ केला. कृषी तज्ञ धुरी यांनी मार्गदर्शन केले. कोकण कृषी केंद्र, प्रभू ट्रेडर्स, सुर्वे ट्रान्सपोर्ट व सानिल हार्डवेअर यांनी याकरिता साहित्य पुरविले. ऑराग्यान फाऊंडेशनच्या मदतीने भादावच्या बालगोपालांच्या सायकल गटाने उस्फूर्त सहभाग नोंदविला. सायकलवर येऊन उन्हाळ्यात झाडांना पाणी घालणे व एकूण २५० रोपे लावणे हे ध्येय ठरविले आहे. युसेन लॉजिस्टिक कंपनीने सेवा इंटरनॅशनल संस्थेच्या मदतीने भविष्यातील फणसाचे महत्व ओळखून फळ लागवड व भविष्यात फळप्रक्रिया उद्योग उभे करू पाहणाऱ्या माणगाव विकास केंद्राला सामाजिक उत्तरदायित्व जबाबदारी अंतर्गत मदत करण्याचे आश्वासन दिले. वृक्षारोपण करण्यासाठी फणसाची रोप, पाण्याच्या टाक्या, कुदळ, फावडे व इतर साहित्य देत मुंबईवरून येऊन कंपनीच्या १५ अधिकाऱ्यांनी वृक्षारोपण केले. फणस लागवडीच्या या उपक्रमाकडे तालुक्यातील सर्व शेतकऱ्यांचे लक्ष वेधले असून या उपक्रमातून शेतकऱ्यांना निश्चित प्रेरणा मिळेल असा विश्वस व्यक्त करण्यात आला आहे



# चेहेर शाखेचा वर्धापन दिन

**। मुरुड जंजिरा । प्रतिनिधी ।**

जयश्रीराम नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित मुरुडच्या चेहेर शाखेच्या सातवा वर्धापन दिना उत्साहात पार पडला. यावेळी रमाकांत पाटील, अशोक वाघमारे, अनंत चवरकर, दिलीप जोशी, मेघराज जाधव, सुनील विरकुड, बाळकृष्ण कासार, समीर उपाध्ये, डॉ. संजय पाटील, संतोष भोईर, गणेश कट, निकिता चवरकर, संजय ठाकर व संचालक आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व्यवस्थापक सिध्देश निरकर यांनी, तर आभार प्रदर्शन सुनील विरकुड यांनी केले.

# ओएनजीसी येथे रक्तदान शिबीर

**। उरण । प्रतिनिधी ।**

ओएनजीसी उरण प्लांट सौजन्याने व पेट्रोलियम एम्प्लॉईज युनियन उरण आयोजित. बुधवारी (दि.१८) मार्च रोजी द्रोणागिरी भवन, ओएनजीसी उरण येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ७२२ रक्तदात्यांनी रक्तदान केले.

यावेळी एस. एन.अहमद, भावना आठवले, संदीप रेवणकर, संतोष पाटील, समाधान मढवी, व्ही. डी. घरत, जी. आर. घरत, विवेक पाटील, गोविंद पाटील, वैभव म्हात्रे, सचिन चिपळूणकर, संजय पाटील, गणेश चीकलेकर, नितीन मोकळ, सुरज नाईक, संतोष म्हात्रे, राकेश पाटील, अंकुश म्हात्रे, विनय ठाकूर, राजू सानप, आशिष कांबळे, अमित इंसुलकर, इक्बाल शेख, अरविंद घरत, दिनेश घरत, बी. जे. घरत, महेश ठाकूर, अनिल बोलवंकर, विनायक तुपसुंदरे, प्रकाश पाठारे, सतीश मकवाना, पंकज नाईक, विराज घरत, सागर फडके, सुरेश पवार, शरद शेंडे, संदीप घरत, भारतराज थळी, वैजनाथ पाटील, संतोष पाटील, कैलास ठाकूर, राजेश गुप्ता, मंदार जोशी, लिंगराज, राहुल जाधव, राजेश चोणकर आदींचे सहकार्य मिळाले.

रक्तदान शिबिरास एम.जी.एम. हॉस्पिटल कामोठे, अपोलो हॉस्पिटल नवी मुंबई, रिलायन्स हॉस्पिटल कोपरखैरणे, महात्मा गांधी सेवा मंदिर मुंबई, सेंट जॉर्ज हॉस्पिटल मुंबई आदी हॉस्पिटलचे सहकार्य मिळाले.

# गॅस सिलेंडरची घरपोच सेवा बंद

**। नवीन पनवेल । प्रतिनिधी ।**

गॅस सिलेंडरच्या टंचाईमुळे नागरिकांना गॅस सिलेंडर वेळेवर मिळत नाहीत. त्यातच रांगाच्या रांगा या सिलेंडर घेण्यासाठी लागलेल्या दिसून येत आहेत. पनवेल परिसरात गॅस सिलेंडरच्या घरपोच सेवा देणाऱ्या गाड्या देखील बंद झालेल्या आहेत. गावात घरपोच गॅस सिलेंडर देण्यासाठी गाड्या जात नसल्याने नागरिकांना गॅस पुरवठा करणाऱ्या वितरकाकडे जाऊन रिक्षा भाड्याचे पैसे खर्च करून गॅस घ्यावा लागत आहे. गॅसची टंचाई नसल्याचे शासन आणि तालुका स्तरावरील अधिकारी सांगत आहेत. मात्र प्रत्यक्षात परिस्थिती वेगळी असल्याचे दिसत आहे. गॅस घेण्यासाठी मोठ्या प्रमाणात रांगा लागलेल्या आहेत. त्यातच पनवेल परिसरातील घरपोच सेवा देणाऱ्या गॅस सिलेंडरच्या गाड्या कित्येक दिवसांपासून गावात येत नसल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. त्यामुळे नागरिकांना वितरकाकडे त्यांच्या कार्यालयात जाऊन गॅस सिलेंडर घ्यावा लागतो. नितळस येथील नागरिकांनी पुरवठा विभाग पनवेल यांच्याकडे याबाबत तक्रार केली. याबाबत पुरवठा विभागाला कसल्याही प्रकारची माहिती नाही. पुरवठा विभाग या गाड्या बाबत अनभिज्ञ आहे. गेल्या दोन आठवड्यांपासून ही समस्या उद्भवत असली तरी देखील पनवेल पुरवठा विभागाने अद्यापही कोणतीही चौकशी केलेली दिसत नाही. याबाबत पुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांना विचारले असता गाड्या गावात येत नसतील तर त्यांना नोटीस दिली जाईल असे सांगितले.

# फ्रेंड्स ऑफ नेचर सर्पमित्र निसर्गसंवर्धन संस्थेचे २१ व्या वर्षात पदार्पण

**। उरण । प्रतिनिधी ।**

चिरनेर (ता. उरण) येथील फ्रेंड्स ऑफ नेचर (फॉन) सर्पमित्र निसर्गसंवर्धन संस्थाचा २० वा वर्धापन दिन साध्या पण उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. दोन दशकांपासून संस्था सर्परक्षण, वन्यजीव बचाव व पुनर्वसन, जनजागृती, वृक्षलागवड व संवर्धन तसेच निसर्ग आणि वन्यजीवांवर शास्त्रीय अभ्यास अशा विविध माध्यमांतून सातत्याने कार्यरत आहे.



वर्धापन दिनानिमित्त संस्थेच्या सदस्यांची बैठक आयोजित करण्यात आली. बैठकीत मागील वर्षभरात राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमांचा आढावा घेण्यात आला तसेच आगामी उपक्रमांचे नियोजन सदस्यांसमोर मांडण्यात आले. यावेळी नवीन व जुन्या सदस्यांची ओळख करून देत संस्थेच्या सुरू असलेल्या प्रकल्पांचा आढावा आणि त्यातील सुधारणा याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

निसर्गसंवर्धन आणि जनजागृती कार्यक्रमांसाठी आर्थिक नियोजन, तसेच दानशूर दाते आणि निसर्गप्रेमींकडून स्नेक बाईट इमर्जन्सी फंड व वाइल्डलाईफ केअर फंडसाठी निधी संकलनाबाबतही विचारमंथन करण्यात आले. सर्पदंशग्रस्त गरीब रुग्णांना तातडीची मदत मिळावी तसेच जखमी अथवा संकटात सापडलेल्या वन्यजीवांच्या उपचारासाठी हा निधी उपयोगी ठरणार असल्याचे सांगण्यात आले.

या कार्यक्रमावेळी संस्थेच्या नामफलकाला निवृत्त शासकीय अधिकारी श्रीधर (बापू) मोकल आणि जीटीपीएस बोकडविरा येथील तंत्रज्ञ रामकृष्ण कारंडे या नव्या सदस्यांच्या हस्ते हार व श्रीफळ अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी विठ्ठल ममताबादे यांचीही उपस्थिती लाभली. संस्थेच्या नव्या पिढीतील सृष्टी आणि रुद्र यांचीदेखील कार्यक्रमात विशेष उपस्थिती होती.

गेल्या २० वर्षांचा यशस्वी प्रवास पूर्ण करून संस्थेने २१ व्या वर्षात पदार्पण केले असून, निसर्ग व वन्यजीव संवर्धनासाठी अधिक जोमाने कार्य करण्याचा संकल्प यावेळी सर्व सदस्यांनी व्यक्त केला. संस्थेची आजपर्यंतची वाटचाल स्वयंसेवक, वन विभाग, स्थानिक नागरिक आणि निसर्गप्रेमी यांच्या सहकार्यामुळे शक्य झाली असल्याबद्दल संस्थेचे संस्थापक अध्यक्ष जयवंत रामदास ठाकूर यांनी कृतज्ञता व्यक्त केली.



# चिरनेर शाळेत वार्षिक स्नेहसंमेलन

**। उरण । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्हा परिषद आदर्श केंद्र शाळा चिरनेरच्या विद्यार्थ्यांनी ‘जल्लोष’ साजरा केला. चिरनेर प्राथमिक शाळेने पटसंख्या टिकवून ठेवण्यासाठी नेहमीच नावीन्यपूर्ण उपक्रमांची कास धरली आहे. त्याचाच एक भाग म्हणून दरवर्षी प्रमणे ‘जल्लोष’ हे वार्षिक स्नेहसंमेलन नुकतेच मोठ्या उत्साहात पार पडले. या संमेलनात प्रत्येक मुलाचा सहभाग कसा राहील, यासाठी शिक्षकांनी प्रयत्न केले. या संमेलनाला विद्यार्थी, पालक आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

विद्यार्थ्यांच्या दर्जेदार कला सादरीकरणाला उपस्थितांनी चांगलीच दाद दिली. विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देण्यासाठी असे कार्यक्रम वारंवार केले जावेत, अशी अपेक्षा सरपंच भास्कर मोकल यांनी व्यक्त केली.

स्नेहसंमेलनाचे उद्घाटन राजा खारपाटील यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी पद्माकर फोफेरकर, गजानन चौलकर, रा.का.म्हात्रे, बळीराम पाटील, बबन पाटील, शशांक ठाकूर, मिलिंद खार पाटील, प्रफुल्ल खारपाटील, बबन गोंधळी, दर्शन पाटील, अरुण ठाकूर, जयश्री फोफेरकर, समाधान ठाकूर, सचिन म्हात्रे, विश्वनाथ गावंड, शिवप्रसाद पंडित, हिंम्मत केणी, मनोहर नारंगीकर, अशोक कांबळे, नंदकुमार चिरनेरकर, सचिन घबाडी, निर्भय म्हात्रे, गीता नवाळे, ज्योती म्हात्रे, पुष्पलता म्हात्रे, पल्लवी विश्वे, महेश सुतार, रोशन थळी, गौरव पाटील, भारती ठाकूर, विश्वास मोकल, चंद्रकांत गोंधळी, पत्रकार सुर्यकांत म्हात्रे, राजकुमार भगत, मंगेश केणी, बी.जे.म्हात्रे, प्रसाद फोफेरकर, मनोज पाटील, गुंजन पाटील, निलेश ठाकूर आदी मान्यवर उपस्थित होते.

# ‘कन्या ही सासुऱ्यासी जाये’चा नाट्यप्रयोग

**। महाड । । प्रतिनिधी।**

कन्या ही सासुऱ्यासी जाये नाट्यप्रयोग कौटुंबिक मूल्यांवर आधारित असून, आई-वडिलांच्या पोटी जन्मलेली ‘कन्या’ ही कुटुंबासाठी किती अनमोल असते याचे चित्रण यात केले आहे. मुलीचे लाड, तिचे प्रेम आणि सासरी जाताना होणारा संस्कारमय प्रवास या नाटकाद्वारे मांडण्यात आला आहे. आयुष्यात येणारे संघर्ष आणि दुःख हसतमुखाने कसे पेलावे, याचे वास्तववादी दर्शन या दोन अंकी नाटकात घडण्यात येणार असल्याचे दिग्दर्शक प्रकाश लाड यांनी सांगितले.

या नाटकाचे प्रकाशन स्मित हरी केले आहे. नाटकाचे लेखक, हिरकांत करगुटकर, निर्माता, दिग्दर्शक, प्रकाश लाड, सहनिर्माता शिवाजी पाटील, पार्श्वसंगीत आनंद कुबल, प्रकाश योजना संतोष नार्वेकर, रंगभूषा जयवंत सातोस्कर, सूत्रधार हरी पाटणकर, विजय गुरव यांनी केले आहे.

## ‘आरोही’वाण ठरतोय आकर्षणाचे केंद्र अनोख्या प्रयोगातून कृषी पर्यटनाला चालना

# रायगडात पिकली पिवळी कलिंगडे

**। पाली /बेणसे । प्रतिनिधी ।**

उन्हाळ्याची चाहूल लागताच बाजारात लालचुटूक कलिंगडे दिसू लागतात, मात्र रायगड जिल्ह्यातील घोसाळे किल्ल्याच्या परिसरात यंदा काहीतरी वेगळे पाहायला मिळत आहे. येथील शेतात चक्क ‘आरोही’ नावाचे पिवळा गर असणारे वैशिष्ट्यपूर्ण कलिंगड डोलत असून, पर्यटकांना आणि खवय्यांना हे कलिंगड थेट शेतातून स्वतःच्या हाताने निवडून खुडण्याची संधी उपलब्ध झाली आहे.



वरतून इतर कलिंगडांसारखेच हिरवे दिसणारे हे फळ कापल्यानंतर आतून गडद पिवळ्या रंगाचे निघते. दिसायला आकर्षक आणि चवीला अधिक गोड असलेल्या या वाणाची लागवड येथील शेतकरी ऋषिकेश म्हात्रे व प्रवीण म्हात्रे यांनी प्रायोगिक तत्त्वावर यशस्वी केली आहे. केवळ बाजारात मिळणारे फळ विकत न घेता, ग्राहकांनी सहकुटुंब शेतात यावे, फिरण्याचा आनंद घ्यावा आणि हवे ते फळ स्वत: निवडावे, ही संकल्पना येथे राबवली जात आहे. येत्या १७ मार्च ते २७ मार्च दरम्यान ही संधी उपलब्ध असून, ४५ रुपये प्रति किलो या दराने हे कलिंगड उपलब्ध होणार आहे.

जिल्ह्यात प्रामुख्याने अलिबाग, पेण आणि रोहा परिसरात मोठ्या प्रमाणात तसेच इतरही ठिकाणी लाल कलिंगडाची लागवड होते. मात्र, स्वत: निवडा आणि तोडा ही संकल्पना आणि ‘आरोही’ (पिवळे कलिंगड) या वाणाची लागवड जिल्ह्यात अत्यंत मर्यादित ठिकाणी किंवा दुर्मिळ आहे. बहुतेक शेतकरी आपला माल घाऊक व्यापाऱ्यांना विकत आहेत.

मात्र थेट ग्राहकांना शेतात बोलावून विक्री केल्यामुळे शेतकऱ्याला चांगला भाव मिळेल. आणि पर्यटनालाही चालना मिळणार आहे. घोसाळे किल्ल्याच्या परिसरात होणारा हा प्रयोग जिल्ह्यातील इतर शेतकऱ्यांसाठी ‘कृषी-पर्यटना’चा एक नवीन आदर्श ठरू शकतो.

> **लोकांना शेतीचा प्रत्यक्ष अनुभव मिळावा आणि त्यांना स्वतःच्या हाताने निवडलेले 100% ताजे व दर्जेदार फळ मिळावे, या उद्देशाने आम्ही पिक युअर ओन ही संकल्पना राबवत आहोत. ‘आरोही’ या पिवळ्या कलिंगडाचे वेगळेपण आणि शेतात फिरण्याचा आनंद पर्यकांसाठी नक्कीच नवा अनुभव ठरेल. ग्राहकांच्या प्रतिसादावर या प्रयोगशील शेतीचे यश अवलंबून आहे. जास्तीत जास्त लोकांनी या उपक्रमाला भेट द्यावी.**
> **–ऋषिकेश म्हात्रे, प्रवीण म्हात्रे शेतकरी**

## निवडक



### क्षितीज म्हात्रेचे प्रवेश परीक्षेत यश

**कोर्लई :** मुरुड तालुक्यातील नांदगाव येथील रायगड जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळा नांदगांव क्रमांक १ मधील विद्यार्थी क्षितीज म्हात्रे याने जवाहर नवोदय विद्यालयाच्या प्रवेश परीक्षेत यश मिळविल्या बद्दल सर्वत्र कौतुक व अभिनंदन केले जात आहे. जवाहर नवोदय विद्यालय ही शंभर टक्के केंद्र शासन अनुदानीत विद्यालये आहेत. मनुष्यबळ विकास मंत्रालयाव्दारे राबविली जातात. यात प्रवेशासाठी कमालीची स्पर्धा असते. त्याकरीता प्रवेश परिक्षा घेतली जाते. अतिशय आव्हानात्मक असलेल्या या परिक्षेच्या गुणवत्ता यादीत येणारे विद्यार्थी या शाळांमध्ये शिक्षण घेतात.या परीक्षेत जिल्हा यादीत नांदगाव १ शाळेतील क्षितीज याचा ३५ वा. क्रमांक आला आहे. रायगड जिल्ह्यातील माणगाव तालुक्यात नवोदय केंद्रीय विद्यालय आहे. दरवर्षी इयत्ता सहावी फक्त ८० विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो. काही दिवसांपूर्वी याकरता प्रवेश परीक्षा घेण्यात आली. नांदगाव नंबर १ प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका संगीता खानावकर, शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा वृषाली जोशी, सेजल घुमकर तसेच अश्विन राठोड, हेमंत नांदगावकर, नितेश राऊत यांच्या हस्ते क्षितिज आणि त्याचे आई वडीलांचा सत्कार करण्यात आला.




### खांब येथे संगणक कक्षाचे उद्घाटन

**खांब :** रोहा तालुक्यातील नवजीवन शिक्षण प्रसारक मंडळ खांब संचलित श्री.रा.ग.पोटफोडे (मास्तर) विद्यालय खांब येथे संगणक कक्षाचे उद्घाटन सोहळा उत्साहात संपन्न झाला. सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून गेली अनेक वर्षे समाजातील गरजू व्यक्ती व विद्यार्थी वर्गासाठी मदतीचा हात देऊन आधार देणारी संस्था म्हणून राज्यस्तरावर नामांकित मेलजोल संस्था मुंबई यांच्या वतीने उपलब्ध करून दिलेल्या उच्च दर्जाचे संगणक कक्षाचे शानदार उद्घाटन करण्यात आले. यावेळी चेअरमन महेंद्र पोटफोडे, उपाध्यक्ष प्रकाश थिटे, संचालक रामचंद्र चितळकर, राम मरवडे, गजानन भोईर, सुभाष माटल, सुरेखा पार्टे, मेलजोल संस्थेचे मुख्य अधिकारी पंकजा, कृष्णा झुगरे, संदे, कैलास गवळी, महेश बांगारे, विभा भातिकरे, वामन मोहिते, गजानन खामकर, मुख्याध्यापक सुरेश जंगम व सर्व शिक्षक तथा शिक्षकेतर कर्मचारी वर्ग व मोठ्या संख्येने पालक वर्ग उपस्थित होते.

### प्लीझंट इंग्लिश स्कूलचे स्नेहसंमेलन

**नवीन पनवेल :** नेरेपाडा येथील प्लीझंट इंग्लिश स्कूलचे स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात पार पडले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून भूपेंद्र पाटील, अंकन कुमार सहा, अनंता गडगे, प्रकाश घाडगे, हनुमान खुटले, ॲड. विजय हरळकर, प्रकाश बिनेदार, धीरेंद्र ठाकूर, मयूर गडगे, वंदना रोडपालकर, धनश्री खूटले, महेश पाटील, मयूर गडगे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. यावेळी शाळेतील विद्यार्थ्यांनी आपली कला कौशल्य सादर केली. अनेकांनी गाण्यांवर नृत्य करत उपस्थितांची मने जिंकली. यावेळी संदेश गायकवाड कोकण कला व शिक्षण संस्था तसेच डॉ. वैभव खुटले यांचा यावेळी विशेष सत्कार करण्यात आला. शाळेचे चेअरमन धनंजय खुटले आणि श्रद्धा ठाकूर यांनी उपस्थित पाहुण्यांचे स्वागत केले. यावेळी विद्यार्थी तसेच पालकांना बक्षीसे वाटप करण्यात आली.



### माणगावात जामा मशिदीचे उद्घाटन

**माणगाव :** माणगाव नगरपंचायत हद्दीतील जुने माणगाव मस्जिद मोहल्ला येथे नव्याने साकारलेल्या जामा मशिदीच्या इमारतीचा उदघाटन सोहळा बुधवारी (दि.१८) मार्च रोजी माणगाव तालुक्यातील वडवली गावचे हुसेन अब्दुलरहीम हरगे यांच्या विशेष उपस्थितीत करण्यात आले. या सोहळ्यानिमित्त आयोजित इफ्तार पार्टी कार्यक्रमास मुस्लिम व हिंदू बांधवांची मोठी उपस्थिती होती. गेली ३ वर्ष या जामा मशिदीच्या इमारतीचे काम सुरु होते. यावेळी मुफ्ती हुसेन अब्दुलरहीम हरगे यांनी इस्लाम धर्माची तत्वे व शिकवण या विषयावर व्याख्यान दिले. या कार्यक्रमास जिल्ह्यातून मोठ्या संख्येने मुस्लिम बांधव उपस्थित होते. अध्यक्ष अब्दुलरहिमान हाजीते व उपाध्यक्ष सिराज अफ़वारे तसेच मस्जिद मोहल्ला ग्रामस्थांनी सर्वांचे स्वागत केले. जुने माणगाव मस्जिद मोहल्ला येथील एका छोट्याशा मोहल्ल्यात मशिदीची अत्यंत देखणी व सुबक इमारत साकारण्यात आल्याने ही इमारत सर्वांचेच लक्ष वेधून घेत आहे. जुने माणगाव मस्जिद मोहल्ला येथील मुस्लिम बांधवांच्या इतिहासातील हा एक आनंद देणारा क्षण ठरला.

## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- **बांधकाम साहित्य विक्री दुकानात अकाऊंटस** टॅलीचा अनुभव असलेली मुलगी पाहिजे. किमान २/३ वर्षाचा अनुभव संपर्क- ८८०६६८३२३२, ८००७८९३२३२
- **अलिबाग मधील ऑफिस करीता** खालील जागा भरणे आहे. साईट सुपरवायझर व ऑटोकॅड ड्राफ्ट्समन मो.नं. ९९७०३९१६९७
- **अलिबाग एस.टी. स्टँडजवळ** दुकान गाळा विक्री करणे आहे. ९७६४५४६६७९
- **जाहिरात : ‘विहीर’ आपल्या शेती, वाडी, बंगला सोसायटीत पाण्याच्या** सोयीसाठी RCC रिंगाची विहीर बनवून घेण्यासाठी संपर्क करा. रणजित पाटील. फोन : ९८३४३०३९४१, ९८८१६३७०४७ अलिबाग

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# बोहरा समाजाकडून स्वच्छता मोहीम



**। माथेरान । प्रतिनिधी ।**

बोहरा समाजाचे धर्मगुरू डॉ. सैय्यदना मफद्दल सैफुद्दिन यांच्या पुढाकाराने माथेरान शहरात एक महिनाभर स्वच्छता मोहीम राबविण्यात येत आहे. दि.१६ मार्चपासून या मोहिमेस सुरुवात करण्यात आली आहे. या महत्वपूर्ण कार्यासाठी नगरपरिषदेचे विशेष मार्गदर्शन लाभत आहे. प्रत्येक प्रभागात ही स्वच्छता मोहीम राबविण्यात येणार असून नागरिकांनी सहकार्य करावे, असे नगराध्यक्ष चंद्रकांत चौधरी यांनी सांगितले आहे.

माथेरानमध्ये नुकताच काही दिवसांपूर्वी महाराष्ट्र भुषण डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानच्या माध्यमातून श्रीसदस्यांमार्फत संपूर्ण गावात अशाचप्रकारे स्वच्छता मोहीम राबविण्यात आली होती. त्यावेळी जवळपास पाच टनांपेक्षाही अधिक प्रमाणात सुक्या कचऱ्याचे संकलन करण्यात आले होते. बोहरा समाजाच्या माध्यमातून महिनाभर स्वच्छता मोहीमेस सुरुवात झाल्यामुळे याच माध्यमातून जवळपास शंभर आदिवासी बांधवांना रोजगार उपलब्ध होत आहे.

## • आदिवासी बांधवांना रोजगार

सद्यस्थितीत बोहरा समाजाने विविध ठिकाणी जुने बंगले खरेदी करून त्याजागी आलिशान वास्तू उभारल्या जात आहेत. त्यातील कच कॅसल या बंगल्यापर्यंत मातीचा रस्ता आहे. येथील वखारी नाका ते कच कॅसल बंगला आणि पुढील काही भागापर्यंत रस्त्याची दयनीय अवस्था झाली आहे. त्यामुळे पायी चालत जाताना खूपच त्रासदायक बनले आहे. हा रस्ता सुध्दा बोहरा समाजाने स्वखर्चाने बनविल्यास पर्यटकांना, नागरिकांना आणि बोहरा समाजाच्या लोकांना बंगल्यापर्यंत जाण्यासाठी आणि पर्यटकांना नागरिकांना रहदारीसाठी उत्तम ठरू शकतो. त्यासाठी या समाजाने पुढाकार घ्यावा, अशीही मागणी जोर धरू लागली आहे.

## जाहीर सूचना

याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, माझ्या अशिलांच्यावतीने मी खालील अनुसूचीमध्ये विस्तृतपणे विवरणीत व यापुढे प्लॉट म्हणून उल्लेखित असलेल्या शेतजमिनी संदर्भात श्री. संदीप मुखोपाध्याय यांच्या हक्कांची चौकशी करीत आहे. श्री. संदीप मुखोपाध्याय हे मोजमापित ० हेक्टर ८१ आर क्षेत्रफळाची शेतजमीन, गाव मंडवणे, तालुका कर्जत, जिल्हा रायगड या जागेचे मालक आहेत ज्यामधील मोजमापित ० हेक्टर ४०.४७ आर क्षेत्रफळाची जागा अर्थात खालील विवरणीत प्लॉटची ते विक्री करू इच्छित आहेत.

कोणाही व्यक्तीचा सदर प्लॉट वा त्याच्या कोणत्याही भागामध्ये, बाबतीत वा त्यावर विक्री, एफएसआय, टीडीआर, अभिहस्तांकन, मृत्यूपश्चात वारसा, प्रभार, भेट, विनिमय, भार, भाडेकरार, वहिवाट, अनुज्ञप्ती, गहाण, धारणाधिकार, प्रभार, हस्तांतरण, न्यास, उत्तराधिकार, सुविधाधिकार, कोणत्याही न्यायालयाचा निवाडा/आदेश /हुकूम, पर्याय करार वा कोणताही करार वा कोणत्याही स्वरूपातील कोणतीही व्यवस्था काही त्यास्वरूपात कोणताही हिस्सा, हक्क, अधिकार, हितसंबंध, दावा वा मागणी असल्यास किंवा खालील अनुसूचीमध्ये विवरणीत प्लॉटशी संबंधित कोणतेही मूळ हक्क दस्तावेज, करार, करारनामा वा दस्तावेज ताब्यात असल्याचा दावा असल्यास वा ताब्यात असल्यास त्यांनी त्यासंदर्भात अशा दाव्यांच्या पुष्ट्यर्थ सहाय्यक कागदोपत्री पुराव्यासहित लिखित स्वरूपात अधोहस्ताक्षरितांना त्यांचा पत्ता कार्यालय क्र. ६०१, ६ वा मजला, रहेजा सेंटर, २१४, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरिमन पॉइंट, मुंबई - ४०० ०२१ येथे सदर जाहीर सूचनेच्या प्रसिद्धी दिनांकापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत सूचित करावे अन्यथा असा दावा वा दावे, काही असल्यास ते दावे सोडून दिलेले वा अधित्यागित वा परित्यागित समजण्यात येतील आणि खालील निर्देशित प्लॉटसंदर्भात मालक व माझ्या अशिलांदरम्यान व्यवहार पूर्ण करण्यात येईल.

**वरील संदर्भित अनुसूची**
**(प्लॉटचे विवरण)**

पुढील विवरणीत शेतजमिनीचा सर्व तो भाग व भूखंड अर्थात सर्व्हे क्र. ६९, हिस्सा क्र. ७ (पीयू - आयडी : १८९८८०२८२२४), मोजमापित अंदाजे ० हेक्टर ४०.४७ आर (नांगरणीयोग्य जमीन), ० हेक्टर ८१ आर वा जवळपास (नांगरणीयोग्य जमीन) या पैकी, १ हेक्टर १४ आर एकूण जमिनीपैकी (०.८६ आर लागवडीयोग्य जमीन आणि व ०.२८ आर (पोट खराबा) गाव मंडवणे, तालुका कर्जत, जिल्हा रायगड येथील, त्यावरील सर्व हक्क, लाभ, फायदे व विशेषाधिकार यांसमवेत व सीमा पुढीलप्रमाणे :

पूर्वेस वा त्या दिशेस : सर्व्हे क्र. ६९/८ धारक जमीन.
दक्षिणेस वा त्या दिशेस : सर्व्हे क्र. ६९/७ धारक प्लॉट क्र. ४६ धारक जमीन.
पश्चिमेस वा त्या दिशेस : सर्व्हे क्र. ७३/३ व ७३/६ धारक जमीन.
उत्तरेस वा त्या दिशेस : सर्व्हे क्र. ६९/६ए धारक जमीन.

दिनांक : २० मार्च, २०२६

**तृप्ती शेट्टी ॲन्ड असोसिएट्सकरिता**
**सही/-**
**ॲड. तृप्ती पी. शेट्टी**
**(प्रोप्रायटर)**

# हरिनाम उत्सवाची दिपोत्सवाने सांगता

**पाताळगंगा :** आत्मोन्नती विश्वशांती वारकरी संप्रदाय संचलित, अखंड हरिनाम उत्सव सप्ताहाचे आयोजन गेली ३८ वर्षे विठ्ठल रखुमाई मंदिर माजगाव येथे करण्यात येत आहे. माजगाव ग्रामस्थ एकत्र येऊन हा उत्सव मोठ्या उत्साहाने आणि भक्तीभावने साजरा करण्यात आला. या सप्ताहाच्या शेवटच्या दिवशी दीपोत्सवाच्या माध्यमातून सांगता करण्यात आली. यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवर व्यक्ती आणि वारकरी संप्रदाय येथील थोर कीर्तनकार यांच्या माध्यमातून दीप प्रज्वलित करण्यात आला. यावेळी उपस्थितानी आपले मनोगत व्यक्त केले. त्यानंतर पसायदानाने या कार्यक्रमाने सांगता करण्यात आली. दीपोत्सव दिवशी गावातून भव्य - दिव्य दिवशी पायी पाळखी दिंडी सोहळ्यांचे आयोजन करण्यात आले होते. गेले सात दिवस अखंड भजन, किर्तनाच्या माध्यमातून या ठिकाणी चैतन्य निर्माण झाले होते. दीपोत्सव दिवशी गावातून भव्य- दिव्य दिवशी पायी पाळखी दिंडी सोहळ्यांचे आयोजन करण्यात आले होते.

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांच्या सुचनेवरून आम्ही मौजे झिराडपाडा, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील परिशिष्टात नमूद केलेल्या मिळकतींचे, विद्यमान मालक श्री.राजेश लक्ष्मणदास कावरा यांचे त्या-त्या मिळकतींचे मालकी हक्कांचे निर्वेधतेची पडताळणी करीत आहोत. मिळकतींचे मालकांनी असे निवेदीत केले आहे की, खाली नमूद परिशिष्टात वर्णन केलेल्या मिळकतींमध्ये त्यांस पुर्णपणे व निर्वेध मालकीहक्क आहेत.

तरी ज्या इसमांचा त्या मिळकतींमध्ये अथवा त्यांतील कोणत्याही भागावर अथवा भागामध्ये करार, संमतीज्ञापन, भागीदारी, खरेदी, भाडेपट्टा, पोटभाडेपट्टा, वारसा, बोजा, दान, गहाण, हस्तांतरण, अदलाबदल, विश्वस्त, कुळवहिवाट, ताबा, परवाना, वहिवाट, कसवणुक, पोटगी, मृत्यूपत्र, कौटुंबिक व्यवस्था, तडजोड, कोर्टाचा हुकुमनामा, वहिवाटीच्या रस्त्याचा करार या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असेल, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित रजिस्टर्ड पोस्ट अे.डी.द्वारे लेखी कळवावे. मुदतीत तसे कुणीही न कळविल्यास, सदर मिळकतींमध्ये कुणाचाही कोणताही हक्कहितसंबंध नाही अथवा असल्यास तो कायमस्वरूपी सोडून देण्यात आला आहे, असे समजण्यात येईल व नोटीस मुदतीनंतर आलेली कोणतीही तक्रार, हरकत अथवा दावा विचारात घेतला जाणार नाही. तसेच मिळकतीच्या मालकांचे मालकी हक्क निर्वेध असल्याचे गृहीत धरून आमचे अशिल नियोजित खरेदी-विक्री व्यवहार पूर्ण करतील.

**परिशिष्ट**
**मौजे झिराडपाडा, ता. अलिबाग, जि. रायगड येथील**

| गट नं./ हि. नं. | क्षेत्र हे.आर.चौ. मी. | आकार रू. पैसे |
|---|---|---|
| १६ | ०-३१-६० | १.६० |
| १७/१ | ०-२४-२० | २.२६ |
| १८ | ०-११-१० | १.३० |
| १९ | ०-१२-२० | १.४५ |
| २० | ०-०९-८० | ०.१० |

अलिबाग
तारीख : २०/३/२०२६

सही/-
**ॲड. गणेश गोविंद पाटील.**
अे/१,२, तळमजला,
'श्रुतीसारंग' को. ऑप. हौ. सोसायटी,
युनियन बँकेसमोर, ब्राह्मणआळी,
अलिबाग, रायगड, ४०२ २०१.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांना कळविण्यात येत की आमचे अशिल श्री. प्रभाकर नथु शेळके, आणि सौ.भाग्यश्री प्रभाकर शेळके, रा.किरवली, ता.कर्जत, जि.रायगड यांनी खालील वर्णन केलेली जमिन मिळकत विद्यमान मालकांकडून कायम खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. सदरहू मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

**शेती मिळकतीचे वर्णन**

| जमिन मालकाचे नाव | गावाचे नाव | स.न/ हि.न | क्षेत्रफळ हे.आर.प्रति | आकार रू पै |
|---|---|---|---|---|
| अनिता गणेश करोडे<br>आश्विनी निकेत कुलकर्णी<br>आरती योगेश्वर गोखले<br>वैदही गणेश करोडे | बोरीवली ता.कर्जत | ५२/४ | ०२-२१-००<br>००-८३-००<br>०३-०४-०० हे.आर प्रति | २ रू ०० |
| | बोरीवली ता.कर्जत | ५२/२ | ०१-४९-००<br>०१-४९-०० हे.आर.प्रति | ० रु ८५ |
| | अंत्राट तर्फे नीड ता कर्जत | १८/३ | ०४-१६-००<br>०२-२५-००<br>०६-४१-०० हे.आर.प्रति | २ रु २५ |

सदरहू वर नमूद केलेली शेती मिळकत ही त्या मिळकतीचे विद्यमान मालक यांचे मालकीची स्वकष्टाची व ताबे कब्जा वहिवाटीची आहे असे ते सांगतात व विद्यमान ७/१२ उताऱ्यावरून तसेच दिसते. सदर शेती मिळकत त्यांचकडून आमचे अशिलांनी तदंगभूत सर्व हक्कांगासह कायमस्वरूपी खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी सदर शेती मिळकतीत कोणाचा काही गहाण, दान, साठेकरार, बक्षिस, फरोक्तखत, लिज वगैरे प्रकारचा हक्क वा कुळ हक्क, अन्न वस्त्र बोजा असल्यास त्याने तसे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसाचे आत खालील पत्त्यावर लेखी कळवावे वरील मुदतीत कोणाची काहीही हरकत न आल्यास मिळकत निर्वेध असल्याचे समजून सदरहू खरेदीखताचा व्यवहार पूर्ण केला जाईल. व मागाहून येणारी कोणतीही तक्रार ऐकली जाणार नाही.

ता. २०/०३/२०२६

सही/-
**ॲड सतीश अर्जुन शेळके**
(बी.ए.एल.एल.बी) मुंबई हायकोर्ट
ऑफीस पत्ता- नारायण देशमुख
हाऊस दगडे आळी कर्जत पूर्व
कर्जत - रायगड मो.नं. ९८८११३२२४८

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांच्या सुचनेवरून मी मौजे आगरसुरे, ता.अलिबाग, जि.रायगड येथील खाली नमूद परिशिष्टात वर्णन केलेल्या मिळकतीच्या (सदर मिळकत), विद्यमान मालकांचे, त्या मिळकतीचे मालकी हक्कांचे निर्वेधतेची पडताळणी करीत आहे. मिळकतीचे मालकांनी असे निवेदीत केले आहे की, सदर मिळकतीमध्ये त्यांस पुर्णपणे व निर्वेध मालकीहक्क आहेत.

तरी ज्या इसमांचा सदर मिळकतीमध्ये अथवा त्यांतील कोणत्याही भागावर अथवा भागामध्ये करार, संमतीज्ञापन, भागीदारी, खरेदी, भाडेपट्टा, पोटभाडेपट्टा, वारसा, बोजा, दान, गहाण, हस्तांतरण, अदलाबदल, विश्वस्त, कुळवहिवाट, ताबा, परवाना, वहिवाट, कसवणुक, पोटगी, मृत्यूपत्र, कौटुंबिक व्यवस्था, तडजोड, कोर्टाचा हुकुमनामा, वहिवाटीच्या रस्त्याचा करार या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित रजिस्टर्ड पोस्ट अे.डी.द्वारे लेखी कळवावे. मुदतीत तसे कुणीही न कळविल्यास, सदर मिळकतीमध्ये कुणाचाही कोणताही हक्कहितसंबंध नाही अथवा असल्यास तो कायमस्वरूपी सोडून देण्यात आला आहे, असे समजण्यात येईल व विद्यमान मालकांचे सदर मिळकतीचे मालकी हक्क निर्वेध आहेत असे गृहित धरुन आमचे अशिल नियोजीत खरेदी-विक्री व्यवहार पूर्ण करतील. नोटीस मुदतीनंतर आलेली कोणतीही तक्रार, हरकत अथवा दावा विचारात घेतला जाणार नाही.

**परिशिष्ट**
**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं./ हि. नं | क्षेत्र (हे.आर.चौ.मि.) | आकार (रू.पैसे) | विद्यमान मालकांचे नाव |
|---|---|---|---|---|
| आगरसुरे | २९९/१/१ | ६-२०-४०<br>पो.ख. ०-०८-९०<br>६-२९-३० | ३३.६९ | डे इंटिग्रेटेड मार्केटिंग एलएलपी तर्फे भागीदार दिलीप कुमार डे |

अलिबाग
तारीख : २०/३/२०२६

सही/-
**ॲड. गणेश गोविंद पाटील.**
अे/१,२, तळमजला,
'श्रुतीसारंग' को.ऑप.हौ.सोसायटी,
युनियन बँकेसमोर, ब्राह्मणआळी,
अलिबाग, रायगड, ४०२ २०१.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकाकडुन कायमची खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. त्यामुळे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांनी कोणत्याही व्यक्तीबरोबर अथवा लेखी करार केलेला असल्यास तसेच या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदीव्यवहार पुर्ण करतील. मुदतबाहय हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मिळकतीचे वर्णन :-**
**मौजे-भातगाव, ता. कर्जत, जि. रायगड येथील शेत जमीन मिळकती:-**

| अ. क्र | मालकाचे नाव | सर्व्हे नं.. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.चौ मी | आकारणी |
|---|---|---|---|---|---|
| १ | १) श्री.वामन धर्मा भगत,<br>२) श्री.अनेश गणु ढवळे | ३८ | २/ब | ०-१४-२० | ०-१७ |
| २ | १) श्री.वामन धर्मा भगत,<br>२) श्री.अनेश गणु ढवळे | ३८ | ३ | ०-०६-१० | ०-५८ |
| ३ | १) श्री.वामन धर्मा भगत,<br>२) श्री.अमेश गणु ढवळे | ३८ | ४ | ०-०५-१० | ०-५२ |
| ४ | १) श्री.वामन धर्मा भगत,<br>२) श्री.अनेश गणु ढवळे | ३८ | ५ | ०-०७-६० | ०-६९ |
| ५ | १) श्री.वामन धर्मा भगत,<br>२) श्री. अनेश गणु ढवळे | ३८ | ८ | ०-०५-३० | ०-५० |

या पैकी श्री. वामन धर्मा भगत यांचे अविभक्त सामाईक मालकीचे क्षेत्र

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

कार्यालयीन पत्ता:- ए विंग, फ्लॅट नं. ४,
पहिला मजला, गणेश अर्पाटमेंट,
कर्जत नगरपालीका कार्यालयाशेजारी,
ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१

सही /-
**ॲड.जयेश संभाजी म्हसे**
दिनांक :- १९/०३/२०२६
मो.नं. ९०२८९८२२७७
ई मेल: adv.jayeshmhase@gmail.com

## Tender Notice

**All India Institute of Local Self-Government [AIILSG] invites tenders for Supply, Installation, Testing, Commissioning, Maintenance and Repair of Solar-Enabled Drinking Water Schemes.**

- Quantity : 3
- Location : 2 Schemes in Raigad District,1 scheme in Palghar District of Maharashtra State.
- Last Date & Time of Submission: 25th March 2026 latest by 10:30 am.
- For complete details refer to https://www.aiilsg.org/tender.html

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे, नागेवाडी, ता.कर्जत, जि.रायगड येथील खालील वर्णनाची जमीन मिळकत तिचे मालक श्री.आसन लक्ष्मणदास बालानी यांचेकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविले आहे :-

| सर्व्हे क्र | हिस्सा क्र. | क्षेत्र (हे.आर) | आकार (रु.पै) |
|---|---|---|---|
| ५३ | १/अ/२ | १-२०-० | १-१० |

वरील जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हितसंबंध असल्यास आणि त्याची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हांस ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ दिवसांत लेखी पुराव्यासह खाली नमूद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध नाही. असे समजण्यात येवून आमचे अशिल वरील मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक : २०/०३/२०२६

**ॲड. राकेश भरत भोईर**
ऑफीस-कशेळे, ता.कर्जत, जि.रायगड
मो. ८१४९९४१८५२

## मुरुड जंजिरा नगरपरिषद, जि.रायगड
### ई-निविदा सुचना सन २०२५-२६
### म्यु.जा.क्र.१०९३/ ई-निविदा/मु.न.प.२०२५-२०२६

मा. प्रशासक तथा मुख्याधिकारी, मुरुड जंजिरा नगरपरिषद, जि. रायगड यांचेकडून १. मुरुड जंजिरा नगरपरिषद हद्दीत नमो उद्यान विकसित करणे. या कामांची ई-निविदा मागविण्यात येत आहे. या कामासंबंधीचा सविस्तर तपशिल व अटी-शर्ती : http://mahatenders.gov.in या वेबसाईटवर दिनांक २०/०३/२०२६ पासून उपलब्ध असून निविदा भरण्याचा अंतिम दिनांक ०७/०४/२०२६ आहे.

दिनांक :- १८/३/२०२६

**शिक्का**

सही/-
**प्रशासक तथा मुख्याधिकारी**
**मुरुड जंजिरा नगरपरिषद**

## जाहीर नोटिस

सर्व लोकांस या जाहिर नोटिसीने कळविण्यात येते की, मौजे पेण, तालुका-पेण, जिल्हा - रायगड, मौजे बोरगाव गावच्या हद्दीतील गट नं. व उपविभाग १७१अ. एकुण क्षेत्र ०.३४.५० (हे.आर.पॉ) पैकी नामदेव दामोदर महाडीक यांचे मालकीचे क्षेत्र ०.१७.०० (हे.आर.पॉ). आकार रु.०.३१ पैसे हि शेत मिळकत सदर क्षेत्राचे विद्यमान मालक नामदेव दामोदर महाडीक यांचेकडुन आमचे अशिलांनी नोंदणीकृत खरेदीखताने विकत घेणेचे ठरविले आहे. तरी सदर मिळकतीवर इतर कोणचाही अन्न, वस्त्र, जप्ती, लिज, लिन, चार्ज, जामिनकी, वारसा, वहिवाट, कुळहक्क, मालकी वगैरे हक्क अगर बोजा असल्यास हि जाहिर नोटिस प्रसिद्ध झाल्यापासुन १५ (पंधरा) दिवसात खाली सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनीय कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकती नोंदवाव्यात.

मुदतीत कोणाच्याही लेखी हरकती न आल्यास वर नमुद केलेली मिळकत बोजाविरहित आहे असे समजुन आमचे अशिल नोंदणीकृत खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील व मागाहून येणाऱ्या हरकतीस आमचे अशिल जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

हि जाहिर नोटिस आज ता. /०३ /२०२६ रोजीची.

**ॲड. मीना ल. बांधणकर.**
रा-फ्लॅट नं. ५०२, पाचवा मजला,
पृथ्वी कॉम्प्लेक्स, झीराळ आळी,
गणपती मंदिराजवळ, पेण, रायगड
मो.८८८८१८१५३३/७०६६०४१०१९

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यात येते की, माझे अशिल श्री. सुनिल गजानन भावे, सौ.उज्वला सागर कोळी व श्री.प्रितम वाली कुंभार यांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत ही सदर जमिनीचे विद्यमान मालक श्री. विश्वजित चंद्रकांत जुईकर रा.आदई, पनवेल, जिल्हा रायगड यांचेकडून रजिस्टर खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले असुन त्याबाबत उभयतांमध्ये सविस्तर बोलणी सुरु आहेत.

**मिळकतीचे वर्णन**-जिल्हा रायगड, तालुका पेण, पंचायत समिती पेण, मे. दुय्यम निबंधक पेण, तलाठी सजा-कामार्ली, ग्रामपंचायत वरवणे येथील मौजे- वरवणे, गट नं. १९५ क्षेत्र ०-५१-०० हे.आर.चौ.मी. त्यासी आकार रु.००-३४ पैसे ही जमिन या जाहीर नोटीसीचा विषय आहे.

सदरची जमिन ही निर्वेध व बोजा विरहीत असून त्यावर दुसरे कोणाचा कसल्याही प्रकारचा हक्क व अधिकार नाही याची ग्वाही विद्यमान मालकांनी माझे अशिलांना दिली आहे. तरी वरील जमिन मिळकती संदर्भात जर कोणाचा साठेकरार, गहाण, दान, जप्ती, लिन, लीज, चार्ज, जामिनकी, कब्जा, वारसाहक्क अगर अधिकार असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाले दिवशी पासून १४ (चौदा) दिवसांचे आंत खाली सही करणार ॲडव्होकेट यांचे पत्त्यावर रजिस्टर्ड पोस्टाने कळवाव्यात.

जर वरील मुदतीत कोणाचीही लेखी हर-हरकत न आल्यास सदरची जमिन ही निर्वेध व बोजाविरहीत आहे व त्यावर इतर दुसरे कोणाचाही, कसल्याही प्रकारचा हक्क अगर हितसंबंध नाही असे समजुन माझे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत ही माझ्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी. येणेप्रमाणे जाहीर नोटीस दिली असे.

पेण- रायगड.
दि. २०/०३/२०२६.

सही
**ॲड. संजय भास्कर पाटील**
परमार प्लाझा, शॉप नं.१६.
तळ मजला, शिवाजी पथ.
पेण-रायगड. ४०२१०७.
मोबा. ९८८१९१५२१९

## जाहीर नोटीस

तमाम लोकांना जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णनात नमूद केलेली जमिन मिळकत तिचे विद्यमान मालक श्री.दिनेश दिगंबर परुळेकर व इतर, पत्ता : फ्लॅट नं. बी-२, सुखदा को. ऑप. हौसिंग सोसायटी, वजीर नाका, बोरीवली (पश्चिम), मुंबई - ४०००९२. यांच्या मालकी, ताबे व वहिवाटीची असून सदर मिळकत आमचे अशिल श्री.बाळासाहेब कोंडीबा घोगरे हे खरेदी घेणेस इच्छुक असून त्याबाबत बोलणी करून जमिन मालकांना रक्कम देखील दिलेली आहे, सदर मिळकत ही निर्वेध, निजोखमी व बोजारहित असल्याचा भरवसा आमचे अशिलांना दिला आहे, तथापि सदर मिळकतीवर कोणाचा बोजा, ताबा, गहाण, दान, लीज, पोटगी, बक्षीस, तारण, करार, कुलमुखत्यारपत्र, किंवा कोर्टाचा हुकुम/आदेश, इ.स्वरूपाचा कोणताही अधिकार, हक्क असल्यास प्रसिद्धीपासून १५ दिवसांचे आत मूळ कागदपत्रानिशी खात्री करून द्यावी. अन्यथा सदर मिळकत पूर्णपणे निर्वेध व निजोखमी आहे असे समजून आमचे अशिल पुढील व्यवहार पूर्ण करतील, त्यानंतर कोणतीही तक्रार आमचेवर बंधनकारक राहणार नाही. याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट-** गाव मौजे : लाडीवली, ता: कर्जत, जि: रायगड येथील जमिन मिळकत यांसी गट नं. ४०/३ यांसी क्षेत्र ०० हे. ४७.२० आर अधिक पोट खराबा ०० हे. ०७.४० आर असे एकूण क्षेत्र ०० हे. ५४.६० आर, यांसी आकार ०४ रु. ०९ पैसे यापैकी लिहून देणार यांचे खरेदीचे, प्रत्यक्ष ताबे - वहिवाटीचे, मालकीचे एकूण क्षेत्र ०० हे. ५४.६० आर यांसी आकार ०४ रु.०९ पैसे यामधील लिहून घेणार यांना लिहून देत असलेले संपूर्ण क्षेत्र ०० हे ५४.६० आर ही मिळकत यांसी चतु:सिमा :- पूर्वेस-श्री.उत्तम श्रीराम ठाकूर व जयदीप किसवे यांची मिळकत, दक्षिणेस-श्री. संदिप रज्जत करमा यांची मिळकत, पश्चिमेस- श्री. पारस बाबूलाल जैन यांची मिळकत, उत्तरेस- श्री. पवन गुप्ता यांची मिळकत.
सबब ही जाहीर नोटीस असे.

**देवानंद अर्जुन सुरवसे, ॲडव्होकेट**
पत्ता: व्यंकटेश बंगला, कोर्ट रोड,
विठ्ठलनगर, कर्जत-४१०२०१.
मो.नं. ९७६४४०५१२३.

ॲडव्होकेट
**Adv.Devanand Arjun Survase**
(BSL. LL. B. DLPO)
MAH/4813/2012
M. No. ९७६४४०५१२३

दिनांक :- १९/०३/२०२६

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे-कळंब ता. सुधागड जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत कायम खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन :-**
**मौजे - कळंब ता. सुधागड जि. रायगड**

| कब्जेदाराचे नांव | स.नं./हि.नं. | क्षेत्र चौ.मी | आकार रू.पैसे |
|---|---|---|---|
| श्री.संतोष बबन वालगुडे | १४२/१/प्लॉट नं/७ | २३७.५० | २३७.५० |

सदर वरील वर्णन केलेली एकूण सर्व मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे कब्जेदार यांचेकडून कायम खरेदीने विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी सदर होणारे खरेदी विक्री व्यवहारास कोणाचीही हरकत अथवा दावा असल्यास वा सदरहु मिळकतीचे खरेदी विक्री बाबत तसेच हक्क हितसबंध, मालकी वहीवाट, पोटगी बक्षिसपत्र मृत्युपत्र, साठेकरार अथवा कोणाचेही काही हक्क हितसबंध वहिवाट अथवा सदर मिळकतीचे ताबे कब्जा वहिवाट असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झालेपासून संबंधीत तक्रारदार याने आपली हरकत योग्य त्या कागदोपत्री पुरव्यासहीत ०७ दिवसांचे कालावधीत खालील पत्त्यावर नोंदवावे. सदर कालावधीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित आहे. असे समजून आमचे अशिल सदरचा खरेदी विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेली हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची नोंद घ्यावी.

ठिकाण - पाली-सुधागड
दिनांक - १९/०३/२०२६

सही /-
**श्री. राहुल जे.भंडारी**
ॲडव्होकेट
रा.पाली ता. सुधागड जि.रायगड
मोबा नं. ९४२३२३२८६२

## सावधान जाहीर नोटीस

आमचे अशिल श्री. झुमरलाल मोतीलाल भलगट वय-६५, धंदा-शेती व व्यवसाय रा. १३ फ्लोर, बी विंग, १३०४ ट्रेओन टॉवर, भक्ती पार्क, आई मॅक्स थिएटर जवळ, वडाळा (ई.), मुंबई ४०००३७ यांनी दिलेल्या माहितीवरुन व दाखविलेल्या कागदपत्रांवरुन मी ॲड.नरेंद्र एच. बाफणा रा. पेण या जाहीर नोटीसीने व सावधगिरी नोटीसीने तमाम जनतेस कळवितो की,

**१)मिळकतीचे वर्णन**-जिल्हा व तुकडी रायगड जिल्हा परिषद रायगड, तालुका व पोटतुकडी पेण, पंचायत समिती पेण, मा.दुय्यम निबंधक पेण यांचे कार्यक्षेत्रातील तलाठी सजा कोलेटी यांचे हद्दीतील मौजे कोलेटी येथील ७/१२ च्या उताऱ्याप्रमाणे मिळकती खालीलप्रमाणे

| अ. नं. | गाव | गट नं./हि.नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|---|
| १ | कोलेटी | ३०/२/अ/१ | १.५९.०<br>पो.ख.१.००.०<br>एकुण २.५९.० | ३.०० |
| २ | कोलेटी | ३०/२/अ/२ | १.००.०<br>पो.ख.०.००.०<br>एकुण १.००.० | १.२५ |
| ३ | कोलेटी | ३०/२/अ/३ | ०.४०.०<br>पो.ख.०.००.०<br>एकुण ०.४०.० | ०.५४ |
| ४ | कोलेटी | ३०/२/ब | १.६८.०<br>पो.ख.०.५६.०<br>एकुण २.२४.० | २.५२ |

२) वर नमुद केलेल्या मिळकती आजमितीस महसुल दफ्तरी आमच्या अशिलांच्या मालक/भोगवटादर सदरी आमच्या अशिलांची नोंद आहे व सदरच्या मिळकतींचा संपुर्ण कायदेशीर ताबेकब्जा आमच्याच अशिलांकडे आहे. असे असताना आमच्या अशिलांस माहिती मिळाली की, वर नमुद केलेल्या मिळकतीसंबंधी आमच्या अशिलांच्या संमती व्यतिरिक्त कोणीतरी आमच्या अशिलाच्या नावाचा गैरफायदा घेऊन खोटे दस्ताऐवज बनवून कुळमुखत्यारपत्र नोंदणीकृत दस्ताने नोंदविल्याचे समजले आहे. आमचे अशिलांनी कोणालाही कोणत्याही दस्ताने अगर पत्राने वर नमुद केलेल्या मिळकतींसंबंधी कसलेही अधिकार दिलेले नाहीत अगर कोणाबरोबरही कसलाही करार केलेला नाही. तसेच कोणालाही कसलाही व कोणत्याही प्रकारचे कुळमुखत्यारपत्र दिलेले नाही. सबब कोणत्याही व्यक्तीने खोट्या व खोडसाळ बनवलेल्या कुळमुखत्यारपत्राच्या आधारे आमच्या अशिलाच्या नावाचा गैरफायदा घेऊन व खोट्या दस्ताच्या आधारे वर नमुद केलेली मिळकत कोणासही हस्तांतरण करण्याच्या इराद्यात आहे. अशी माहिती आमचे अशिलांस प्राप्त झाली आहे. सबब या सावधान जाहीर नोटीस तमाम जनतेस कळविण्यात येते की, वर नमुद केलेल्या मिळकती आमचे अशिलांच्या संमती व्यतिरिक्त कोणत्याही व्यक्तीने कसलाही दस्त केल्यास सदरचा दस्त व त्यातील सर्व कथने ही आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची जाहीरपणे नोंद घ्यावी व बनावट व्यक्तीपासून सावधान रहावे. असे देखील आमचे अशिल तमाम जनतेस कळवित आहेत. कोणाचेही आर्थिक नुकसान होऊ नये व नाहक न्यायालयीन बाबीस मुकू नये म्हणून प्रस्तुतीची जाहीर सावधान नोटीस आमचे अशिल दैनिक पेपरामध्ये प्रसिद्ध करीत आहेत. या उपरोक्त कोणीही कसलाही व्यवहार केल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी संबंधितावर राहील याची जाहीरपणे नोंद घ्यावी.

पेण
दि. १९/०३/२०२६

**ॲड.नरेंद्र एच. बाफणा**
लालबहादुर शास्त्री मार्ग,
श्रीकृपा निवास, पेण-रायगड
मोबा. ९०२८६७६००३

**वाचकांसाठी निवेदन**

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

**ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन**

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने नविन डिझाइन्स

मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

• (छायाचित्रः राजेश डांगळे)







# जिल्ह्यात गुढीपाडवा उत्साहात साजरा

पनवेलमध्ये गुढी पाडव्याच्या निमित्ताने व नवं वर्षाचे स्वागत भव्य-दिव्य शोभायात्रेने करण्यात येते. यावेळी महिला वर्गाने देवीच्या वेशभूषेत आकर्षक दर्शन घडवून सर्वांचे लक्ष वेधले. त्याचबरोबर मल्लखांब सादरीकरणाने उपस्थितांना थक्क केले, तर लहान मुलांच्या कलेचे विशेष कौतुक झाले. ढोल-ताशा आणि लेझीम पथकांच्या गजरात वातावरण उत्साहपूर्ण झाले. नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून मराठी संस्कृतीचा आनंद लुटला.








## अभिनव शाळेत कडुनिंब झाडांचे वाटप



| नेरळ | प्रतिनिधी |

अभिनव ज्ञान मंदिर, सामाजिक वनीकरण आणि राष्ट्रीय हरित सेना यांच्या माध्यमातून गुढी पाडवा निमित्त आगळा वेगळा उपक्रम राबविण्यात आला. पर्यावरण संवर्धन आणि आरोग्याच्या दृष्टीने महत्वाचा असलेल्या कडुनिंब झाडाच्या रोपांचे वाटप करण्यात आले. एक झाड हजारो फायदे हा संदेश देत आगळ्यावेगळ्या पध्दतीने गुढी पाडवा सण साजरा करण्यात आला.

सामाजिक वनीकरण कडून कडुनिंब वाढवा हा उपक्रम राबविला जात आहे. या उपक्रमाचा भाग म्हणून वनीकरण विभागाने शालेय विद्यार्थ्यांसोबत या उपक्रमाच्या माध्यमातून शहरातील कपालेश्वर मंदिर येथे एक झाड हजारो फायदे असा उपक्रम गुढी पाडवा सणाच्या दिवशी साजरा करण्यात आला.

अभिवन ज्ञान मंदिर, राष्ट्रीय हरित सेना आणि सामाजिक वनीकरण यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या कार्यक्रमास सामाजिक वनीकरणचे वन क्षेत्रपाल मिलिंद राऊत, पद्माकर गांगल, विलास शिंदे, संजय देसले, राजेंद्र दुसाने, सात्विक बोरसे, आदी मान्यवर मंगल गायकवाड, दया हजारे, अर्चना जोगळेकर, बळीराम डोंगरे, अर्जुन आंधळे आदी उपस्थित होते. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाबाबत जागरूकता निर्माण झाली असून, समाजातही सकारात्मक संदेश पोहोचला आहे.

## पेणमध्ये शोभायात्रेचे आयोजन

| खरोशी | प्रतिनिधी |

संप्रदायाच्या वतीने पेण येथे गुढीपाडवा अर्थात हिंदू नववर्षानिमित्त भव्य व शिस्तबद्ध शोभायात्रेचे आयोजन पेण येथे उत्साहात पार पडले.
या शोभायात्रेत सहभागी सर्व भाविकांनी पारंपरिक वेशभूषा परिधान करून उत्सवाला विशेष रंगत आणली.

महिला भगिनी मोठ्या संख्येने नटून थटून सहभागी झाल्या होत्या. कलशधारी महिला, भगवे ध्वजधारी, हातात टाळ मृदंग वाजवत हरीनामाचा गजर करत विविध सांस्कृतिक नृत्यप्रकार तसेच सामाजिक विषयांवरील देखावे हे या शोभायात्रेचे प्रमुख आकर्षण ठरले. ठिकठिकाणी रस्त्यावर रांगोळी काढून आलेल्या शोभायात्रेचे मनोभावे स्वागत करून उत्साह पहायला मिळाला होता.

या शोभायात्रेत पेण पनवेल सुधागड पाली रोहा अलिबाग या तालुक्यातील सर्व वयोगटांतील तरुण, युवती, पुरुष व महिला भाविकांचा उत्स्फूर्त सहभाग पाहायला मिळाला होता. सहभागी भाविकांच्या सुरक्षिततेची व सोयी-सुविधांची योग्य ती काळजी आयोजकांकडून घेण्यात आली होती.




## कर्जतमध्ये मराठी नववर्ष साजरे


•(छायाचित्र : संजय गायकवाड)

| कर्जत | प्रतिनिधी |

मराठी नववर्षाच्या स्वागताचा सण म्हणजे गुढीपाडव्यानिमित्त कर्जतमधील अनेक संस्था एकत्र येऊन कर्जत शहरात मराठी नववर्ष स्वागत यात्रेचे आयोजन करण्यात आले होते. तालुक्यातील बहुतांश गावात गुढ्या उभारून गुढीपाडवा उत्साहात साजरा करण्यात आला.

कपालेश्वर देवस्थान समिती, सार्वजनिक गणेशोत्सव समिती, विश्वहिंदू परिषद, बजरंग दल, प्रजापती ब्राह्मकुमारी ईश्वरी विश्व विद्यालय, शिवतांडव प्रतिष्ठान ढोल ताशा पथक आदींनी एकत्र येऊन स्वागत यात्रेचे आयोजन केले होते.

टिळक चौकातून या स्वागतयात्रेचा शुभारंभ करण्यात आला. या शोभायात्रेस संतोष पाटील, राजाभाऊ कोठारी, महेंद्र चंदन, प्रशांत पाटील, वैभव सुरावकर, रोहित ओसवाल, सुनील गोगटे, सुरेखा शितोळे, साईनाथ श्रीखंडे, दिनेश कडू, अभिजीत मराठे, दिलीप गडकरी, पद्माकर गांगल, महेंद्र बोडके, मधुकर घरत, मैत्र जिवजी, दिनेश रणदिवे, सुनील सोहनी, अमोल देशमुख, स्नेहा गोगटे, ज्योती कडू, ॲड. अभिषेक तिवारी, सर्वेश गोगटे, परेश शहा, मिलिंद खंडागळे, स्वराली गोगटे आदी कर्जतकर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

स्वागत यात्रा कर्जत शहरातील मुख्य बाजार पेठ, छत्रपती शिवाजी महाराज चौक, पाटील आळी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक मार्गे पुन्हा टिळक चौकात आली आणि श्री कपालेश्वर मंदिरात सामुदायिक आरती करून सांगता करण्यात आली होती.

या स्वागत यात्रेत ढोल पथकांनी उपस्थितांचे मन जिंकले. विशेषतः युवतींनी ढोल वाजवून आपली चमक दाखवून दिली. गावा गावात घरो घरी गुढ्या उभारून नव वर्षाचे स्वागत करण्यात आले. स्वागत यात्रा पाहण्यासाठी चौका-चौकात अनेकांनी गर्दी केली होती.

## कळंबोलीत नववर्षाचा जल्लोष



| पनवेल ग्रामीण | प्रतिनिधी |

गुढीपाडवा सांस्कृतिक व सामाजिक सेवा संस्था, कळंबोली यांच्या वतीने नववर्षानिमित्त आयोजित करण्यात आलेली शोभायात्रा उत्साहात पार पडली. श्री मंगळेश्वर माता मंदिर परिसरातून निघालेल्या शोभायात्रेत नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेत नववर्षाचे जल्लोषात स्वागत केले.

महिलांनी पारंपरिक वेशभूषेत सहभाग घेतला, तर युवकांनी ढोल-ताशांच्या गजरात वातावरण भारावून टाकले. रांगोळी स्पर्धा व विविध सांस्कृतिक उपक्रमांमुळे कार्यक्रमाला विशेष रंगत आली. कार्यक्रमाचे आयोजनासाठी दत्ता गाडख, शहाजी धुमाळ, उद्धव कदम, विजय सावंत, संजय भोंडवे, माणिकराव पवार, बबन बारगजे, शरद वाडेकर,प्रदीप फडतरे, मयूर गारडे, रघुनाथ झुंनगारे आदींनी विशेष परिश्रम घेतले.


• पनवेलमध्ये गुढी पाडव्याच्या शुभमुहूर्तावर सोन्याच्या खरेदीसाठी नागरिकांची उत्साही गर्दी केली होती.
(छायाचित्र राजेश डांगळे)

## उरणमध्ये नववर्षाचे उत्साहात स्वागत

| चिरनेर | प्रतिनिधी |

उरण तालुक्यात हिंदू नववर्षाच्या या सणाचे उत्साहात स्वागत करण्यात आले. हिंदू परंपरेनुसार घराघरातील अंगणात महिला भगिनींनी रांगोळ्या काढून त्यावर पाट मांडून, पाटावर गुढी उभारून, सुवासिनीनी गुढीचे पूजन केले. गोड मिष्ठांनाचा गुढीस नैवेद्य दाखवून, एकमेकांना शुभेच्छा दिल्या. ग्रामीण भागात गुढी उभारण्यासाठी लागणारी बांबूची काठी सहज उपलब्ध होत असल्यामुळे ग्रामीण भागात बहुतांश ठिकाणी उंच उंच गुढींची उभारणी करण्यात आली होती. त्यामुळे उत्साह दिसून आला होता.


• सुतारवाडी आणि पंचक्रोशीमध्ये आपल्या घराच्या समोर रांगोळी काढून परिसर सजविण्यात आला होता. सकाळी प्रत्येकाने आपल्या घरासमोर गुढी उभारून तिची पूजा केली आणि नवीन वर्षाचे स्वागत करण्यात आले.
•(छायाचित्रः हरिश्चंद्र महाडिक)

नागरिकांकडून उपक्रमाचे कौतुक | एक सुंदर सामूहिक सोहळा

# पालीत 'एक सोसायटी, एक गुढी'



### एकतेचा संदेश

वैयक्तिक गुढ्यांच्या गराड्यात न अडकता सर्वांनी एकत्र येऊन सण साजरा केल्यामुळे सोसायटीत एकोपा वाढण्यास मदत झाली. शहरात जागेअभावी सण साजरे करताना मर्यादा येतात, पण जर एकत्र आलो तर आपण अधिक उत्साहात आणि भव्यतेने आपली संस्कृती जपू शकतो, हेच आदश्वेर प्लाझाने दाखवून दिले आहे. या बदलाचे केवळ सोसायटीतील सदस्यांनीच नव्हे, तर परिसरातील नागरिकांनीही कौतुक केले आहे.

| पाली | प्रतिनिधी |

सांस्कृतिक परंपरा आणि आधुनिक जीवनशैली यांचा मेळ घालत, येथील 'आदेश्वर प्लाझा' सोसायटीने यंदाचा गुढीपाडवा एका आगळ्यावेगळ्या पद्धतीने साजरा केला. वाढत्या शहरीकरणामुळे आणि इमारतींच्या जाळ्यामुळे वैयक्तिक गुढी उभारण्यात येणाऱ्या अडचणींवर मात करत, सोसायटीने 'एक सोसायटी, एक गुढी' हा स्तुत्य निर्णय अमलात आणला होता.

आजच्या धावपळीच्या युगात आणि बहुमजली इमारतींमध्ये बाल्कनीतून गुढी उभारणे म्हणजे मोठी कसरत असते. या समस्येवर उपाय म्हणून निवृत्त शिक्षक सदानंद जांभेकर यांनी संपूर्ण सोसायटीसाठी एकच सामूहिक गुढी उभारण्याचा प्रस्ताव मांडला. या विधायक कल्पनेला सोसायटीचे अध्यक्ष अमित निंबाळकर यांनी तत्काळ दुजोरा दिला. सोसायटी कमिटीने एकमताने यावर शिक्कामोर्तब केले आणि बघता बघता एक सुंदर सामूहिक सोहळा आकारास आला.

हा सोहळा यशस्वी करण्यासाठी आदेश्वर प्लाझा महिला मंडळने मोलाचे सहकार्य केले. कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण ठरली ती म्हणजे सोसायटीच्या प्रांगणात काढलेली भव्य रांगोळी. प्रतीक्षा ठोंबरे आणि रागिणी लहाने यांनी आपल्या कलेतून साकारलेल्या अतिशय देखण्या रांगोळीने सोहळ्याची शोभा द्विगुणित केली.

## चिर्लेत रंगले पोपटी काव्य संमेलन

| चिरनेर | प्रतिनिधी |



उरण तालुक्यातील शिव कादंबरीकार इतिहासाचार्य के.एम मढवी यांच्या चिर्ले येथील सुपारीबाग निवासस्थानी काव्य दरबार वाडमय मंडळातर्फे ११३ वे. पोपटी काव्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. या पोपटी काव्य संमेलनाचे अध्यक्षस्थान संदेश भोईर यांनी भूषविले होते.

व्यासपीठावर साहित्यिक चंद्रकांत पाटील, गीतकार रामनाथ म्हात्रे, म.वा म्हात्रे, मिलिंद खारपाटील, अभिनेते वीरेंद्र रत्ने, साहित्यिक ए.डी.पाटील, साहित्यिक सुरेश भोपी यांच्यासह अनेक साहित्यिक व कवी उपस्थित होते. संस्थेच्या प्रथेनुसार, काव्य दरबाराचे संस्थापक तथा इतिहसचार्य काशिनाथ मढवी, कार्याध्यक्षा मिनल माळी, हरिश्चंद्र माळी. भ. पो म्हात्रे, रेश्मा ठाकूर,अरुण द म्हात्रे या सर्वांच्या कल्पकतेतून या पोपटी कवी संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी उपस्थित मान्यवरांचे या सर्वांनी स्वागत केले. गणेश पूजन व दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाला प्रारंभ करण्यात आला. आरंभी इशस्तवन व खरा तो एकची धर्म, जगाला प्रेम अर्पावे, हे सुमधुर गीत अरुण म्हात्रे यांनी सादर केले. यावेळी संस्थापक अध्यक्ष के. एम. मढवी यांनी प्रस्ताविकेतून काव्य दरबाराचा आढावा घेतला.

यावेळी पेण अलिबाग आगरी साहित्यिक सांस्कृतिक सामाजिक संस्थेतर्फे आगारातील तेजस्विनी म्हणून मनस्वी मीनल शंकर माळी हिला सन्मानपत्र देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. याशिवाय काव्य दरबारातर्फे अनेक गुणवंतांना गौरविण्यात आले.




## राशीभविष्य

- **मेष** : मानसिक ताणतणावाचा अनुभव घ्याल. मोहजालात अडकू नका. नोकरीत घुसमट होईल.
- **वृषभ** : प्रेमाचा संदेश देणारा दिवस. प्रसिद्धीचे वलय प्राप्त होईल. सुखमय आणि चांगला दिवस.
- **मिथुन** : मनाची अस्थिरता टाळावी लागेल. चीजवस्तू सांभाळा. कामात धावपळ वाढणार आहे.
- **कर्क** : नोकरदारांना दिलासा मिळेल. कामाची योग्य दाद मिळेल. नव्या कार्यक्षेत्रात पाऊल पडेल.
- **सिंह** : स्वत:चा हेका चालवू नका. स्वत:ची तुलना इतरांशी करू नका. मानसिक गोंधळ निर्माण होईल.
- **कन्या** : उद्योग व्यवसायाला चालना मिळेल. आर्थिक चिंता कमी होतील. वाहनसुखाचा अनुभव घ्या
- **तूळ** : कोणतीही गोष्ट ताणून धरू नका. काल्पनिक भय,भीती वाटेल. मोठे धडाडीचे निर्णय घेऊ नका.
- **वृश्चिक** : नोकरीत मोठा भाग्योदयाचा दिवस. प्रेरणा देणारे अनुभव येतील. मानसन्मानाचा योग आहे.
- **धनु** : व्यक्तिगत जीवनात एखादं वादळ निर्माण होईल. मानसिक चिंता वाढेल. आरोग्य जपावं.
- **मकर** : आज काही अपेक्षा पूर्ण होतील. गुंतवणुकीचे प्रमाण वाढवाल. चर्चेमुळे वाद मिटवाल.
- **कुंभ** : आर्थिक बाबतीत गुप्तता बाळगा. अति साहस टाळा. नातेवाईकांचा सल्ला तपासून घ्यावा.
- **मीन** : बेरोजगारांना कामाची संधी प्राप्त होतील. आत्मविश्वासात वाढ होईल. प्रेमप्रकरणात यश मिळेल.

## दिनविशेष

### २० मार्च

- **१९५६** : मराठीतील नवकवितेचे जनक बा. सी. मर्ढेकर यांचे निधन.
- **२०१४** : ज्येष्ठ पत्रकार आणि नामवंत लेखक खुशवंतसिंग यांचे निधन.
- **२०१६** : 'चितळे बंधू मिठाईवाले'चे संस्थापक भाऊसाहेब चितळे यांचे निधन.
- **२०१७** : वादग्रस्त हिंदुत्ववादी नेते योगी आदित्यनाथ यांनी उत्तर प्रदेशचे ३२ वे मुख्यमंत्री म्हणून शपथ ग्रहण केली.
- **२०१८** : 'इसिस'ने तीन वर्षांपूर्वी अपहरण केलेल्या ३९ भारतीयांची हत्या केली असल्याची माहिती परराष्ट्रमंत्री सुषमा स्वराज यांनी दिली.

## आरोग्यमंत्र

### पळवा घामोळ्याला

उन्हाळ्यात अनेकांना घामोळं येतं. त्वचेवरील हे पुरळ खाजतात, संबंधीत जागा लालसर होते. पण काही घरगुती उपायांनी हा त्रास कमी करता येतो.



✻ हळद – घामोळं दूर करण्यासाठी हळद अत्यंत प्रभावी ठरते. आठवड्यातून एकदा हळद पाण्यात कालवून ही पेस्ट घामोळ्यांवर लावल्यास आराम मिळतो.

✻ बर्फ – घामोळयांवर बर्फ फिरवल्यास थंडावा मिळतो. अर्थातच बर्फ रुमालात गुंडाळून घ्यावा. दिवसातून चार ते सहा वेळा हा थंड शेक घेतल्याने घामोळ्यांचा त्रास कमी होतो.

✻ कोरफड – कोरफड थंड असते. त्यामुळे सनबर्न किंवा घामोळ्यावर कोरफडीचा गर लावणं परिणामकारक ठरतं.

✻ खोबरेल तेल – दोन चमचे खोबरेल तेलात दोन कापूर वड्या विरघळवून घ्याव्या. हे तेल घामोळ्यांवर लावावं. दिवसातून दोन वेळा या तेलाने मसाज केल्यास घामोळं नाहीसं होतं.

✻ चंदन – चंदन पावडर आणि धने पावडर एकत्र करावी. यात गुलाबपाणी मिसळून पेस्ट बनवावी. हा लेप त्वचेवर लावावा. त्यानंतर थंड पाण्याने धुवून टाकावा. यामुळे जळजळ दूर होण्यास मदत होते.

✻ मेहंदी– मेहंदीची पानं वाटून लेप घामोळ्यावर लावावा. आंघोळीच्या पाण्यामध्ये मेहंदीची पानं टाकल्यानेही थंडावा मिळू शकतो.

## स्मार्ट टिप्स

### असा नोंदवा घरचा पत्ता

समोरच्या व्यक्तीला आपला पत्ता द्यायचा असल्यासआपल्या मदतीला धावून येणारं अ‍ॅप म्हणजे 'गुगल मॅप'. पण अनेकदा गुगल मॅपवर आपल्या घराचं लोकेशन नीट दिसत नाही. तंत्रज्ञानामुळे कोणतीची अडचण अगदी झपपट सोडवली जाऊ शकते. तुम्ही तुमच्या इमारतीचं नाव आणि पत्ता गुगल मॅपमध्ये नोंदवू शकता.आता मॅपमध्ये आपला पत्ता कसा नोंदवायचा हे समजून घेऊ या.

✻ गुगल मॅप ओपन करून सर्च टॅबमधल्या तीन बिंदूंवर क्लिक करा. ✻ ओपन झालेल्या पेजच्या खालच्या भागात 'अ‍ॅड अ मिसिंग प्लेस' हा पर्याय दिसेल. त्यावर टॅप करा. ✻ आता अजून एक पेज ओपन होईल. त्यात इमारतीचं नाव, पत्ता ही माहितीभरायची आहे. इथे लोकेशनला मार्क करण्याची सोयही आहे. ✻ लोकेशनसोबत जवळच्या दुकानाचं नावही नोंदवता येईल. ✻ फोनचं लोकेशन ऑन केल्यानंतर गुगल मॅप स्वत:च तुम्ही नोंदवलेल्या लोकेशनची निवड करेल. ✻ चुकीचा पत्त्यात बदल करण्यासाठी 'युवर कॉंट्रिब्युशन' या पर्यायाची निवड करावी लागेल.

## स्टाईल स्टेटमेंट

### ट्रेंड 'ऑक्सडाइज्ड ज्वेलरी'चा

मैत्रिणींनो, सध्या 'ऑक्सडाइज्ड ज्वेलरी'चा ट्रेंड आहे. यातला प्रत्येक दागिना वेगवेगळ्या पेहरावांवर आणि हटके पद्धतीने घालता येईल. ऑक्सडाइज्ड दागिने स्टाईल करण्याच्या या काही टिप्स...

✻ ऑक्सडाइज्ड बांगड्या कोणत्याही वेस्टर्न पेहरावावर शोभून दिसतील. वेस्टर्न पेहरावावर एखादं कडं किंवा बांगडी चांगली दिसेल. भारतीय पोशाखासोबत बांगड्यांचं छान कॉम्बिनेशन करता येईल. ✻ इंडो वेस्टर्न लूकसाठी झुमके कॅरी करा. जंपसूट, मॅक्सी ड्रेस किंवा कुर्त्यावरही ते छान दिसतील. हे झुमके साडीवर विशेष खुलून दिसतील. ✻ सध्या ठसठशीत,मोठ्या आकाराच्या अंगठ्यांचा ट्रेंड आहे. या अंगठ्या वेस्टर्न आणि इंडियन अशा दोन्ही पेहरावांवर शोभून दिसतील. ऑक्सडाइज्ड अंगठ्यांची भन्नाट डिझाइन्स तुमचं लक्ष वेधून घेतील. ✻ पलाझो, क्रॉप्ड ट्राउझर आणि शॉर्ट ड्रेसवर 'ब्लॅक लीफ अँकलेट्स' घाला. या अँकलेट्समुळे तुम्ही फॅशनिस्टा दिसाल. ✻ 'ऑक्सडाइज्ड बेल्ट' हा प्रकार ट्राय करून बघा. स्कर्ट, इव्हिनिंग गाउन, मॅक्सी ड्रेसवर तो शोभून दिसेल. साडीवर कंबरपट्टा म्हणून त्याचा वापर करता येईल.

## पंचांग

**शुक्रवार, २० मार्च २०२६**
विश्वावसूनाम संवत्सर, शके १९४७,
चैत्र शु. २, चंद्राशी : मीन,
नक्षत्र : रेवती, योग : ब्रह्मा,
सूर्योदय ६.४५, सूर्यास्त ६.४८

## फॉरवर्ड्स

**हमें हद में और ख़ुद में रहना पसंद हैं...**

**मग़र लोग़ उसें ग़ुरूर समझतें हैं...!**

## स्मार्ट फिटनेस

जीममधलं 'वेट ट्रेनिंग' म्हटलं की दुखापती आल्या. तुम्हीही जीममध्ये जाऊन 'वेटलिफ्टिंग' करत असाल तर दुखापती टाळण्यासाठी काही टिप्स फॉलो करा. ✻ आपण स्नायूंमधल्या सॉफ्ट टिश्यूंचा फार विचार करत नाही. जीममधल्या कामगिरीत सातत्य राखायचं असेल तर या टिश्यूंचं आरोग्य जपायला हवं. या टिश्यूंना मर्यादित रक्तपुरवठा होत असल्याने त्यांना लगेच दुखापत होते. परिस्थितीशी जुळवून घेताना या टिश्यूंना बऱ्याच अडचणी येतात. त्यांच्या बळकटीसाठी 'जॉईंट सप्लिमेंट्स' घ्यायला सुरू करा. यामुळे टिश्यूंना जास्त रक्तपुरवठा होतो. तसंच त्यांचा दाह कमी होतो. **(क्रमश:)**

## करिअरवाटा

### कास पर्यावरण रक्षणाची

पर्यावरणशास्त्राच्या अभ्यासक्रमाला आलेलं महत्त्व लक्षात घेता हे क्षेत्राकडे गांभीर्याने पहायला हवं हे आपण जानून घेतलं. पर्यावरणशास्त्राचा अभ्यास करण्यासाठी आयआयटीला जाता येतं. तिथं बी.टेक. (इकॉलॉजी अ‍ॅन्ड एन्व्हायर्नमेंट) अशी पदवी उपलब्ध असते. या



विषयात बी.टेक. किंवा एम.एस्सीची पदवी घेतली की संशोधनही करता येतं किंवा राज्य शासनाच्या प्रदूषण नियंत्रण मंडळामध्ये नोकरी मिळवता येते. नोकरी आणि प्रगत संशोधन करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी या संदर्भात विविध संस्थांशी संपर्क साधून माहिती घेणं गरजेचं आहे. त्यामध्ये त्या त्या संस्थेत उपलब्ध असणारे अभ्यासक्रम, त्यांचा कालावधी, त्या ठिकाणी उपलब्ध असणाऱ्या सोयी–सुविधा या संदर्भातील माहितीचा समावेश असायला हवा. त्याचबरोबर या क्षेत्रातील प्रगत संधींची कल्पना येणंही गरजेचं आहे. देशात विविध संस्था पर्यावरण रक्षणाच्या क्षेत्रामध्ये कार्यरत असून अशा संस्थांनी या शास्त्रातल्या विद्यार्थ्यांना संशोधनासाठी तसंच प्रगत शिक्षणासाठी सोयी–सुविधाही उपलब्ध करून दिल्या आहेत. या साऱ्यांचा विचार करून विद्यार्थ्यांना आपला संशोधनाचा विषय आणि प्रकल्प यांची निवड करायला हवी.

## खेचाखेची

### सुपरस्टार्स

एका माणसाची तब्येत खूपच खराब होती म्हणून तो ज्योतिषाकडे गेला! थोडं गुणाकार–भागाकार करून ज्योतिषी म्हणाला, काळजी करण्यासारखं काही नाही. लवकरच तू मोठ्या–मोठ्या सुपरस्टार्सना भेटणार आहेस! माणूस खुश होऊन म्हणाला, सलमान खान आणि अक्षय कुमारला?

ज्योतिषी म्हणाला, नाही रे धर्मेंद्र, दिलीप कुमार आणि देव आनंदला!

## वेगळं काही

तुम्ही विविध वस्तूसंग्रहालयांना भेट दिली असेल. भल्यामोठ्या परिसरात पसरलेली तीन ते चार मजली इमारतीतली ही वस्तूसंग्रहालयं देश आणि विदेशात मोठ्या प्रमाणावर आहेत. मात्र इंग्लंडमधलं एक म्युझियम खूप खास आहे. याचं कारण म्हणजे ते एका टेलिफोन बूथमध्ये साकारण्यात आलं असून जगातलं सर्वात लहान म्युझियम असल्याचं बोललं जातं. टेलिफोन बूथ हा प्रकार काळाच्या ओघात लोप पावला आहे. प्रत्येकाच्या हातात मोबाईल असल्याने एक रुपया किंवा पाउंड टाकून फोन करण्याचा विचारही कोणी करत नाही. त्यामुळे टेलिफोन बूथ इतिहासजमा झाले आहेत. म्हणूनच एका संस्थेने टेलिफोन बूथचं जतन करायचं ठरवलं. **(क्रमश:)**

## सल्ला मोलाचा

### रद्दीचा योग्य उपयोग

रद्दीचा योग्य प्रकारे उपयोग केला तर अनेक कामं चुटकीसरशी आणि योग्य पद्धतीनं पार पडू शकतात. जाणून घेऊ या जुन्या पेपरचे हे उपयोग...



✻ घरात लहान मुलं असतील तर भिंतींवर रेखोट्या असण्याची दाट शक्यता असते. स्टिकर्सचे डागही असतात. ते काढण्यासाठी डागाळलेल्या जागी बेबी ऑईल किंवा व्हेजिटेबल ऑईल लावावं. नंतर हलक्या हातानं घासावं. त्यानंतर व्हिनेगर लावून पेपरच्या सहाय्याने डाग स्वच्छ करावेत. ✻ बरेचदा टिफिन धुतल्यानंतरही दुर्गंधी येते. अशा वेळी त्यात पेपर घालून झाकण लावून ठेवावं. सकाळी दुर्गंधी नाहिशी झालेली असेल. ✻ धुतलेली पादत्राणं सुकवण्यासाठी त्यात रद्दी कागद भरून ठेवावे. दर दोन तासांनी कागद बदलावे. ✻ घरातील काचसामान स्वच्छ करण्यासाठी पेपरचा उपयोग करता येईल. ✻ खराब बूट रद्दी कागदाने स्वच्छ करावे. यामुळे पॉलिश केल्यासारखी चमक येते. ✻ तेलासारखे चिकट पदार्थ असणाऱ्या बाटलीवर ओघळ येऊन डाग पडतात. त्यामुळे सगळी बाटली तेलकट होते. हे टाळण्यासाठी तेल ओतण्यापूर्वी बाटलीभोवती पेपर गुंडाळून घ्यावा.

## सुडोकू ७९

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ९ | | | ४ | २ | | ५ | ६ |
| ३ | | ६ | | | | | | |
| | | ८ | | | ७ | ४ | | ९ |
| | | ४ | | ३ | | | | २ |
| | ७ | | ४ | | ९ | | १ | |
| ९ | | | | १ | | ६ | | |
| ८ | | ३ | ६ | | | ७ | | |
| | | | | | | २ | | |
| ४ | ६ | | २ | ५ | | | ८ | |

**टीप -**

✻ या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ ह ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.


✻ आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.

✻ अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

## सुडोकू ७८चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | ४ | ५ | १ | ९ | ७ | ६ | ३ | ८ |
| ७ | ३ | १ | ८ | ६ | ५ | २ | ४ | ९ |
| ६ | ९ | ८ | २ | ३ | ४ | ७ | ५ | १ |
| ८ | १ | ३ | ६ | ७ | २ | ५ | ९ | ४ |
| ५ | ६ | ९ | ३ | ४ | १ | ८ | २ | ७ |
| ४ | २ | ७ | ५ | ८ | ९ | १ | ६ | ३ |
| ३ | ८ | २ | ४ | १ | ६ | ९ | ७ | ५ |
| १ | ७ | ६ | ९ | ५ | ३ | ४ | ८ | २ |
| ९ | ५ | ४ | ७ | २ | ८ | ३ | १ | ६ |

## शब्दकोडे क्रमांक ७९



**आडवे शब्द :–**

१) कारण
४) कोवळा नाजूक
६) कैद
८) सोपे
११) रोखलेली नजर
१२) भांडण
१३) सामान
१४) दह्याचे पातळ पेय
१५) अंकुर
१६) एक आंबट गोड चवीचे फळ
१९) पवित्र
२२) अंगठा व तर्जनी ताणली असता पडणारे अंतर
२३) रमापती
२५) प्रजाजन
२६) नम्र वाकलेला
२७) अथवा किंवा
२८) पुष्पदल
२९) जंगलात चरणारे प्राणी
३२) खानदान
३३) मीठाची चव
३४) श्रीकृष्णाचे एक नाव
३५) हवेचे आवरण
३८) चामड्याचा दोर
३९) विरोध
४०) सरकारी नियम
४२) शोभणारा
४४) पातक
४७) कोर्टातील खटला
४८) श्रेष्ठ पुरुष
५०) एक गड्डाभाजी
५३) केविलवाणा
५५) बडबड त्रास
५६ ) रुची स्वाद
५७) पृथ्वी
५८) केसांना लावण्याचा रंग
६०) एक मराठी महिना
६१) मृत्यू नसलेला
६३) नष्ट होणारा
६४) इंद्र
६६) मत्सर
६७) अरण्यवास
७०) राबता
७२) जनन
७४) मनाचा ओढा
७५) काव्य करणारा
७६) अति उष्ण उन्ह

**उभे शब्द :–**

२) मोठे डोळे
३) बगळा
५) चिंतन
६) शेराचा आठवा भाग
७) अर्धवर्तुळाकार
९) वल्लरी
१०) वखवख भूक
१७) नाकावरील मोत्याचा दागिना
१८) बाजूला होणे
२०) वरपांगी
२१) एक वनस्पतीचे फळ
२४) बागवान
२५) नृत्य
२६) मेणा पालखी
२८) पारद
३०) नृत्यकलेचे दैवत
३१) मालाचे येणे–जाणे
३२) मोठा हातोडा
३३) जाडे भरडे कापड
३६) धातूचा धागा
३७) निमग्न रममाण
३८) शाब्दिक भांडण
४१) जेव्हा
४२) इकडे तिकडे सरकविणे
४३) अरण्य
४४) एक वतुर्थांश
४५) पुन्हा पुन्हा
४६) एक नकारात्मक शब्द हवेच्या विरुद्ध
४९) धोबी
५०) अभिनेता
५१) अधांतरी ठेवणे
५२) मुरगळा
५४) मऊ
५५) कारस्थान
५९) लाख
६१) अवास्तव
६२) लबाडीचा हेतू
६५) शिक्षा
६८) दृष्टी
६९) शपथ
७१) जपानी चलन
७३) बाण

(उत्तर उद्याच्या अंकात)

## मागील शब्दकोड्याचे उत्तर



विनायक दळवी

# राजकारणामुळे मुंबई क्रिकेटची अधोगती : सुलक्षण कुलकर्णी




यावर्षी रणजी करंडकाच्या उपांत्यपूर्व फेरीत कर्नाटकविरुद्ध झालेली मुंबईची हार, हा केवळ धावसंख्येचा पराभव नव्हता; तर ती मुंबई क्रिकेटच्या मुळाला लागलेल्या वाळवीचे लक्षण होते. ज्या शहराने ४२ वेळा रणजी चषकावर आपले नाव कोरले आणि ज्यांच्या रक्तामध्ये विजयी होण्याचे वेड होते, त्या मुंबई क्रिकेटसाठी २०२५-२६ चा हंगाम एक शोकांतिका ठरला आहे. खेळापेक्षा सत्तेच्या राजकारणाला महत्त्व दिले तर काय होते, याचा हा धडा आहे.

**अजिंक्य रहाणेची उणीव**

गेल्या वर्षी अजिंक्य रहाणेने हे सिद्ध केले की, कर्णधाराचे मूल्य केवळ त्याच्या फलंदाजीच्या सरासरीवर ठरत नाही. साधारण सरासरीने धावा करूनही, त्याने ज्या पद्धतीने संघाचे नेतृत्व केले ते एखाद्या युद्धनीतीपेक्षा कमी नव्हते. मुंबई क्रिकेटची नाडी त्याला अचूक ठाऊक होती. भर दुपारच्या उन्हात प्रतिस्पर्धी संघाला कसं जखडून ठेवायचं आणि वानखेडेवर पाऊल ठेवणाऱ्या प्रत्येक संघाच्या मनात धडकी कशी भरवायची, याचे तंत्र त्याला अवगत होते. या हंगामाच्या सुरुवातीला त्याचे नेतृत्व सोडणे आणि नंतर वैयक्तिक कारणास्तव अनुपलब्ध राहणे, ही मुंबईसाठी मोठी हानी ठरली. शार्दुल ठाकूरकडे आंतरराष्ट्रीय अनुभव असला, तरी रहाणे जी खडूस जिद्द संघात निर्माण करायचा, ती यावेळेस कुठेच दिसली नाही. रहाणे केवळ कर्णधार नव्हता, तो मार्गदर्शक होता. त्याच्या अनुपस्थितीत मुंबईचा संघ विखुरलेला वाटला.

**साधारण खेळाडूंचा भरणा**

या हंगामातील सर्वात चिंताजनक बाब म्हणजे अशा खेळाडूंची निवड, जे मुंबईतील एखाद्या साध्या क्लब सामन्यामध्ये खेळायलाही पात्र नाहीत. जेव्हा निवडकर्ते अशा खेळाडूला संधी देतात, ज्याने २० पेक्षा जास्त प्रथम श्रेणी सामने खेळूनही त्याची सरासरी २५च्या आसपास असते, तेव्हा तो केवळ संघाचा दुवा कमकुवत करत नाही, तर कांगा लीगमध्ये घाम गाळणाऱ्या हजारो तरुणांचा अपमान असतो. एकेकाळी मुंबईची टोपी मिळवण्यासाठी गुणवत्तेची पराकाष्ठा करावी लागायची. आज हे निकष केवळ जवळिकीवर अवलंबून असल्याचे दिसतात. ज्यांच्याकडे मोठ्या सामन्यांचा अनुभव नाही, असे खेळाडू संघात येतात आणि दुसरीकडे १९ किंवा २३ वर्षांखालील गटातील गुणवान खेळाडू दुर्लक्षित राहतात.

**गुणवत्तेपेक्षा सत्ता-केंद्रित राजकारणाला महत्त्व**

मुंबई क्रिकेटच्या पाईपलाईनचा झालेला ऱ्हास ही सर्वात मोठी शोकांतिका आहे. एक काळ असा होता की, वयोगटातील स्पर्धांमध्ये चांगली कामगिरी करा, स्थानिक लीग गाजवा आणि मुंबई संघात आपले स्थान निश्चित करा, असा स्पष्ट मार्ग होता. मात्र, आता लक्ष सत्ता-केंद्रित लोकांकडे वळले आहे. निवड समितीमध्ये कौशल्याऐवजी कोणाचे कोणाशी काय संबंध आहेत यावर भर दिला जातोय. जेव्हा प्रशिक्षक, निवडकर्ते आणि खेळाडू हे केवळ मर्जीतले म्हणून निवडले जातात, तेव्हा खेळाशी तडजोड होणे स्वाभाविक आहे. म्हणूनच, जेव्हा कर्नाटक किंवा जम्मू काश्मीर सारखे संघ दबाव टाकतात, तेव्हा मुंबईचा संघ प्रत्युत्तर देऊ शकत नाही



● गुढी पाडव्यानिमित्ताने हौशी मित्रमंडळातर्फे मुरुड समुद्रकिनारी बैलगाडी व घोडागाडी शर्यतीचे आयोजन करण्यात आले होते. या शर्यतीतील टिपलेले अटीतटीचे क्षण. (छायाचित्र : सुधीर नाझरे)

# मुंबईत क्रीडाक्षेत्राला नवी उभारी

## ■ महापौर चषकाला हिरवा कंदील ■ धमाकेदार निर्णयाने क्रीडाजगतात आनंदाची लाट

| मुंबई | क्रीडा प्रतिनिधी |

मुंबईच्या क्रीडाविश्वासाठी मोठी आनंदवार्ता समोर आली असून 'मुंबई महापौर चषक २०२५-२६' स्पर्धेला अखेर अधिकृत मंजुरी मिळाली आहे. महापौर रितू तावडे यांनी घेतलेल्या या ऐतिहासिक निर्णयामुळे गेल्या अनेक वर्षांपासून खंडित झालेली क्रीडा परंपरा पुन्हा जोमाने सुरू होणार आहे. त्याचबरोबर स्पर्धेच्या निधीत ७५ लाखांवरून थेट ५ कोटी रुपयांची भरीव वाढ जाहीर करण्यात आल्याने संपूर्ण क्रीडाक्षेत्रात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

मुंबई महानगरपालिका मुख्यालयात बुधवारी (दि.१८) महापौर रितू तावडे यांच्या अध्यक्षतेखाली क्रीडा संघटकांची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीला उपमहापौर संजय घाडी, महापालिका आयुक्त भूषण गगराणी, विरोधी पक्ष नेत्या किशोरी पेडणेकर, विविध गटनेते, शिक्षण अधिकारी, ज्येष्ठ पर्यवेक्षक (क्रीडा), लेखा विभागाचे अधिकारी तसेच विविध क्रीडा प्रकारांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यादरम्यान, क्रीडाविकासाच्या विविध मुद्द्यांवर सखोल आणि सकारात्मक चर्चा करण्यात आली.



**महापौरांनी मान्य केलेले निर्णय**

१) 'मुंबई महापौर चषक' स्पर्धा तातडीने पुन्हा सुरू करण्यास मंजुरी देण्यात आली.

२) आयोजनास झालेल्या विलंबामुळे स्पर्धा पूर्ण करण्यासाठी ३ महिन्यांऐवजी तब्बल ४ महिन्यांचा कालावधी देण्यात येणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले.

३) स्पर्धेच्या आयोजनासाठी असलेला निधी ७५ लाखांवरून थेट ५ कोटी रुपये इतका वाढवण्याची ऐतिहासिक घोषणा करण्यात आली.

गेल्या ५६ वर्षांपासून स्पर्धा न झाल्यामुळे वाढलेला खर्च आणि कमी झालेल्या संधींमुळे क्रीडाक्षेत्रात निराशा निर्माण झाली होती. मात्र, आता वाढीव निधी आणि स्पर्धा पुन्हा सुरू होणार असल्याने खेळाडू, प्रशिक्षक आणि संघटकांना मोठा दिलासा मिळाला आहे. विशेष म्हणजे महापौर रितू तावडे यांनी स्वतः खो-खो खेळाडू असल्याचे नमूद करत खेळाडूंच्या समस्या समजून घेत हा निर्णय घेतल्याचे स्पष्ट केले, त्यामुळे क्रीडाविश्वात समाधान व्यक्त होत आहे. तसेच, या बैठकीत जिल्हा व राज्य निमंत्रित स्पर्धांसाठी अधिक निधी उपलब्ध करून देण्याची मागणी देखील करण्यात आली आहे. ही मागणी सध्या प्रलंबित असली तरी भविष्यात यावर सकारात्मक निर्णय होईल, अशी आशा क्रीडा क्षेत्रातून व्यक्त करण्यात येत आहे. या बैठकीत मुंबई स्पोर्ट्स तर्फे बाळासाहेब (बाळ) तोरसकर आणि क्षितीज वेदक यांच्यासह क्रीडा कार्यकर्त्यांनी मांडलेल्या ४ प्रमुख मागण्यांपैकी ३ मागण्यांना मंजुरी देण्यात आली. या निर्णयामुळे क्रीडा क्षेत्रात समाधानाचे वातावरण निर्माण झाले असून हा क्रीडाप्रेमींसाठी मोठा विजय मानला जात आहे.

महापौर रितू तावडे यांच्या या निर्णयामुळे मुंबईच्या क्रीडाक्षेत्राला नवसंजीवनी मिळणार असून स्थानिक खेळाडूंना मोठ्या प्रमाणावर व्यासपीठ उपलब्ध होणार आहे. 'महापौर चषक' स्पर्धांच्या पुनरागमनामुळे मुंबई पुन्हा एकदा क्रीडाक्षेत्रात आघाडीवर झळकणार, यात शंका नाही. सभेच्या शेवटी मुंबई स्पोर्ट्स तर्फे बाळासाहेब (बाळ) तोरसकर यांनी महापौर रितू तावडे, उपमहापौर संजय घाडी, महापालिका आयुक्त भूषण गगराणी, विरोधी पक्ष नेत्या किशोरी पेडणेकर, तसेच उपस्थित सर्व अधिकारी, पदाधिकारी आणि क्रीडा प्रतिनिधी यांचे मनःपूर्वक आभार मानले.

# हॅकथॉनमध्ये 'स्मार्ट अभ्यास मित्र'चा डंका



| पाली/बेणसे | प्रतिनिधी |

एससीइआरटी महाराष्ट्र आणि एलएफइ संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने दि.१६ ते १८ मार्च या कालावधीत राज्यस्तरीय हॅकथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत सुधागड तालुक्यातील नवघर जिल्हा परिषद शाळेच्या 'स्मार्ट अभ्यास मित्र' या प्रकल्पाने उत्तुंग यश संपादन केले. संपूर्ण महाराष्ट्रातील निवडक ३४ प्रकल्पांमधून नवघर शाळेच्या या नाविन्यपूर्ण कोडिंग आधारित प्रकल्पाची टॉप १० मध्ये निवड झाली असून, उत्तेजनार्थ पारितोषिकाने त्यांना गौरविण्यात आले. शाळेतील इयत्ता सातवीचे विद्यार्थी खुशी वाघमारे, सामर्थ्य शिर्के आणि हर्षल सुतार यांनी या स्पर्धेत आपल्या तांत्रिक कौशल्याने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. स्मार्ट अभ्यास मित्र हा प्रकल्प कोडिंगवर आधारित असून, विद्यार्थ्यांनी स्वतः तयार केलेले वर्किंग मॉडेल आणि त्याचे उत्कृष्ट सादरीकरण यामुळे परीक्षकांनी या प्रकल्पाचे विशेष कौतुक केले. या संपूर्ण प्रवासात शाळेचे मार्गदर्शक व आयडॉल शिक्षक राजेंद्र अंबिके यांनी महत्त्वाची भूमिका निभावली. मुलांच्या कल्पनेला तांत्रिक जोड देऊन, त्यांना कोडिंग आणि फिजिकल कॉम्प्युटिंगचे धडे देत त्यांनी हा प्रकल्प राज्यस्तरापर्यंत पोहोचवला. शाळा, केंद्र, तालुका आणि जिल्हा अशा सर्व स्तरांवर यशस्वी घौडदौड करत जिल्ह्यातून राज्यस्तरासाठी निवड झालेली नवघर ही एकमेव शाळा ठरली.

# बेलोशीत नाईट क्रिकेट स्पर्धेला सुरुवात

## नृपाल पाटील, चित्रलेखा पाटील यांची उपस्थिती





| रायगड| जिल्हा प्रतिनिधी |

बेलोशी शेतकरी कामगार पक्ष पुरस्कृत व राजन क्रिकेट क्लब तर्फे ओव्हर आर्म नाईट क्रिकेट सामन्यांचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेचा शुभारंभ गुरुवारी (दि.१९) सायंकाळी झाला. या स्पर्धेचे उद्घाटन रायगड बाजारचे चेअरमन नृपाल पाटील व शेतरी कामगार पक्षाच्या राज्य प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. हा क्रिकेटचा थरार दि.२१ मार्चपर्यंत बेलोशीमधील बापदेव क्रीडा संकुलमध्य क्रीडा प्रेमींना पहावयास मिळणार आहे.

बेलोशी येथील बापदेव क्रीडा मैदानात क्रिकेटचा महासंग्राम रंगणार आहे. या स्पर्धेत ४० संघांचा सहभाग असणार आहे. त्यामुळे प्रकाशझोतांमध्ये खेळण्याचा व स्पर्धा बघण्याचा आनंद खेळाडूंसह क्रिडा प्रेमींना मिळणार आहे. तसेच, घरबसल्यादेखील ही स्पर्धा क्रीडा प्रेमींना पहाता यावी, म्हणून युट्यूब या सोशल मिडीयाद्वारे व्यवस्था करण्यात आली आहे. दरम्यान, या स्पर्धेचे उद्घाटन गुरूवारी सायंकाळी मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. यावेळी शेकापचे पदाधिकारी, बेलोशी येथील राजन क्रिकेट क्लबचे पदाधिकारी, कार्यकर्ते, खेळाडू व क्रीडा प्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते. उद्घाटनीय सामना अभिजात स्पोटर्स व मार्शल मुळखानाव या संघामध्ये पार पडला. ही स्पर्धा दि.२१ मार्चपर्यंत सुरू राहणार असून अंतिम विजेत्याला १ लाख रुपये व चषक, द्वीतीय क्रमांकाला ५० हजार रुपये व चषक, तसेच तृतीय व चतूर्थ क्रमांकाला प्रत्येकी ३० हजार रुपये व पाचव्या क्रमांकाला २५ हजार रुपये व चषक देऊन गौरविण्यात येणार आहे. त्याचबरोबर स्पर्धेतील मालिकावीराला एलईडी टीव्ही, उत्कृष्ट गोलंदाज व फलंदाजाल सायकल देऊन सन्मानित केले जाणार आहे.

# सोमजाई गोवे संघाची बाजी



| कोलाड | प्रतिनिधी |

कोलाड ग्रामीण क्रिकेट असो. च्या मान्यतेने व श्री सोमजाई प्रसन्न गोवे यांच्यावतीने रविवारी (दि.१५) क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. ही स्पर्धा गोवे येथील महिसदरा नदीच्या तिरवरील निसर्गरम्य ठिकाणी पार पडली. या क्रिकेट स्पर्धेत श्री सोमजाई गोवे क्रिकेट संघ अंतिम विजेता संघ ठरला.

या क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन मराठी उद्योजक प्रमोद म्हसकर, युवा कार्यकर्ते संदीप जाधव, गोवेचे उपसरपंच निशा जवके, माजी सरपंच सुप्रिया जाधव, दिपक फर्टीलायझर पनवेल कंपनीचे मॅनेजर प्रदिप जाधव, महाराष्ट्र पोलीस राकेश शिर्के यांच्यासह इतर मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले. या स्पर्धेतील अंतिम सामन्यात श्री सोमजाई गोवे संघाने जय भवानी लांढर संघावर विजय संपादन करून प्रथम क्रमांक पटकवला. तर, जय भवानी लांढर संघाला द्वितीय क्रमांकावर समाधान मानावे लागले. तसेच, अजय इलेव्हन खांब संघ तृतीय व जय हनुमान बल्हे संघ चतुर्थ क्रमांकाचा मानकरी ठरला. त्याचबरोबर उत्कृष्ट फलंदाज अजय इलेव्हन संघाचा सुयोग, उत्कृष्ट गोलंदाज जय भवानी संघाचा जिवेश, मालिकावीर श्री सोमजाई संघाचा निखिल व उत्कृष्ट क्षेत्ररक्षक श्री सोमजाई संघाचा ललित हे ठरले.

## समर्थ चषकाचे उद्घाटन

**उरण :** भार्गव म्हात्रे स्मरणार्थ समर्थ चषकाचे आयोजन करण्यात आले आहे. ही ओव्हर आर्म क्रिकेट स्पर्धा दि.१६ ते २१ मार्चपर्यंत पिरकोन येथे पार पडणार आहेत. या चषकाचे उद्घाटन इन्वेस्ट लँड सिटीचे सीएमडी संजय शिंदे, उपनगराध्यक्ष रवी भोईर, राजिप अध्यक्ष मंगेश वाकडीकर यांच्या उपस्थितीत पार पडला.

# आज रंगणार होड्यांच्या शर्यतीचा थरार



| रेवदंडा | प्रतिनिधी |

अलिबाग तालुक्यातील आग्राव दर्यातंरण मित्र मंडळाच्यावतीने गुढीपाडव्याच्या दुसऱ्या दिवशी शिडाच्या होड्यांच्या पारंपारीक शर्यतीचे आयोजन करण्यात येते. यावर्षी देखील शिडाच्या होड्यांच्या शर्यतीचे आयोजन करण्यात आले आहे. या शर्यती आज (दि.२०) सकाळच्या सुमारास आग्राव येथील कुंडलिका (साळाव) समुद्र खाडीत पार पडणार आहेत.

या शिडाच्या होड्यांच्या शर्यतीत प्रथम क्रमांक प्राप्त करणाऱ्याला १ लाख रूपये व भव्य चषक, द्वितीय क्रमांक प्राप्त करणाऱ्याला ५५ हजार रूपये व भव्य चषक, तृतीय क्रमांक प्राप्त करणाऱ्याला ३५ हजार व भव्य चषक तसेच उत्तेजनार्थ अशी बक्षिसे जाहीर करण्यात आली आहेत. तसेच, या शिडाच्या होडीतील या शर्यतीत जानतीवर कै. घनश्याम नारायण डोयले यांची होडी ठेवण्यात आली आहे. या स्पर्धेचे संपुर्ण नियोजन दर्यातंरण मित्रमंडळाच्यावतीने अध्यक्ष गोरख विश्वनाथ डोयले, उपाध्यक्ष दिपक जानू पाटील, सचिव जयवंत हरिश्चंद्र बागवाले, खजिनदार राजेंद्र नारायण डोयले यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले आहे. या स्पर्धेचा बक्षिस समारंभ सायकांळी साडेसहा वाजता आयोजीत करण्यात आला आहे.

**छत्रपती शिवाजी, राजर्षी छत्रपती शाहू संघाची बाजी | खारलॅंड मैदानात रंगला कबड्डीचा थरार**

# ठाण्यात 'खासदार चषकाचे' यशस्वी आयोजन

| ठाणे | प्रतिनिधी |

ठाणे जिल्हा कबड्डी असो. च्या मान्यतेने आणि ॲड. पूजा ठाकूर यांच्या सहकार्याने जिल्हा अजिंक्यपद निवड चाचणी 'खासदार चषक' या कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. ही स्पर्धा ठाणे जिल्ह्यातील कळवा-खारेगाव येथील खारलॅंड मैदानात पार पडल्या. यावेळी या स्पर्धेत राजर्षी छत्रपती शाहू आणि छत्रपती शिवाजी यांनी अनुक्रमे किशोरी व किशोर गटात जेतेपद पटकाविले आहे. तर, कुमारी गटात हा विजेतेपदाचा मान किल्ले माऊली संघाने पटकविला.



या स्पर्धेतील किशोरी गटाच्या अंतिम सामन्यात राजर्षी छत्रपती शाहू संघाने रा.फ. नाईक संघाचा प्रतिकार ३६-२६ असा मोडून काढत विजयाला गवसणी घातली. आक्रमकतेवर भर देत राजश्री शाहुने पूर्वार्धात लोण देत १९-०५ अशी आश्वासक आघाडी घेतली. उत्तरार्धात सावध खेळ करणाऱ्या शाहू संघाला रा.फ. नाईकने लोण देत चांगलाच झटका दिला. परंतु, शाहू संघाने आणखी एक लोण देत १० गुणांनी सामना आपल्या नावे केला.

किशोर गटात छत्रपती शिवाजी संघाने अंतिम सामन्यात राजर्षी छत्रपती शाहू संघाचे आव्हान ३९-३७ असे संपुष्टात आणत या चषकावर आपले नाव कोरले. झंझावाती सुरुवात करीत पहिल्या डावात २ लोण देत छत्रपती शिवाजी संघाने २४-०९ अशी भक्कम आघाडी घेतली. दुसऱ्या डावात राजर्षी शाहू संघाने टॉप गिअर टाकत त्या २ लोणची परतफेड करीत सामना रंगातदार अवस्थेत नेला. परंतु, संघाला जेतेपद मिळवून देण्यात तो कमी पडला. त्यामुळे राजर्षी शाहू संघाला समिश्र यशावर समाधान मानावे लागले. अमित गुप्ता, अभय वर्मा, अजित वर्मा यांचा चढाई पकडीचा खेळ या विजयात महत्वाचा ठरला. राजर्षी शाहूच्या हिमांशु जैसवाल, कृष्णा सोनदिया, अभिजित यादव यांनी शेवटच्या क्षणापर्यंत शर्थीची लढत देत सामन्यातील चूरस कायम राखली.

कुमारी गटाच्या अंतिम सामन्यात किल्ले माऊली संघाने ज्ञानशक्ती संघाचा ५२-२७ असा सहज पाडाव करीत जेतेपद मिळविले. विश्रांतीपर्यंत लोण देत २२-१५ अशी आघाडी घेणाऱ्या किल्ले माऊलीने विश्रांती नंतर तुफानी खेळ करीत आणखी ३ लोण देत गुणांचे अर्धशतक पार केले. मयुरी जोशी, रिंकू मलिक, रूपाली सातपुते यांच्या चढाई पकडीच्या तुफानी खेळाला या मोठ्या विजयाचे श्रेय जाते. ज्ञानशक्तीच्या निधी राजोळे, हिमानी गायकवाड यांचा खेळ विश्रांती नंतर ढेपळला. त्यामुळे सामना एकतर्फी झाला.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुला९बा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)